# ‘वालचंद’मध्ये आज माजी विद्यार्थी मेळावा

**सांगली :** येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात शनिवार, दि. ११ रोजी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन केले आहे. याप्रसंगी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य माजी खासदार संजय पाटील, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, डॉ. राहुल वालावलकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, सदस्य अमोल चव्हाण, संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांच्या मार्गदर्शनाखाली मेळावा होत आहे.

# 'वालचंद'मध्ये माजी विद्यार्थ्यांचा आज मेळावा

## सांगलीत आयोजन : सन २००० मध्ये उत्तीर्ण तुकडी विशेष निमंत्रित

■ **सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. १० : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा उद्या (ता. ११) माजी विद्यार्थी मेळावा प्रतिवर्षाप्रमाणे होत आहे. वर्षाच्या पहिल्या महिन्यातील दुसऱ्या शनिवारी मेळावा असतो. यंदाच्या मेळाव्यासाठी सन २००० मध्ये उत्तीर्ण तुकडी विशेष निमंत्रित केली असून, या तुकडीचे यंदाचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. मेळाव्यासाठी ऊर्जा क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ज्ञ डॉ. राहुल वालावलकर प्रमुख पाहुणे आहेत. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य माजी खासदार संजय पाटील, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील यांची प्रमुख उपस्थिती आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने देश उभारणीत मोठे योगदान दिले आहे. माजी विद्यार्थी जगभरात विखुरले आहेत. त्यांनी महाविद्यालयातील आजी विद्यमान



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. त्यांच्या अनुभवाचा लाभ व्हावा या हेतूने हा मेळावा भरवला जातो. दिवसभर विद्यार्थ्यांशी संवाद साधणाऱ्या सत्राचे आयोजन केले जाते. यानिमित्ताने महाविद्यालयात विविध संस्थांच्या देणगीतून साकारलेल्या प्रयोगशाळा, माहिती केंद्रांना माजी विद्यार्थी भेटी देणार आहेत. तेथील कामकाज समजून घेणार आहेत. महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, सदस्य अमोल चव्हाण, चकोर गांधी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. उदय दबडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे, प्रा. नारायण मराठे संयोजन करीत आहेत.

# नावीन्यपूर्ण संशोधनात 'वालचंद'ची भूमिका महत्त्वाची

## डॉ. राहुल वालावलकर : सन २००० च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा रंगला मेळावा

सांगली, ता. १२ : "सध्या तंत्रज्ञानामध्ये नावीन्यपूर्ण संशोधन होत आहे. त्यात मोठ्या प्रमाणात संधी आहेत. त्यामध्ये वालचंद महाविद्यालयाच्या प्रत्येक विभागातून योगदान देता येऊ शकते. त्या दृष्टीने 'वालचंद'ची भूमिका महत्त्वाची आहे," असे प्रतिपादन ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. राहुल वालावलकर यांनी आज येथे केले. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सन २००० च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा पार पडला. टिळक हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात श्री. वालावलकर बोलत होते.



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्यात बोलताना राहुल वालावलकर. व्यासपीठावर डॉ. उदय दबडे, डॉ. बी. सुब्बाराव, डॉ. हेमंत अभ्यंकर, संजय धायगुडे, तेजस शहा, पराशर मोने.

### 'माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण'

**प्रा. संजय धायगुडे यांनी प्रास्ताविकात मेळाव्याचा उद्देश कथन करून संस्थेच्या विकासामध्ये आणि विशेषतः आजच्या विद्यार्थ्यांच्या करिअर डेव्हलपमेंटमध्ये माजी विद्यार्थ्यांच्या योगदानाचे महत्त्व स्पष्ट केले आणि माजी विद्यार्थ्यांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.**

माजी प्राचार्य पर्यावरणतज्ज्ञ डॉ. बी. सुब्बाराव, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. हेमंत अभ्यंकर, संचालक डॉ. उदयकुमार दबडे, अधिष्ठाता डॉ. संजय धायगुडे, २००० च्या बॅचचे विद्यार्थी प्रतिनिधी विंग कमांडर तेजस शहा आणि पराशर मोने व्यासपीठावर होते. ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. वालावलकर यांनी आजच्या बदलत्या काळामध्ये ऊर्जा, तसेच विविध क्षेत्रांतील आव्हानांचा आढावा घेत त्याचा मुकाबला करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सज्ज राहण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. हरित आणि प्रदूषणविरहित ऊर्जा क्षेत्रात त्यांच्या स्वतःच्या पुढाकाराने होऊ घातलेल्या एका आंतरराष्ट्रीय पातळीवरील संयुक्त व्यासपीठाच्या उभारणीचे सूतोवाच करीत त्यामध्ये वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

डॉ. हेमंत अभ्यंकर म्हणाले, "'वालचंद' ही शिक्षण क्षेत्रातील संस्कृती आहे. माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संपर्क ठेवून आपल्या अनुभवाचा लाभ येथील विद्यार्थ्यांना करून द्यावा. महाविद्यालय लवकरच विद्यापीठ दर्जा प्राप्त करण्यात गरूडभरारी घेईल. त्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य राहील."

डॉ. बी. सुब्बाराव यांनी, अभियांत्रिकी शिक्षणामध्ये प्रात्यक्षिक शिक्षणावर भर देणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. संचालक डॉ. उदय दबडे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेत आगामी काळातील उद्दिष्टे आणि प्रस्तावित विकास आराखडा थोडक्यात सादर केला. येत्या तीन वर्षांत विद्यापीठ दर्जा प्राप्त करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असल्याचा विशेष उल्लेख केला. महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, सदस्य चकोर गांधी व अमोल चव्हाण, संचालक डॉ. उदय दबडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे, प्रा. नारायण मराठे यांनी मेळाव्याचे संयोजन केले. डॉ. नारायण आपटे यांनी सूत्रसंचालन केले.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळावा

## ▮ सन २००० मध्ये उत्तीर्ण झालेल्या रौप्यमहोत्सवी तुकडीतील विद्यार्थ्यांची उपस्थिती

जनप्रवास । सांगली

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळावा आयोजित केला होता. यावेळी सन २००० मध्ये उत्तीर्ण झालेल्या रौप्यमहोत्सवी तुकडी उपस्थिती होती.

ऊर्जा क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ज्ञ डॉ. राहुल वालावलकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि प्रख्यात पर्यावरणतज्ज्ञ डॉ. बी. सुब्बाराव, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. हेमंत अभ्यंकर, २००० च्या तुकडीचे विंग कमांडर तेजस शहा, पराशर मोने, महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. उदय दबडे, अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे हे व्यासपीठावर उपस्थित होते.



▮ वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विद्यार्थी मेळाव्याचे उद्‌घाटन करताना राहुल वालावलकर, प्रा. उदय दबडे आदी मान्यवर

प्रा. संजय धायगुडे ह्यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले संचालक प्रा. डॉ. उदय दबडे ह्यांनी अलीकडील काळातील महाविद्यालयाच्या प्रगतीचा धावता आढावा घेत येणार्या काळातील उद्दिष्टे आणि प्रस्तावित विकास आराखडा थोडक्यात सादर केला आणि येत्या तीन वर्षांत विद्यापीठ दर्जा प्राप्त करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असल्याचा विशेष उल्लेख केला. आपल्या प्रमुख भाषणामध्ये डॉ. राहुल वालावलकर ह्यांनी आजच्या बदलत्या काळामध्ये ऊर्जा तसेच विविध क्षेत्रातील आव्हानांचा आढावा घेत त्याचा मुकाबला करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सज्ज राहण्याच्या गरजेवर भर दिला दृष्टीने सर्वच क्षेत्रात घडणारे बदल लक्षात आणून दिले. यावेळी डॉ. बी. सुब्बाराव, डॉ. हेमंत अभ्यंकर यांनी आपले विचार व्यक्त केले. कौटुंबिक स्नेह असल्याचे आवर्जून नमूद केले. माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, सदस्य चकोर गांधी व अमोल चव्हाण तसेच महाविद्यालयाचे संचालक प्रा. (डॉ.) उदय दबडे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे आणि प्रा. नारायण मराठे ह्यांनी ह्या मेळाव्याचे संयोजन केले तर सूत्रसंचालन डॉ. नारायण आपटे ह्यांनी केले.

# प्रदूषण विरहित ऊर्जा क्षेत्रात 'वालचंद'ने सहभागी व्हावे

## राहुल वालावलकर : माजी विद्यार्थी मेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** हरित आणि प्रदूषण विरहित ऊर्जा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवरील संयुक्त व्यासपीठ उभारणी केली जाणार आहे. त्यामध्ये वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने सहभागी व्हावे, अशी अपेक्षा ऊर्जा क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ज्ञ डॉ. राहुल वालावलकर यांनी व्यक्त केली.

येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात शनिवार, दि. ११ रोजी माजी विद्यार्थी मेळावा झाला. २००० साली उत्तीर्ण झालेल्या रौप्यमहोत्सवी तुकडीची प्रामुख्याने उपस्थिती होती. त्यावेळी डॉ. वालावलकर हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

माजी प्राचार्य आणि प्रख्यात पर्यावरणतज्ज्ञ डॉ. बी.सुब्बाराव, माजी विद्यार्थी संघटनेचे माजी अध्यक्ष, शिक्षणतज्ज्ञ डॉ. हेमंत अभ्यंकर, २००० च्या तुकडीचे विंग कमांडर तेजस शहा, पराशर मोने, प्रा. डॉ. उदय दबडे, अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख भाषणामध्ये डॉ. वालावलकर यांनी बदलत्या काळामध्ये ऊर्जा, तसेच विविध क्षेत्रांतील आव्हानांचा आढावा घेतला. विशेषतः नाविन्यपूर्ण प्रयोग आणि आंतरविद्याशाखीय कौशल्य यावर भर देत त्यांनी पर्यावरणीय बदल, कार्बन नेट झिरो लक्ष्य गाठण्यासाठी सर्व क्षेत्रात घडणारे बदल लक्षात आणून दिले. हरित आणि प्रदूषण विरहित ऊर्जा क्षेत्रात वालचंद अभियांत्रिकीने सहभागी व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

डॉ. बी. सुब्बाराव यांनी वालचंदच्या तसेच महाराष्ट्राच्या समावेशक दृष्टिकोनाचा विशेष गौरव केला. आंध्र प्रदेशातून आल्यानंतर कोणतीही ओळख नसताना येथील व्यवस्थेने कसे सामावून घेतल्याबाबत कृतज्ञता व्यक्त केली. महाविद्यालय लवकरच विद्यापीठाचा दर्जा प्राप्त करण्याची गरूडभरारी घेईल, असा विश्वास व्यक्त केला. अजित गुलाबचंद, चकोर गांधी व अमोल चव्हाण, संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे, प्रा. नारायण मराठे यांनी संयोजन केले.

### विद्यार्थी आठवणीत हरवले

माजी विद्यार्थ्यांनी वालचंद मुळेच स्वतःची ओळख निर्माण झाल्याचे मनोगत नमूद केले. महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी आवश्यक ती मदत केली जाईल, असे त्यांनी सांगितले. माजी विद्यार्थी गतकाळातील स्मृतीत हरवून गेले होते.

# वालचंद अभियांत्रिकीत ९० टक्क्यांवर 'प्लेसमेंट'

## उच्च शिक्षणाकडे वाढतोय कल : दरवर्षी शंभरांवर कंपन्या येतात उमेदवारांच्या शोधात

**■ अतुल पाटील :**
**सकाळ वृत्तसेवा**

### स्टुडंट पॉवर



सांगली, ता. १३ : अभियांत्रिकीचं शिक्षण घ्यायचं तर 'वालचंद'मध्येच, असं अभियांत्रिकीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचं स्वप्न असतं. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा मापदंड म्हणजे वालचंद. ही ओळख तपस्येतून मिळाली आहे. त्यातीलच एक घटक म्हणजे 'प्लेसमेंट'. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्याला नोकरी मिळतेच मिळते. गेल्या तीन वर्षांची आकडेवारी पाहिली तर, सरासरी ९० टक्के विद्यार्थ्यांना सरासरी नऊ लाख रुपयांहून अधिक वार्षिक वेतन मिळत आहे. काही विद्यार्थ्यांचा उच्चशिक्षणाकडे कल वाढत आहे.

'वालचंद'मध्ये गेल्या तीन वर्षांत २०० वेगवेगळ्या कंपन्यांनी मुलाखती घेतल्या. साधारणतः दरवर्षी ९० ते ११० कंपन्या महाविद्यालयात येतात. परिसर मुलाखतीसाठी ऑनलाईन, ऑफलाईन यासोबतच आता हायब्रीडचा ट्रेंड आला आहे, यात प्रकल्प सादरीकरण आणि चाचणी ऑनलाईन घेतली जाते. तर, मुलाखत ऑफलाईन घेण्यात येते. प्रत्येक वर्षी दहा टक्के नवीन कंपन्या महाविद्यालयात बोलावल्या जातात.

अभियांत्रिकीतील सर्वच शाखांचे विद्यार्थी आयआयटी, आयआयएम, एनआयटीसारख्या संस्थांत जाऊन उच्चशिक्षण घेत आहेत. तीन वर्षांत किमान २०० विद्यार्थ्यांनी हा मार्ग निवडला. सरकारी संस्था, यूपीएससी, एमपीएससी आणि लष्कराकडेही काही विद्यार्थ्यांचा ओढा आहे.



वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय.

गेल्या तीन वर्षांत १८ विद्यार्थ्यांनी यूपीएससीमध्ये यश मिळवले आहे. 'वालचंद'मध्ये गुगल, ॲमेझॉन, मायक्रोसॉफ्ट, सेल्सफोर्स, डॉईस बँक, ध्रुवा सॉफ्टवेअर, एअरबस, इटन कार्पोरेशन, एल अँड टी, टाटा, महिंद्रा, सिमेन्स आदी २५० कंपन्या आणि संस्थातर्फे विद्यार्थ्यांची थेट महाविद्यालय परिसर मुलाखतीतून निवड होत आहे.

यासाठी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, सदस्य अमोल चव्हाण, चकोर गांधी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. उदय दबडे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, प्राध्यापक, कर्मचारी यांचे सहकार्य लाभत आहे.

### 'कौशल्य विकास'चे योगदान

**■ महाविद्यालयात असलेल्या 'एम्प्लॉयबिलिटी स्कील डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' अंतर्गत महाविद्यालयात दर गुरुवारी आणि शुक्रवारी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळते. तिसऱ्या वर्षातील पहिल्या सत्रापासूनच आठवड्यातून दोन तास प्रत्येक विद्यार्थी यासाठी देतो. यात संवाद कौशल्य, ॲप्टीट्यूड चाचणी, गटचर्चा, व्यक्तिमत्त्व विकास यावर मार्गदर्शन केले जाते.**

"महाविद्यालयातील प्लेसमेंटचे प्रमाण ८७ ते ९० टक्के इतके आहे. त्यांना सरासरी वार्षिक वेतन नऊ लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. यावर्षी रुबरीक कंपनीने एका विद्यार्थ्याला ६० लाख रुपये वार्षिक वेतन देऊ केले आहे. तर महिना एक लाख रुपयांच्या पुढे वेतन मिळालेली यावर्षी २७ मुले आहेत. महाविद्यालयात प्लेसमेंटसाठी विद्यार्थ्यांची वेगळी तयारी करून घेतली जाते.

**- प्रा. संजय धायगुडे**, अधिष्ठाता, उद्योग, माजी विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण विभाग

# वालचंदच्या माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

केसरी वृत्तसेवा

**सांगली:** येथील सुप्रसिद्ध वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रतिवर्षाप्रमाणेच माजी विद्यार्थी मेळावा अत्यंत उत्साही वातावरणात झाला.

सन्न २००० मध्ये उत्तीर्ण झालेल्या रौप्यमहोत्सवी तुकडीची प्रामुख्याने उपस्थिती असणार होती. ऊर्जा क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ज्ञ डॉ. राहुल वालावलकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि प्रख्यात पर्यावरणतज्ज्ञ डॉ. बी.सुब्बाराव, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. हेमंत अभ्यंकर, २००० च्या तुकडीचे विंग कमांडर तेजस शहा, पराशर मोने, महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. उदय दबडे, अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे हे व्यासपीठावर उपस्थित होते. प्रा. संजय धायगुडे यांनी स्वागत केले. अध्यक्ष अजित गुलाबचंद, सदस्य चकोर गांधी , अमोल चव्हाण तसेच महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. उदय दबडे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली अधिष्ठाता प्रा. संजय धायगुडे आणि प्रा. नारायण मराठे ह्यांनी ह्या मेळाव्याचे संयोजन केले तर सूत्रसंचालन डॉ. नारायण आपटे यांनी केले.


# 'वालचंद'मध्ये वाचन पंधरवड्याचे आयोजन

सांगली : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयातर्फे वाचन संकल्प उपक्रमानिमित्त वाचन पंधरवडा साजरा झाला. दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन, सामूहिक वाचन, पुस्तक परीक्षण स्पर्धा असे उपक्रम झाले. फुले, आंबेडकर चळवळीच्या कार्यकर्त्यांनी संचालक प्रा. उदय दबडे यांच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध ग्रंथ सुपुर्द केले. संयोजन प्रा. उमेश चव्हाण, प्रभारी ग्रंथपाल संतोष आगवणे, सहायक ग्रंथपाल सत्यवान कदम, दीपक सलगर, प्रतीक्षा कांबळे आदींनी केले.

# वालचंद- 'सकाळ'व्याख्यानमालेत अतुल कहाते यांचे आज व्याख्यान

सांगली, ता. ६ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय व 'सकाळ' माध्यम समूहाच्या वतीने आयोजित वालचंद - सकाळ व्याख्यानमालेत उद्या (ता. ७) संगणक माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ अतुल कहाते यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. 'कृत्रिम बुद्धिमत्ता क्रांती समाज जीवन' असा व्याख्यानाचा विषय आहे. यापूर्वी ज्येष्ठ संगणक तज्ज्ञ अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान झाले होते. लोकमान्य टिळक सभागृहात सायंकाळी चार ते साडेपाच या वेळेत होणारे व्याख्यान सर्वांसाठी खुले आहे. ही माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. उदय दबडे यांनी दिली.

डॉ. दबडे म्हणाले, 'या व्याख्यानात कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधुनिक समाजावर प्रभाव, उद्योग क्षेत्रातील बदल, कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी जीवनशैलीला कसे रूपांतरित करत आहे या अनुषंगाने श्री कहाते आपले विचार मांडणार आहेत. 'सकाळ'च्या वतीने महाविद्यालयास देण्यात आलेल्या एक कोटीच्या देणगीतून ही व्याख्यानमाला घेतली जाते. याशिवाय महाविद्यालयातील संशोधन कार्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. वालचंद-सकाळ व्याख्यानमालेत तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांना निमंत्रित करून नावीन्यपूर्ण विषयांवर चर्चा घडवून आणली जाते.



अतुल कहाते

# वालचंद महाविद्यालयाने स्टार्टअपच्या गरजा पूर्ण कराव्यात

## डॉ. राजेंद्र जगदाळे : वालचंदमध्ये इनक्यूबेशन विषयावर व्याख्यान

**जनप्रवास । सांगली**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने अत्याधुनिक इनक्यूबेशन आणि उद्योजकता केंद्र स्थापित करून विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या केंद्राच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रातील स्टार्ट-अप्सना उंच भरारी घेण्याची संधी प्राप्त होणार आहे. आता महाविद्यालयाने स्टार्टअप्सच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वसमावेशक इनक्यूबेशन धोरण तयार करावे असे प्रतिपादन तज्ञ डॉ. राजेंद्र जगदाळे यांनी केले.


वालचंद महाविद्यालय सांगली येथे इनक्यूबेशन आणि उद्योजकतेतील तज्ज्ञ डॉ. जगदाळे यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी संधी या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ जगदाळे हे पुणे येथील विज्ञान आणि तंत्रज्ञान पार्कचे महासंचालक आणि सीईओ आहेत. ही संस्था भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या अखत्यारीत येते. इंडिया आशियान ट्रेड कौन्सिलचे ट्रेड कमिशनर व वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. सचिन काटे यांनीही उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी जागतिक व्यापार संधी आणि आंतरराष्ट्रीय व्यवसायात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भूमिका याबद्दलचे अनुभव कथन केले. डॉ. जगदाळे आणि डॉ. काटे यांनी दक्षिण कोरियाच्या कोडिया ग्लोबल होल्डिंग्ज कंपनीच्या शिष्टमंडळातील अन ताय हो, काँग जंग सिक आणि श्रीमती ली जी यून यांच्या विशेष उपस्थितीमध्ये महाविद्यालयाच्या कॅम्पसला भेट दिली.



सांगली : तज्ञ डॉ. राजेंद जगदाळे यांचा सत्कार करताना पदाधिकारी.

यावेळी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्र. संचालक प्रा. डॉ. उदय ए. दबडे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य सी. एस. कोटीभास्कर, डॉ. एस. जी. ताम्हणकर, इनक्युबेशन नवनिर्मिती-उद्योजकता केंद्राचे असोसिएट डीन डॉ. ए. पी. पाटील, अॅकॅडमिक्स विभागाचे असोसिएट डिन डॉ. ए. के. कोकणे, श्रीमती डॉ. ए. ए. आगाशे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, पदवी, पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या संशोधन व विकास केंद्रामार्फत असोसिएट डीन डॉ. ए.जे. उंबरकर यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. विजय मोहाले आणि संशोधन व विकास केंद्राच्या टीमने केले होते.

# ‘वालचंद’ने स्टार्टअपच्या गरजा पूर्ण करावयात : डॉ. राजेंद्र जगदाळे



वालचंद महाविद्यालयातील कार्यक्रमात डॉ.राजेंद्र जगदाळे यांचा सत्कार करताना उदय बदडे व इतर.

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने अत्याधुनिक इनक्यूबेशन आणि उद्योजकता केंद्र स्थापित करून विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या केंद्राच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रातील स्टार्ट-अप्सना उंच भरारी घेण्याची संधी प्राप्त होणार आहे. आता महाविद्यालयाने स्टार्ट-अप्सच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वसमावेशक इनक्यूबेशन धोरण तयार करावे असे मत इनक्यूबेशन आणि उद्योजकतेतील तज्ज्ञ डॉ. राजेंद्र जगदाळे यांनी व्यक्त केले.

वालचंद महाविद्यालय सांगली येथे इनक्यूबेशन आणि उद्योजकतेतील तज्ज्ञ डॉ. राजेंद्र जगदाळे यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी संधी या विषयावर मार्गदर्शन केले. शिक्षण, संशोधन, उद्योग सहकार्य, इनक्यूबेशन, स्टार्ट-अप्सच्या क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या करिअरच्या संधी हा व्याख्यानाचा मुख्य विषय होता.

इंडिया आशियान ट्रेड कौन्सिलचे ट्रेड . कमिशनर व वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. सचिन काटे यांनीही उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी जागतिक व्यापार संधी आणि आंतरराष्ट्रीय व्यवसायात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भूमिका याबद्दलचे त्यांचे अनुभव आणि अंतर्दृष्टी व्यक्त करताना, जागतिक बाजारपेठेत तांत्रिक प्रगतीची गरज आणि जगभरातील करिअरच्या संधी शोधण्यासाठी विद्यार्थी त्यांच्या तांत्रिक कौशल्यांचा कसा वापर करू शकतात यावर सविस्तरपणे मार्गदर्शन केले. डॉ. जगदाळे आणि डॉ. काटे यांनी दक्षिण कोरियाच्या कोडिया ग्लोबल होल्डिंग्ज कंपनीच्या शिष्टमंडळातील श्री. अन ताय हो, काँग जंग सिक आणि श्रीमती ली जी यून यांच्या विशेष उपस्थितीमध्ये महाविद्यालयाच्या कॅम्पसला भेट दिली.

यावेळी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्र. संचालक प्रा. डॉ. उदय ए. दबडे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य सी.एस. कोटीभास्कर, डॉ.एस.जी. ताम्हणकर, इनक्युबेशन-नवनिर्मिती-उद्योजकता केंद्राचे असोसिएट डीन डॉ. ए.पी. पाटील, अॅकॅडमिक्स विभागाचे असोसिएट डिन डॉ. ए.के.कोकणे, श्रीमती डॉ. ए.ए.आगाशे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, पदवी, पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या संशोधन व विकास केंद्रामार्फत असोसिएट डीन डॉ. ए.जे. उंबरकर यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. विजय मोहाले आणि संशोधन व विकास केंद्राच्या टीमने केले होते.

# नव उद्योजकांना 'वालचंद'ने बळ द्यावे

## डॉ. जगदाळे : महाविद्यालयात 'इनक्युबेशन सेंटर'तर्फे व्याख्यान

सांगली, ता. १४ : "वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील 'इनक्युबेशन सेंटर'चा लाभ पश्चिम महाराष्ट्रातील नवउद्योजकांनी घ्यावा," असे आवाहन पुणे येथील विज्ञान-तंत्रज्ञान पार्कचे महासंचालक राजेंद्र जगदाळे यांनी केले. ही संस्था विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या अखत्यारित येते. शिक्षण, संशोधन, उद्योग सहकार्य, इनक्युबेशन, स्टार्ट-अप्सच्या क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या करिअरच्या संधी या विषयावर ते बोलत होते. संचालक डॉ. उदय दबडे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. जगदाळे म्हणाले, "महाविद्यालयाने अत्याधुनिक इनक्युबेशन आणि उद्योजकता केंद्र स्थापन केल्याने विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. या केंद्राच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रातील नवउद्योजकांना त्यांच्या संकल्पना मांडून उंच भरारी घेण्याची संधी प्राप्त होणार आहे. या महाविद्यालयाने 'स्टार्ट-अप्स'च्या गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वसमावेशक धोरण राबवावे."



सांगली : पुणे येथील विज्ञान आणि तंत्रज्ञान पार्कचे डॉ. राजेंद्र जगदाळे यांचा सत्कार करताना वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. उदय दबडे.

इंडिया आशियान ट्रेड कौन्सिलचे ट्रेड कमिशनर व वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. सचिन काटे यांचेही यावेळी भाषण झाले. त्यांनी जागतिक व्यापारसंधी आणि आंतरराष्ट्रीय व्यवसायात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भूमिका याबद्दलचे अनुभव सांगितले. जागतिक बाजारपेठेत तांत्रिक प्रगतीची गरज आणि जगभरातील करिअरच्या संधी शोधण्यासाठी विद्यार्थी त्यांच्या तांत्रिक कौशल्यांचा कसा वापर करू शकतात, यावर सविस्तरपणे मार्गदर्शन केले.

डॉ. जगदाळे आणि डॉ. काटे यांनी दक्षिण कोरियाच्या 'कोडिया ग्लोबल होल्डिंग्ज' कंपनीच्या शिष्टमंडळातील श्री. अन ताय हो, काँग जंग सिक आणि श्रीमती ली जी यून यांच्या विशेष उपस्थितीत महाविद्यालयास भेट दिली. महाविद्यालय विकास समितीचे सदस्य चिदंबर कोटीभास्कर, डॉ. एस. जी. ताम्हणकर, नवनिर्मिती-उद्योजकता केंद्राचे सह अधिष्ठाता डॉ. ए. पी. पाटील, अकॅडमिक्स विभागाचे सहअधिष्ठाता डॉ. ए. के. कोकणे, श्रीमती डॉ. ए. ए. आगाशे आदी उपस्थित होते. डॉ. ए.जे. उंबरकर, डॉ. विजय मोहाले यांनी संयोजन केले.

# वालचंद इंजिनिअरिंगमध्ये जात पडताळणी मार्गदर्शन शिबिर

प्रतिनिधी
सांगली

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता डिप्लोमा विद्यार्थ्यांकरीता, टिळक हॉल येथे, जात प्रमाणपत्र पडताळणी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बार्टी, व वालचंद इंजिनिअरिंग कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता पाटील यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत प्रा. संजीव पोफरे यांनी केले. बार्टीमार्फत संविधानाची प्रत व संविधानाची उद्देशिका डॉ. उदय दबळे यांना प्रदान करण्यात आले.

यावेळी नागनाथ चौगुले, पोलीस उपाधीक्षक संजय गिड्डे, मेघराज भाते, प्रेरणा साबळे, गणेश सव्वाखंडे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. उदय दबडे यांनी जात पडताळणी किती महत्त्वाची आहे, योग्य वेळेत सर्टिफिकेट काढणे महत्त्वाचे आहे. शैक्षणिक व नोकरी संदर्भात महत्त्व असल्याचे सांगितले. नागनाथ चौगुले यांनी जात वैधता प्रमाणपत्र कमिटी ही सेक्शन ९ प्रमाणे जुडेशियल पावर असलेली कमिटी आहे. जात वैधता प्रमाणपत्र शिवाय शासकीय योजनांचा लाभ, शिक्षण, नोकरी, निवडून आलेले प्रतिनिधी यांच्यासाठी आवश्यक आहे. शेड्युल्ड कास्ट करिता १९५० पूर्वीचे पुरावे. ओबीसी, एस. इ. बी सी. करिता १९६७ पूर्वीचे विमुक्त जाती/भटक्या जमातीकरिता १९६१ पूर्वीचे रहिवाशी पुरावे आवश्यक आहेत.



सांगली : जातपडताळणी मार्गदर्शन शिबिरात सत्कार प्रसंगी मान्यवर.

जात वडिलांकडून येते. परंतु, वडील नसतील, वडिलांची कागदपत्रे नसतील तरीसुद्धा कमिटी निर्णय घेऊन प्रमाणपत्र देऊ शकते. मुस्लिम ओबीसी समाजामध्ये जातीचा उल्लेख नसतो, संबंधित इतर पुराव्यांवर अवलंबून राहावे लागते. दरवर्षी ८० ते ९० हजार सर्टिफिकेट सांगली जिल्ह्यात देण्यात येतात. संजय गिड्डे उपाधीक्षक यांनी सांगितले, जात प्रमाणपत्र बनवताना कोणत्याही अवैध मार्गाचा उपयोग करू नका.

यावेळी वंशावळ नोटरी करण्याची किंवा पाचशे रुपयांच्या बॉण्ड पेपरवर तयार करण्याची गरज नाही, साध्या पानावर प्रतिज्ञापत्र करू शकता. विद्यार्थ्यांनी ई–मेल आयडी स्वतःचा द्यावा. अर्ज २८ फेब्रुवारीपर्यंत पाठवण्यात यावे, अशी विनंती सव्वाखंडे साहेबांनी केली. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. अशोक कांबळे, यांनी केले.



सांगली येथे वालचंद महाविद्यालयात इनक्युबेशन आणि उद्योजकतेतील तज्ज्ञ डॉ. राजेंद्र जगदाळे यांचे स्वागत करण्यात आले.

# 'वालचंद'ने स्टार्टअपच्या गरजा आता पूर्ण कराव्यात : राजेंद्र जगदाळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** वालचंद महाविद्यालय सांगली येथे दि. ११ रोजी आयोजित व्याख्यानात विज्ञान आणि तंत्रज्ञानातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी संधी या विषयावर डॉ. राजेंद्र जगदाळे यांनी मार्गदर्शन केले.

पुढे ते म्हणाले, वालचंद महाविद्यालयाने इनक्युबेशन आणि उद्योजकता केंद्र स्थापित करून विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

शिक्षण, संशोधन, उद्योग सहकार्य, इनक्युबेशन, स्टार्ट-अप्सच्या क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या करिअरच्या संधी हा व्याख्यानाचा मुख्य विषय होता.

सचिन काटे यांनीही उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी जागतिक व्यापार संधी आणि आंतरराष्ट्रीय व्यवसायात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भूमिका याबद्दलचे त्यांचे अनुभव व्यक्त केले.

डॉ. यावेळी प्रा. डॉ. उदय ए. दबडे, सी. एस. कोटीभास्कर, डॉ. एस. जी. ताम्हणकर, डॉ. ए. पी. पाटील, डॉ. ए. ए. आगाशे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम डॉ. ए. जे. उंबरकर यांनी आयोजित केला होता. संयोजन डॉ. विजय मोहाले यांनी केले. (वा. प्र.)

# वालचंद अभियांत्रिकीमध्ये जागतिक चर्चासत्र



**सांगली : वालंचदमध्ये चर्चासत्रप्रसंगी विश्वास चितळे यांचा सत्कार संचालक व प्राध्यापक.**

**प्रतिनिधी**
सांगली

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स, संगणक व आय टी. विभागाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्तरावरील चर्चा सत्र आयोजित करण्यात आले. चर्चासत्राचे उद्घाटन चितळे उद्योग समूहाचे विश्वास चितळे यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या मनोगतात तीनही प्रमुख क्षेत्रांचा ओझरता आढावा घेवून त्या क्षेत्रामुळे जग कसे व्यापून गेले आहे, हे उदाहरणासह स्पष्ट केले.

स्वागत व प्रास्ताविक डॉ.सचिन रुईकर यांनी केले. प्रभारी संचालक डॉ.यु.ए.दबडे यांनी आपल्या मनोगतामध्ये सध्याची प्रचलित तंत्रज्ञान प्रणाली किवा उत्पादनामध्ये सुधारणा करणे किवा नवीन मार्गाने त्याचा उपयोग करण्याविषयी आपले मत व्यक्त केले.

डॉ.यु.बी.देसाई यांचे एक तासाचे सदर चर्चासत्राविषयी प्रबोधनात्मक व्याखान झाले. 'शोध आणि नवोपक्रम' या विषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.डॉ.एस.जी. ताम्हणकर यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ.ए.जे उंबरकर, डॉ.आर.आर. राठोड व डॉ. एम.ए.शहा यांच्यासह शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. प्रा.टी.एस. उपाध्ये यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्र. संचालक प्रा.उदयदबडे व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन, सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले. या चर्चासत्रात विविध महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

# वालचंद महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे जागतिक चर्चासत्र

## ■ कम्युनिकेशन, इमेज प्रोसिसिंग अॅण्ड कॉम्प्युटिंगवर चर्चासत्र उत्साहात



वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये आयोजित केलेल्या जागतिक स्तरावरील चर्चासत्रात उपस्थित विश्वास चितळे, डॉ. सचिन रूईकर व अन्य.

जनप्रवास । सांगली

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स, संगणक व आय. टी. विभागाच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन कम्युनिकेशन, इमेज प्रोसिसिंग अॅण्ड कॉम्प्युटिंग (ICCI PC - २०२५) या विषयावर जागतिक स्तरावरील चर्चासत्र आयोजित केले होते.

उद्घाटनपर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून चितळे उद्योग समूहाचे विश्वास चितळे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात या कॉन्फरन्सच्या शीर्षकातील कम्युनिकेशन इमेज प्रोसेसिंग आणि कंम्पुटिंग या तीनही प्रमुख क्षेत्रांचा ओझरता आढावा घेऊन त्या क्षेत्रामुळे जग कसे व्यापून गेले आहे हे उदाहरणासह स्पष्ट केले.

सदर कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मुख्य समन्वयक डॉ. सचिन रुईकर यांनी केले. प्रभारी संचालक डॉ. यू. ए. दबडे यांनी आपल्या मनोगतामध्ये सध्याची प्रचलित तंत्रज्ञान प्रणाली किंवा उत्पादनामध्ये सुधारणा करणे किंवा नवीन मार्गाने त्याचा उपयोग करण्याविषयी आपले मत व्यक्त केले.

सध्याच्या कल्पनांमध्ये नावीन्यता आणून अधिक प्रभावी, कार्यक्षम किंवा उपयोगी आधारित उत्पादन कसे वाढविता येईल याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. श्री. यु. बी. देसाई (आय आय टी हैद्राबाद) यांचे एक तासाचे सदर चर्चासत्राविषयी प्रबोधनात्मक व्याखान झाले. शोध आणि नवोपक्रम ( इर्न्सशन इनोव्हेशन या विषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रबंधक डॉ. एस. जी. ताम्हणकर यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. ए. जे उंबरकर, डॉ. आर आरराठोड व डॉ. एम ए शहा त्याचप्रमाणे विभागामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्रा. सौ. टी. एस. उपाध्ये यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्र. संचालक प्रा. उदय दबडे व अॅडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन, सदस्यांचे मार्गदर्शन लाभले.

# वालचंदमध्ये आयसीसीआयपीसी वर चर्चासत्र

केसरी वृत्तसेवा

**सांगली:** इलेक्ट्रॉनिक्स, संगणक व आय टी. विभागाच्या Conference on Communication, Image internationalProcessing and Computing (ICCI PC २०२५) या विषयावर जागतिक स्तरावरील चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून चितळे उद्योग समूहाचे विश्वास चितळे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात या कॉन्फरन्सच्या शीर्षकातील Communication Image Processing आणि Computing या तीनही प्रमुख क्षेत्रांचा ओझरता आढावा घेवून त्या क्षेत्रामुळे जग कसे व्यापून गेले आहे हे उदाहरणासह स्पष्ट केले.

स्वागत व प्रास्ताविक मुख्य समन्वयक डॉ. सचिन रुईकर यांनी केले. प्रभारी संचालक डॉ. यु ए दबडे यांनी आपल्या मनोगतामध्ये सध्याची प्रचलित तंत्रज्ञान प्रणाली किवा उत्पादनामध्ये सुधारणा करणे किवा नवीन मार्गाने त्याचा उपयोग करण्याविषयी आपले मत व्यक्त केले. सध्याच्या कल्पनांमध्ये नावीन्यता आणून अधिक प्रभावी, कार्यक्षम किंवा उपयोगी आधारित उत्पादन कसे वाढविता येईल याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. यु. बी. देसाई (आय आय टी हैदराबाद) यांचे व्याख्यान झाले. शोध आणि नवोपक्रम insertion Innovation या विषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रबंधक डॉ. एस. जी. ताम्हणकर यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. ए. जे उंबरकर, डॉ. आर. आर. राठोड व डॉ. एम. ए. शहा ,विभागामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. श्रीमती टी. एस. उपाध्ये यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्र. संचालक प्रा. उदय दबडे व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन, सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले.



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात माहिती-तंत्रज्ञान परिषदेत हैदराबाद आयआयटीचे मार्गदर्शक डॉ. यू. बी. देसाई यांचा सत्कार करताना संचालक उदय दबडे.

# 'वालचंद'मध्ये माहिती-तंत्रज्ञान परिषद उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. १२ : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स, संगणक व माहिती-तंत्रज्ञान विभागातर्फे आंतरराष्ट्रीय परिषद झाली. इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन कम्युनिकेशन, इमेज प्रोसेसिंग अँड कॉम्प्युटिंग (आयसीसीआय पीसी - २०२५) असा परिषदेचा विषय होता.

चितळे उद्योग समूहाचे संचालक विश्वास चितळे प्रमुख पाहुणे होते. प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांची उद्घाटन सत्रास प्रमुख उपस्थिती होती.

हैदराबाद आयआयटीचे डॉ. यू. बी. देसाई यांचे व्याखान झाले. त्यांनी 'शोध आणि नवोपक्रम' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रबंधक डॉ. एस. जी. ताह्मणकर यांनी आभार मानले.

अधिष्ठाता डॉ. ए. जे उंबरकर, डॉ. आर. आर. राठोड व डॉ. एम. ए. शहा यांनी चर्चासत्रात सहभाग घेतला. प्रा. टी. एस. उपाध्ये यांनी सूत्रसंचालन केले. मुख्य समन्वयक डॉ. सचिन रुईकर यांनी प्रास्ताविक केले.

## महत्त्वाच्या घडामोडी



सांगली : 'व्हिजन २०२५' कार्यक्रमप्रसंगी मान्यवर.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात व्हिजन २०२५

**सांगली :** विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक व तांत्रिक कल्पनांना वाव देण्यासाठी एक व्यापक व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयतर्फे 'व्हिजन २०२५' या वैज्ञानिक व तांत्रिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन व्हि.जे.टी.आय. मुंबईचे संचालक प्रा.डॉ. सचिन कोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभारी संचालक प्रा.डॉ.यु.ए.दबडे उपस्थित होते. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक शिक्षणाचे धडे मिळणे आवश्यक असल्याने व्हिजन २०२५ सारख्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या वैज्ञानिक जाणीवांना वाव मिळून त्या उत्कृष्टपणे सादर करण्याची संधी मिळत आहे. महाविद्यालयाने अशाच प्रकारचे कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे, असे मत प्रा. डॉ. सचिन कोरे यांनी व्यक्त केले. दरवर्षी महाविद्यालयाच्या वतीने व्हिजन कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यावर्षी विद्यार्थ्यांचा सहभाग व उत्साह अतुलनीय असल्याचे मत प्रा. डॉ.यु.ए.दबडे यांनी व्यक्त केले. यावेळी डॉ. एस.व्ही.गायकवाड, डॉ.एस. जी.ताम्हनकर, डॉ.एम.एम.खोत, एस.यू.चव्हाण, गणेश पेरगड व इतर मान्यवर उपस्थित होते. यासाठी चेअरमन अजित गुलाबचंद, सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण आदींचे विशेष मार्गदर्शन लाभले.



सांगली : वालचंद महाविद्यालयातील व्हिजन २०२५ कार्यक्रमप्रसंगी प्रा. डॉ. सचिन डी. कोरे, प्रभारी संचालक प्रा. डॉ. यु. ए. दबडे आदी .

# वालचंद महाविद्यालयात व्हिजन २०२५ उत्साहात

जनप्रवास । सांगली

विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक व तांत्रिक कल्पनांना वाव देण्यासाठी एक व्यापक व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांच्यावतीने व्हिजन २०२५ या वैज्ञानिक व तांत्रिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. शुक्रवार दिनांक १४ मार्च पासून या प्रदर्शनास प्रारंभ झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन व्हि. जे. टी. आय. मुंबईचे संचालक प्रा. डॉ. सचिन डी. कोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. यु. ए. दबडे उपस्थित होते. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक शिक्षणाचे धडे मिळणे आवश्यक असल्याने व्हिजन २०२५ सारख्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या वैज्ञानिक जाणीवांना वाव मिळून त्या उत्कृष्टपणे सादर करण्याची संधी मिळत आहे. महाविद्यालयाने अशाच प्रकारचे कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे असे मत प्रा. डॉ. सचिन डी. कोरे यांनी व्यक्त केले.

दरवर्षी महाविद्यालयाच्यावतीने व्हिजन कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यावर्षी विद्यार्थ्यांचा सहभाग व उत्साह अतुलनीय असल्याचे मत महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. यु. ए. दबडे यांनी व्यक्त केले. यानंतर मान्यवरांनी व्हिजन २०२५ या प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध वैज्ञानिक व तांत्रिक उपक्रमांची पाहणी करून माहिती घेतली. यावेळी व्हिजन २०२५चे मुख्य समन्वयक डॉ. एस. व्ही . गायकवाड, प्रबंधक डॉ. एस. जी . ताम्हनकर, डॉ. एम. एम. खोत, एस. यू. चव्हाण, जनरल सक्रेटरी गणेश पेरगड उपस्थित होते. व्हिजन २०२५ साठी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन अजित गुलाबचंद, सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण व इतर सदस्यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात 'व्हिजन २०२५'

**केसरी वृत्तसेवा**

सांगली : विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक व तांत्रिक कल्पनांना वाव देण्यासाठी एक व्यापक व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांच्यावतीने व्हिजन २०२५ या वैज्ञानिक व तांत्रिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. शुक्रवार दि. १४ मार्चपासून या प्रदर्शनाचा प्रारंभ झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन व्हि.जे.टी.आय. मुंबईचे संचालक प्रा. डॉ. सचिन डी. कोरे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी प्रभारी संचालक प्रा. डॉ. यु. ए. दबडे उपस्थित होते.



सांगली : व्हि.जे.टी.आय. मुंबईचे संचालक डॉ. सचिन डी. कोरे यांचा सत्कार करताना प्रा. डॉ. यु. ए. दबडे आदी.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक शिक्षणाचे धडे मिळणे आवश्यक असल्याने व्हिजन २०२५ सारख्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या वैज्ञानिक जाणीवांना वाव मिळून त्या उत्कृष्टपणे सादर करण्याची संधी मिळत आहे. महाविद्यालयाने अशाच प्रकारचे कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे, असे मत प्रा. डॉ. सचिन डी. कोरे यांनी व्यक्त केले. यावर्षी विद्यार्थ्यांचा सहभाग व उत्साह अतुलनीय असल्याचे मत महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. यु. ए. दबडे यांनी व्यक्त केले. यानंतर मान्यवरांनी व्हिजन २०२५ या प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांनी सादर केलेले विविध वैज्ञानिक व तांत्रिक उपक्रमांची पाहणी करून माहिती घेतली.

या प्रदर्शनास इतर अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. यावेळी व्हिजन २०२५ चे मुख्य समन्वयक डॉ. एस. व्ही. गायकवाड, प्रबंधक डॉ. एस. जी. ताम्हनकर, डॉ. एम्. एम्. खोत, एस. यू. चव्हाण, जनरल सक्रेटरी गणेश पेरगड व इतर मान्यवर उपस्थित होते.

व्हिजन २०२५ साठी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन श्री अजित गुलाबचंद, सदस्य श्री चकोर गांधी, अमोल चव्हाण व इतर सदस्यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.




सांगली येथील वालचंद अभियांत्रिकीतर्फे डॉ. सचिन कोरे यांचा सत्कार करण्यात आला.

# 'वालचंद अभियांत्रिकी'मध्ये व्हिजन २०२५ प्रदर्शनाचे आयोजन

**सांगली :** विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक व तांत्रिक कल्पनांना वाव देण्यासाठी एक व्यापक व्यासपीठ उपलब्ध व्हावे. यासाठी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांच्या वतीने व्हिजन २०२५ या वैज्ञानिक व तांत्रिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. शुक्रवार दि. १४ मार्चपासून या प्रदर्शनाचा प्रारंभ झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन व्ही. जे. टी. आय. मुंबईचे संचालक प्रा. डॉ. सचिन डी. कोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. यु.ए. दबडे उपस्थित होते. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक शिक्षणाचे धडे मिळणे आवश्यक असल्याने व्हिजन २०२५ सारख्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यां[illegible] त्यांच्या वैज्ञानिक जाणीवांना वाव मिळू[illegible] त्या उत्कृष्टपणे सादर करण्याची संध[illegible] मिळत आहे. महाविद्यालयाने अशा[illegible] प्रकारचे कार्यक्रम आयोजित करू[illegible] विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे, असे म[illegible] प्रा. डॉ. सचिन डी. कोरे यांनी व्यक्त केले[illegible]

यावर्षी विद्यार्थ्यांचा सहभाग व उत्सा[illegible] अतुलनीय असल्याचे म[illegible] महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ[illegible] यु. ए. दबडे यांनी व्यक्त केले. यानंत[illegible] मान्यवरांनी व्हिजन २०२५ या प्रदर्शनास[illegible] भेट देऊन विद्यार्थ्यांनी सादर केलेल[illegible] विविध वैज्ञानिक व तांत्रिक उपक्रमांची पाहणी करून माहिती घेतली. (वा. प्र.)





सांगली : वालचंद महाविद्यालयातील व्हिजन उपक्रमांत आयोजित विज्ञान प्रदर्शनात मुलांशी संवाद साधताना परिक्षक विज्ञान भारतीचे जिल्हा समन्वयक सुनील देशपांडे, राजीव पुजारी, तेजस्विनी उपाध्ये आणि स्वरांजली कुलकर्णी.

# विज्ञान-संशोधनाचे 'व्हिजन' देणारे 'वालचंद अभियांत्रिकी'तील प्रदर्शन

नवतंत्रज्ञान

ज्ञानदेव मासाळ

**स्पेस एक्स यानाच्या सहाय्याने अंतराळवीर सुनीता विल्यम्स नऊ महिन्यांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर अवकाशातून पृथ्वीवर सुखरूप परतल्या. विज्ञानाचा आविष्कार जगाने '...याचि डोळा' अनुभवला. सर्वत्र मोहिमेची, विज्ञानाची चर्चा झाली. सर्वांना कुतूहल होते. विज्ञान हे असे जगण्याला पूरक ठरते. त्यासाठी विज्ञानाची रोजच्या जगण्याशी सांगड घालावी लागते. विज्ञानाची कास धरूनच जगणे सुसह्य होते. त्यासाठी विज्ञान समजून घ्यावे लागते, समजवावे लागते. असाच एक विज्ञान आविष्काराचा उपक्रम वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात पार पडला. त्याविषयी....**

विज्ञान केवळ प्रयोगशाळेत नसते, ते विचारांत आले पाहिजे. शालेय शिक्षणात हसत-खेळत ते आले पाहिजे. मराठी विज्ञान परिषद आणि विज्ञान भारती यांच्यातर्फे 'व्हिजन' उपक्रमांतर्गत आयोजित विज्ञान प्रदर्शनाचाही तोच उद्देश होता. सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित उपक्रमात सांगलीतील विविध शाळांतील नववीपर्यंतच्या दीडशेंवर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यातून मुलांमधील कल्पकता दिसून आली. त्यांच्यातील सृजनशीलतेचे दर्शन झाले. विज्ञानाची गोडी निर्माण झाली, तरच उद्याचे संशोधक घडतील. हा उपक्रम त्याचे बीजारोपण होते.

प्रदर्शनात चांद्रयान मोहीम, रोबोटिक्स, नैसर्गिक शेती, ऑटोमॅटिक पार्किंग, इलेक्ट्रोमॅग्नेटिक ट्रेन, ज्वालामुखी, रेल्वे सुरक्षा यंत्रणा, सोलर इलेक्ट्रिकल सायकल, हायड्रो जनरेशन, अँटी सुसाईड फॅन, संरक्षक रोबो, स्मार्ट खुर्ची, अनंत पथदिवे, पवन ऊर्जा असे ६० हून अधिक प्रकल्प मांडले होते. मुले या प्रत्येक प्रकल्पातील वैज्ञानिक तत्त्व धाडसाने मांडत होती. त्यातून त्यांच्या जिज्ञासा, नवकल्पनाशक्तीचे दर्शन होत होते. या सर्व मुलांचे कौतुक 'व्हीजेटीआय' मुंबईचे संचालक डॉ. सचिन कोरे यांनी त्यांच्याशी संवाद साधून केले. मराठी विज्ञान परिषद आणि विज्ञान भारतीचे जिल्हा समन्वयक सुनील देशपांडे, राजीव पुजारी यांचा परीक्षक स्वरुपात मुलांसमवेतचा संवाद अधिकचे काही देणारा होता. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. उदय दबडे, 'व्हिजन' समन्वयक शरद गायकवाड, व्यवस्थापन सदस्य अमोल चव्हाण, तेजस्विनी उपाध्ये आणि स्वरांजली कुलकर्णी यांनी या सर्व उपक्रमासाठी प्रोत्साहन दिले. सहा सर्वोत्तम प्रकल्प-प्रयोगांना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

# ‘कृत्रिम बुद्धिमत्ता, उद्याची करिअर्स’ ; ‘वालचंद’मध्ये आज व्याख्यान

## महाविद्यालयाच्या टिळक हॉल येथे आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. २६ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय आणि ‘सकाळ माध्यम समूह’ यांच्यातर्फे आयोजित व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प म्हणून महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे (एमकेसीएल) मुख्य सल्लागार विवेक सावंत मार्गदर्शन करणार आहेत. ‘कृत्रिम बुद्धिमत्ता व उद्याची करिअर्स’ यावर उद्या (ता. २७) दुपारी ४.३० वाजता महाविद्यालयाच्या टिळक हॉल येथे त्यांचे व्याख्यान होणार आहे.

वर्तमान काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) झपाट्याने विकास होत असून, त्याचा प्रभाव मानवी जीवनातील सर्वच क्षेत्रांवर पडत आहे.

अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी भविष्यातील करिअर संधींची ओळख करून घेणे आणि योग्य करिअर निवडणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर, शैक्षणिक क्षेत्रातील जाणकार म्हणून ओळख असणारे विवेक सावंत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विविध पैलूंवर, तसेच त्याच्या औद्योगिक, तांत्रिक व व्यावसायिक उपयोगांवर सखोल मार्गदर्शन करणार आहेत.

‘सकाळ माध्यम समूह’ व वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय संयुक्तपणे विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबवित असतात. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून ही व्याख्यानमाला आयोजित केली जाते. विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या नव्या संधींबाबत मार्गदर्शन मिळावे, यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

विद्यार्थी, तंत्रज्ञ, अभियांत्रिकी क्षेत्रातील अभ्यासकांसाठी हे व्याख्यान महत्त्वाचे ठरणार आहे. अधिकाधिक विद्यार्थी, नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# सावंतपूरच्या शारदा गावडे हिला ८.२५ लाखांची शिष्यवृत्ती



शारदा गावडे

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

सावंतपूर (ता. पलूस) येथील शारदा अतुल गावडे हिला ८ लाख २५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली आहे. नेदरलँडमध्ये 'एमएस' करण्यासाठी ही शिष्यवृत्ती मिळाली आहे.

जमशेटजी टाटा ट्रस्ट परदेशात उच्चशिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना मदत करते. शारदा नेदरलँडमधील टियू डेल्फ् विद्यापीठात शिकत आहे. शारदाने किर्लोस्करवाडी येथील किर्लोस्कर हायस्कूल, सांगली येथील वालचंद पॉलिटेक्निक, सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (मुंबई) व आयआयटी (मुंबई) येथे शिक्षण घेतले आहे.

# वालचंद महाविद्यालयात टेड-एक्स २०२५ कार्यक्रम उत्साहात

जनप्रवास । सांगली

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये टेड-एक्स २०२५ हा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन भारत सरकारच्या हिंदुस्तान एॅरोनॉटिकल्सचे स्वतंत्र संचालक व महाविद्यालयाच्या वित्त समितीचे सदस्य दीपक शिंदे यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले.

यावेळी प्रा. डॉ. बी. एस. गवळी, प्रबंधक डॉ. एस. जी. ताम्हणकर, करिअर व प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. संजय धायगुडे, टेड-एक्स २०२५ चे समन्वयक डॉ. एन. एल. गवाणकर, एस. डी. जगताप, टेड-एक्सचे विद्यार्थी समन्वयक कु आदिती वानखेडे, सानिया देशमुख उपस्थित होते.



वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील टेड एक्स २०२५ कार्यक्रमात उपस्थित दीपक शिंदे, प्रा. डॉ. बी. एस. गवळी, एस.जी. ताम्हणकर आदी.

कार्यक्रमात युरोलॉजिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. मकरंद खोचीकर यांनी मूत्राशयाच्या कर्करोगावरील नव्या उपचारपद्धतींवर प्रकाश टाकला. ले. ज. राजेंद्र निंभोरकर यांनी कारगिल युद्धातील अनुभव कथन केले. ओपेरॉन स्ट्रॅटेजिस्ट व मेडिकल डिव्हाइस रेग्युलेटरी कन्सल्टन्सी फर्मचे संस्थापक, सीईओ अनिल चौधरी यांनी अवचेतन मन व व्यक्तिमत्व विकास यावर अंतर्दृष्टी दिली. सॅमसंग इंडिया लिमिटेडचे वरिष्ठ अभियंता सौगत भट्टाचार्य यांनी एआय, व्हीएलएसआय आणि ब्लॉकचेन यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे भविष्य उलगडून दाखवले. सहा. पोलीस आयुक्त प्रणिल गिल्डा यांनी पोलिसिंगचे मानवी पैलू आणि जनतेच्या विश्वासाचे महत्व व आवश्यकता यावर मार्गदर्शन केले. पद्मश्री श्री. शिवराम भोजे यांनी प्रसिद्ध गायक व संगीत दिग्दर्शक अनिरुद्ध जोशी, आर.जे. देवांगण यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य श्री. चकोर गांधी, श्री. अमोल चव्हाण, तसेच प्र. संचालक प्रा. डॉ. यू. ए. दबडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# वालचंदमध्ये 'टेड-एक्स २०२५' कार्यक्रम उत्साहात

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये 'टेड-एक्स २०२५' हा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन भारत सरकारच्या हिंदुस्तान एअरोनॉटिकल्सचे स्वतंत्र संचालक व महाविद्यालयाच्या वित्त समितीचे सदस्य दीपक शिंदे-म्हैसाळकर यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. बी. एस. गवळी, प्रबंधक डॉ. एस. जी. ताम्हणकर, करिअर व प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. संजय धायगुडे, टेड-एक्स २०२५ चे समन्वयक डॉ. एन. एल. गवाणकर, एस. डी. जगताप, टेड-एक्सचे विद्यार्थी समन्वयक आदिती वानखेडे, सानिया देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.



**सांगली : वालचंद महाविद्यालयात टेड-एक्स कार्यक्रमात दीपक शिंदे-म्हैसाळकर, डॉ. बी. एस. गवळी व इतर.**

समाजासाठी नावीन्यपूर्ण कार्य करणाऱ्या मान्यवरांनी त्यांच्या अनुभवांची माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडत प्रेरणादायी विचारांची देवाण-घेवाण या व्यासपीठावरून केली. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी आपापल्या विशिष्ट अनुभवांच्या माध्यमातून एक विज्ञाननिष्ठ व मानवतावादी समाजनिर्मितीचा संदेश दिला, जो युवा वर्गाला भविष्यातील वाटचालीसाठी मार्गदर्शक ठरेल, असे मत प्रा. डॉ. बी. एस. गवळी यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे युरोलॉजिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. मकरंद खोचीकर यांनी मूत्राशयाच्या कर्करोगावरील नव्या उपचार पद्धतींवर प्रकाश टाकला. लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोरकर यांनी कारगिल युद्धातील अनुभव कथन केले. ओपेरॉन स्ट्रॅटेजिस्ट व मेडिकल डिव्हाइस रेग्युलेटरी कन्सल्टन्सी फर्मचे संस्थापक, सीईओ अनिल चौधरी यांनी अवचेतन मन व व्यक्तिमत्व विकास यावर मार्गदर्शन केले.

सॅमसंग इंडिया लिमिटेडचे वरिष्ठ अभियंता सौगत भट्टाचार्य यांनी एआय, व्हीएलएसआय आणि ब्लॉकचेन यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे भविष्य उलगडून दाखवले. सहा. पोलीस आयुक्त प्रणिल गिल्डा यांनी पोलिसिंगचे मानवी पैलू आणि जनतेच्या विश्वासाचे महत्त्व व आवश्यकता यावर मार्गदर्शन केले. अणुऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ पद्मश्री शिवराम भोजे यांनी भारताला ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याचा मार्ग स्पष्ट केला. प्रसिद्ध गायक व संगीत दिग्दर्शक अनिरुद्ध जोशी यांनी संगीताच्या क्षेत्रातील वास्तव उलगडले, तर आर. जे. देवांगणाने संघर्ष, आशा आणि आनंद यांचे महत्त्व स्वतःच्या जीवनातील घटनांतून स्पष्ट केले.

अॅडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण, तसेच प्र. संचालक प्रा. डॉ. यू. ए. दबडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.




कार्यक्रमप्रसंगी डॉ.श्यामसुंदर मिरजकर, प्रा. संजीव पोफरे यांच्यासमवेत मान्यवर.

# 'वालचंद'मध्ये महात्मा फुले डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

**जनप्रवास । सांगली**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात महात्मा जोतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती (दि. १४) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सुरुवातीला महापुरुषांचे फोटोना पुष्पहार अर्पण केले व प्रमुख पाहुणे डॉ.श्यामसुंदर मिरजकर यांचे स्वागत करण्यात आले. प्रा. संजीव पोफरे यांनी प्रास्ताविक केले व सांगितले की ११ एप्रिल ते १४ एप्रिल कालावधीत विद्यार्थ्यांसाठी चार प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या, वक्तृत्व स्पर्धा,निबंध स्पर्धा,पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धा व १६ तास अभ्यास करणे. या सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

वालचंद कॉलेजचे संचालक प्रा. डॉ. उदय दबडे सरांनी सांगितले की, हृदयात शिवराय आणि डोक्यात भीमराय ठेवले कि आयुष्यात कोणतीही लढाई जिंकता येते हा संदेश दिला.

डॉ. शामसुंदर मिरजकर यांनी उच्च शिक्षण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या संदर्भात माहिती देताना सांगितलं कि, गरीब परिस्थिती असूनही बाबासाहेबांना खूप शिकण्यासाठी त्यांचे वडिलांनी प्रोत्साहन दिले- प्रसंगी लोकांकडून पैसे उसने घेतले परंतु अभ्यासासाठी लागणारे ग्रंथ बाबासाहेबांना उपलब्ध करून दिले. जगातल्या नामवंत विद्यापीठांमध्ये शिकत असताना वेळेचा महत्त्व उपयोग केला, लक्ष विचलित होऊ दिले नाही.

यामुळे आठ वर्षांचा कोर्स त्यांना सव्वा दोन वर्षांमध्ये पूर्ण करता आला व त्या विद्यापीठातले गुणवंत विद्यार्थी म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवले. महात्मा फुले यांनी शिक्षणाला दुःखितांचा खरा आधार असे संबोधले होते. त्यांच्या विचारांचीच साखळी पुढे डॉ. आंबेडकरांनी चालवली. समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे असल्याचे नमूद केले.

आभार डॉ. सचिन कदम, अप्लाइड मेकॅनिक्स विभाग प्रमुख यांनी मानले. या कार्यक्रमास ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन अजित गुलाबचंद, सदस्य चकोर गांधी व अमोल चव्हाण यांचे मौलीक मार्गदर्शन लाभले.

# ‘वालचंद’ची वाटचाल स्वायत्त विद्यापीठाच्या दिशेने

## संचालक डॉ. उदय दबडे यांची माहिती : अभियांत्रिकीतील आंतरराष्ट्रीय ब्रँड बनविणार

सकाळ ज्ञानवाटा

“स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाची आता पूर्ण स्वायत्त तंत्रज्ञान विद्यापीठाच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. दोन वर्षांपासून आम्ही स्वतंत्र विनाअनुदानित चार विद्या शाखा सुरू केल्या असून, यासह सर्व प्रवेश प्रक्रिया गुणवत्तेच्या आधारेच होत आहे. वालचंद अभियांत्रिकी शिक्षणातील आंतरराष्ट्रीय ब्रँड विकसित करण्याचे आमचे प्रयत्न आहेत,” असे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. उदय दबडे यांनी सांगितले. ‘सकाळ’च्या ‘ज्ञानवाटा’ संवाद उपक्रमांतर्गत ते बोलत होते. यानिमित्ताने त्यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीचा आढावा घेत भविष्यातील योजनांविषयी ‘सकाळ’च्या टीमशी संवाद साधला. या चर्चेतील महत्त्वाचे मुद्दे...

### ‘एनईपी-२०२०’ची प्रभावी अंमलबजावणी

महाविद्यालयाने नवीन शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी-२०२०) दोन वर्षांपासून अनेक बदल स्वीकारत वाटचाल सुरू केली आहे. त्याआधी महाविद्यालयास २००७ मध्ये शैक्षणिक स्वायत्तता मिळाली. त्यामुळे महाविद्यालयास स्वतःचा स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्याची संधी मिळाली आहे. गुणवत्ता टिकून राहावी, मोजक्या विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करता यावे, यासाठी महाविद्यालयाने २५ वर्षांत एकदाही प्रवेश क्षमता वाढविली नाही. मात्र, विद्यार्थ्यांची मागणी आणि आस्थापनांची गरज ओळखून दोन वर्षांपूर्वी काही विषय आणि विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता (इंटेक) वाढविली. वाढलेले चारही विषय विनाअनुदानित तत्त्वावर सुरू आहेत. आस्थापनांच्या मागणीनुसार हे विषय असल्याने त्यास विद्यार्थ्यांची पसंती मिळत आहे.

### सर्व प्रवेश गुणवत्तेवरच

‘वालचंद’ स्वायत्त असल्याने १०० जागा राज्यस्तरीय प्रवेश प्रक्रियेतून भरल्या जातात. पदवी अभ्यासक्रमासाठी सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, कॉम्प्युटर सायन्स (सीएस) आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयटी) या अनुदानित विषयांसाठी ३९० प्रवेश क्षमता आहे. पंतप्रधान कोटा, पूर्व आणि उत्तर भारतातील राज्ये, अनिवासी भारतीय यांच्यासाठी राखीव मिळून ४५० जागा भरल्या जातात. ‘सी.एस.’ आणि ‘आय.टी.’कडे विद्यार्थ्यांचा कल वाढलेला आहे. ही बाब लक्षात घेता, विनाअनुदानित तत्त्वावर सी.एस.च्या ९० जागा, आय.टी.च्या ६० जागा वाढविल्या आहेत. याशिवाय, आस्थापनांच्या मागणीनुसार ‘एआयएमएल’ आणि रोबोटिक्स ऑटोमेशनच्या प्रत्येकी ६० जागा वाढविल्या आहेत. विनाअनुदनित महाविद्यालयांसाठी १०० पैकी २० टक्के जागा राखीव ठेवण्याची मुभा असते. मात्र, गुणवत्तेत कुठलीही तडजोड होऊ नये, यासाठी संस्थेचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांनी राखीव जागांचा ‘कोटा’न स्वीकारता, त्या जागादेखील राज्यस्तरीय प्रवेश प्रक्रियेतून भरण्याची अनुमती दिली आहे. यातील एकही जागा महाविद्यालयाकडून भरली जात नाही. शंभर टक्के गुणवत्तेवरच प्रवेश होतात. अनुदानितपेक्षा आणि विनाअनुदानित अभ्यासक्रमांचे शुल्क सध्या दहा हजारांनी कमीच आहे. दोन्ही मिळून एकूण ६६० जागा असून ७९२ जागा भरल्या जातात.





डॉ. उदय दबडे

### ‘एमटेक’साठी प्रतिसाद

पदव्युत्तर पदवीच्या (एमटेक) महाविद्यालयात ११ शाखा आहेत. २०२२-२०२३ वर्षात ५३ जागा, २०२३-२०२४ वर्षात ८३ जागा, २०२४-२०२५ वर्षात १२३ जागा भरल्या आहेत. दरवर्षी हे प्रमाण वाढत आहे. देशभरात एम. टेक.कडे ओढा कमी असताना आमच्या महाविद्यालयाकडे मात्र प्रवेश वाढत आहेत. महाविद्यालयाची प्रवेश क्षमता १७२ असून, त्यापैकी ७५ टक्के प्रवेश झाले आहेत. राज्यातील नामांकित संस्थांपेक्षा ही संख्या समाधानकारक आहे. यातील स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगच्या ३० जागा आहेत, तर ३३ जागांवर प्रवेश झाले आहेत. कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंटसाठी १० जागा आहेत, तर १२ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे.

### विद्यार्थी देवाणघेवाण

‘इनपॉवर्ड ऑटोनॉमी’ असलेली शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात चार महाविद्यालये आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रावर शिवाजी विद्यापीठासमवेत ‘वालचंद’चे देखील बोधचिन्ह असते. या स्वायत्ततेनुसार मूल्यवर्धित अभ्यासक्रम आम्ही सुरू करू शकतो. या महाविद्यालयातील विद्यार्थी त्याला दुसरा अभ्यासक्रम करायचा असेल, तर दुसऱ्या महाविद्यालयातील किंवा ‘वालचंद’मध्ये शिकू शकतात. ‘वालचंद’ने पुण्याच्या सीईओपी, नांदेडच्या एसजीजीएस, कऱ्हाडचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबईच्या व्हीजेटीआय, गोव्याच्या ‘बीटस्’सोबत सामंजस्य करार केले आहेत. त्यानुसार तेथील विद्यार्थ्यांनाही आमच्याकडे संधी उपलब्ध होत आहे.

### सुसज्ज ग्रंथालय-सुविधा

महाविद्यालयाचे ग्रंथालय ही आमची ‘ॲसेट’ आहे. नियामक मंडळाचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांनी या ग्रंथालय इमारतीसाठी ५ कोटींची देणगी दिली. अभियांत्रिकीची सुमारे १ लाख ग्रंथांची समृद्धी आहे. प्रतिवर्षी ४० लाख रुपये आम्ही ऑनलाइन जर्नलसाठी खर्च करतो. त्याचा लाभ आमचेच नव्हे तर अन्य महाविद्यालयांचे विद्यार्थीही लाभ घेतात. विद्यार्थ्यांसाठी १२ तास ग्रंथालय सुरू असते, तर अभ्यासिका मुलांसाठी अहोरात्र उघडी असते. आम्ही मनुष्यबळाच्या पातळीवरही काळजी घेतली असून, केवळ एक जागा मंजूर असून, ३ ग्रंथपाल नेमले आहेत.

संपूर्ण परिसर वाय-फाय असून, अनेक नियतकालिके थेट ऑनलाईन उपलब्ध असतात. स्पर्धा परीक्षांसाठीही आवश्यक ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यामुळे प्रतिवर्षीच्या आयएएस यादीत आमचे विद्यार्थी हमखास चमकतात.

### उद्योग संवाद

महाविद्यालयाने ‘जटायू’, ‘स्वयंपूर्णा’, ‘वरदान’ ही संगणक प्रणाली विकसित केली आहे. महाविद्यालयाकडून शासनाच्या विविध विकासकामांच्या ऑडिटची जबाबदारी घेतली जाते. त्यातून यावर्षी तीन कोटींचा निधी महाविद्यालयाला मिळाला आहे. स्थानिक इथल्या उद्योगाशी तंत्रज्ञानाच्या पातळीवर संवाद घडावा, तो वाढावा, यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. अभियंता हा उद्योगांची गरज आहे. त्याच्या शिक्षणाची जबाबदारी उद्योगाने घ्यायला हवी. त्यासाठीही प्रयत्न करणार आहोत.

### सुसज्ज क्रीडा सुविधा

महाविद्यालयाचे क्रीडा संकुल विकसित करण्यासाठी आम्ही विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. मूलभूत सुविधांसाठीचे प्रयत्न सुरू आहेत. आराखड्यानुसार पहिल्या टप्प्यात तीन कोटींचा खर्च सुरू आहे. क्रीडा समन्वयक नेमले आहेत. छोटा जलतरण तलावही तयार करण्यात येणार आहे. वसतिगृहाच्या डागडुजीचे काम करण्यात येत आहे.

### आर्थिक स्वायत्ततेकडे

महाविद्यालयाच्या एकूण वार्षिक अंदाजपत्रकाचा विचार करता आम्हाला शासनाकडून वेतनासह अन्य सुविधांसाठी मिळणारी रक्कम एकूण खर्चाच्या चाळीस टक्केच आहे. उर्वरित सर्व रक्कम आम्ही स्वनिधीतून उभी करीत आहोत. गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, सदस्य अमोल चव्हाण यांच्यासह सर्व सदस्यांनी महाविद्यालय आर्थिकदृष्ट्याही स्वयंपूर्ण व्हावे. त्याचवेळी गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड करता कामा नये, असा त्यांचा आग्रह आहे. त्यांचे ‘वालचंद अभियांत्रिकी विद्यापीठ’ निर्माण व्हावे हे ध्येय आहे. सध्या महाविद्यालयात २ हजार ३२९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचीनुसार विद्यापीठ निर्मितीसाठी तीन हजार विद्यार्थ्यांची आवश्यकता असते. आम्ही हा टप्पा तीन वर्षांत पूर्ण करू.

### जगभरातून मागणी

महाविद्यालयात देश-परदेशातील शंभरावर नामवंत कंपन्यांच्या वर्षभरात कॅम्पस मुलाखतीसाठी येतात. गुणवत्तेच्या बळावर कायम असल्याने आजही ८५ टक्के विद्यार्थ्यांना ‘कॅम्पस’द्वारेच हमखास नोकरीची संधी मिळत आहे. सरासरी नऊ लाख वार्षिक पॅकेज मिळत आहे. त्यापैकी पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी १२ लाखांपेक्षा अधिक पॅकेजचे आहेत. आमची माजी विद्यार्थी संघटना सक्षम असून, त्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य महाविद्यालयास मिळत आहे. त्यांच्यामुळे आमची जगभरात ओळख तयार झाली आहे.




सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय येथे महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना मान्यवर.

# 'वालचंद'मध्ये महात्मा फुले, डॉ. आंबेडकर संयुक्त जयंती

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली** : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय येथे महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती दि. १४ एप्रिल रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. सुरुवातीला महापुरुषांच्या फोटोंना पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी डॉ. शामसुंदर मिरजकर, वालचंद कॉलेजचे संचालक डॉ. उदय दबडे, अॅडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन अजित गुलाबचंद, सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण, डॉ. सचिन कदम आदी उपस्थित होते.

# 'वालचंद अभियांत्रिकी'मध्ये महापुरुषांची जयंती साजरी

सांगली, ता. १६ : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात महात्मा जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला.

प्रमुख पाहुणे डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांचे स्वागत करण्यात आले. प्रा. संजीव पोफरे यांनी प्रास्ताविक केले.

ते म्हणाले की, ११ ते १४ एप्रिल या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी चार प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या - वक्तृत्व, निबंध, पोस्टर प्रेसेंटेशन व १६ तास अभ्यास करणे. या सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

'वालचंद'चे संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सचिन कदम यांनी आभार मानले.

# वालचंद अभियांत्रिकीत म. फुले, डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**प्रतिनिधी**
सांगली

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. प्रा. संजीव पोफरे यांनी प्रास्ताविक केले. वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धा व १६ तास अभ्यास करणे स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

प्रा. डॉ. उदय दबडे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे वीस पेक्षा जास्त पदव्या व त्यांना दहा पेक्षा जास्त भाषा येत होत्या, हे त्यांनी अतिशय कष्टाने शिकून प्राप्त केल्या होत्या. डॉ. आंबेडकर यांचे जीवन म्हणजे ज्ञानासाठी, आत्मसन्मानासाठी आणि सामाजिक न्यायासाठी अखंड संघर्षाची प्रेरणादायक कहाणी आहे. भारतातले पहिलेच नव्हे तर जगातील अग्रगण्य विचारवंत ठरले. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा मूलाधार आहे, हे बाबासाहेबांनी ओळखले होते. मागासवर्गीय, शोषित व उपेक्षित समाजासाठी उच्च शिक्षणाचे दरवाजे खुले केले. त्यांनी वाचनालयांचे महत्त्व अधोरेखित केले आणि विद्यार्थ्यांना वाचनसंस्कार देण्यावर भर दिला. हृदयात शिवराय आणि डोक्यात भिमराय ठेवले कि आयुष्यात कोणतीही लढाई जिंकता येते हा संदेश शेवटी दिला.

डॉ. शामसुंदर मिरजकर यांनी या संदर्भात माहिती देताना सांगितले कि, गरीब परिस्थिती असूनही बाबासाहेबांना शिकण्यासाठी वडिलांनी प्रोत्साहन दिले

समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे असल्याचे नमूद केले. आभार डॉ. सचिन कदम यांनी मानले. यावेळी अजित गुलाबचंद व अमोल चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.





**सांगली : वालचंद अभियांत्रिकीमध्ये प्रतिमापूजन करताना मान्यवर.**

# तासगावचे राजाराम माने 'महावितरण'चे मुख्य अभियंता

सांगली, ता. १८ : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीत मुख्य अभियंतापदी राजाराम माने यांची नियुक्ती झाली आहे. तासगावचे माने मोठ्या कष्टाने पदापर्यंत पोहोचले आहेत. सध्या त्यांच्याकडे नांदेड महसूल विभागपदाची जबाबदारी आहे. त्यांची नांदेड परिमंडळ, महावितरण येथे नियुक्ती झाली आहे.

मूळचे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील १९९२ च्या इलेक्ट्रिकल्स शाखेचे विद्यार्थी आहेत. १९९७ मध्ये ते वीज मंडळात कनिष्ठ अभियंता पदावर रुजू झाले. त्यांनी उपकार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता पदावर अलिबाग, सातारा, पनवेल येथे काम केले. २०१९ मध्ये सरळ सेवा भरतीद्वारे अधीक्षक अभियंतापदी नवी मुंबई, वाशी येथे नियुक्ती झाली. परभणी, रायगड जिल्ह्यांत अधीक्षक अभियंतापदी काम केले. कोरोना काळात मुंबई ठप्प असताना त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. अलिबाग विभाग येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असताना कल्याण परिमंडळातील उत्कृष्ट कामाबद्दल ऊर्जा मंत्र्यांच्या हस्ते त्यांचा गौरव झाला. तासगाव येथील धनगर समाजाच्यावतीने शनिवारी (ता. १९) समृद्धी मंगल कार्यालयात सत्कार होणार आहे.



राजाराम माने

# सांगलीकर रसिकांना भावला 'तेंडल्या'

## 'सकाळ'तर्फे आयोजन; मान्यवरांच्या उपस्थितीत विशेष स्क्रीनिंग

■ **सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. २३ : क्रिकेट आणि सचिन तेंडुलकर हे समीकरण असणारा 'तो' काळ...गज्या व तेंडल्या दोघे कट्टर सचिनप्रेमी... दुर्गम शिराळा तालुक्यातील या दोघांचा क्रिकेट हाच धर्म... त्यासाठी काहीही करायला तयार असणारे...क्रिकेट खेळणं व रंगीत टीव्हीवर क्रिकेट पाहण्याचं स्वप्नं...ही हौस पूर्ण करताना वाटेत येणारे अडथळे...अशी क्रिकेटवेड असणाऱ्या पिढीची कथा सांगणारा 'तेंडल्या' सांगलीकर रसिकांना चांगलाच भावला. 'सकाळ'तर्फे या चित्रपटाचे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या टिळक हॉलमध्ये विशेष स्क्रीनिंग झाले.

शिराळा तालुक्यातील सचिन जाधव या धडपड्या युवकाने जिद्दीने हा चित्रपट साकारला आहे. ९० च्या दशकातील आणि २००० च्या सुरुवातीच्या काळातील क्रिकेटवेड जपणाऱ्या पिढीच्या आठवणींना उजाळा देणारा हा चित्रपट स्थानिक कलाकारांनी अत्यंत प्रभावीपणे साकारला आहे.



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात तेंडल्या चित्रपटाच्या विशेष स्क्रीनिंगप्रसंगी 'तेंडल्या आपल्या दारी' या मोहिमेच्या पोस्टर अनावरणप्रसंगी प्रा. गौतमीपुत्र कांबळे, लेखक व दिग्दर्शक सचिन जाधव, रमेश दबडे, प्रा. सोनवणे.

### 'तेंडल्या आपल्या दारी' पोस्टरचे अनावरण

■ प्रचंड संघर्षातून या चित्रपटाची निर्मिती केल्यानंतर प्रदर्शनाच्या वेळीस दुर्दैवाने कोरोनाची लाट आली. त्यामुळे अडचणी वाढल्या. चित्रपट घराघरांत नेण्यासाठी निर्माते जाधव यांनी 'तेंडल्या आपल्या दारी' ही मोहीम सुरू केली आहे. वालचंद महाविद्यालयाचे संचालक डॉ. यू. ए. दबडे, प्रा. सोनवणे, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, चित्रपटाचे दिग्दर्शक व निर्माते सचिन जाधव, 'सकाळ'चे सहयोगी संपादक शेखर जोशी यांच्याहस्ते 'तेंडल्या आपल्या दारी' या मोहिमेच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले.

श्री. जाधव म्हणाले, 'चित्रपटात सुमारे २५ कलाकार आहेत. मात्र त्यांच्या 'एक से बढकर एक' भूमिकांना रसिकांनी दाद दिली. खुद्द भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी या चित्रपटाचे कौतुक करून ग्रामीण भागातही क्रिकेट व माझी इतकी 'क्रेझ' असल्याचे हा चित्रपट पाहूनच कळाले, अशी प्रतिक्रिया दिल्याचे निर्माते जाधव यांनी सांगितले.'

'सकाळ'चे सहयोगी संपादक शेखर जोशी म्हणाले, 'सकाळ'ने या चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग करण्याचे कारण म्हणजे हा आपल्या जिल्ह्यातील लोकांनी साकारलेला चित्रपट असून त्यामागे प्रचंड संघर्ष आहे. तो संघर्ष लोकांसमोर यावा, यासाठी हा प्रयत्न आहे. विविध संस्था, संघटनांनी या चित्रपटाचे आयोजन करावे.' प्रा. गौतमीपुत्र कांबळे, अभिजित पाटील, श्रीकांत तारळेकर, रोटरी क्लब ऑफ मिडटाउनचे प्रशांत घोडके, इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. रवींद्र मोहिते, क्रिडाईचे माजी अध्यक्ष जयराज सगरे, अजय देशमुख व मान्यवर उपस्थित होते.

# ‘वालचंद’मध्ये विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान

सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे दहावी ते बारावीतील विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकीच्या विविध शाखांचा थेट अनुभव, सखोल माहिती आणि व्यावहारिक दृष्टिकोन मिळावा, यासाठी तीन दिवस व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. ‘अनबॉक्स इंजिनिअरिंग’ उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना माहिती दिली जाणार आहे. वालचंद कॉलेजमध्ये १९ ते २३ अखेर सकाळी ९ ते १२ दरम्यान व्याख्यान होणार आहे. यामध्ये सीएसई, आयटी, इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल, मेकॅनिकलसह अन्य शाखांची व्याख्याने, तसेच एआय ऑटोमेशन, डिझाईन थिंकिंग व प्रोजेक्टवर आधारित व्याखाने, कॉलेजची लायब्ररी व अकॅडमिक विंगची भेट, इंटरडिसिप्लिनरी अभ्यासाचा परिचय, विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणारे विचार व अनुभवसंपन्न मार्गदर्शन केले जाणार आहे.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र दिनाचे आयोजन

**जनप्रवास । सांगली**

सन २०२५ मध्ये औपचारिक शिक्षण संपवून उत्तीर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष व्यावसायिक जीवनात पदार्पण करणाऱ्या पदवी प्रमाणपत्र दिनाचे बॅचच्या (Commencement Day) चे आयोजन करण्यात आले आहे.

सदरचा कार्यक्रम वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय सांगली येथे गुरुवार दिनांक २९ मे रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटीव्ह कौन्सिल आणि फायनान्स समितीचे सदस्य प्रथितयश अर्थतज्ञ श्री. चकोर गांधी यांचे उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे.

महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य आणि माजी खा. संजयकाका पाटील हे प्रमुख पाहुणे व डॉ. एन. सी. शिवप्रकाश, निवृत्त प्राध्यापक, आयआयएससी बेंगलोर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हे मान्यवर याप्रसंगी Commencement Day ला संबोधन करतील. विद्यार्थ्यांनी व्यावसायिक जीवनामध्ये कशा प्रकारे मार्गक्रमण केले पाहिजे याबाबतचे मौलिक उदबोधन त्यांच्याकडून केले जाईल. याप्रसंगी उच्च व्यावसायिक मूल्ये जपणारी प्रतिज्ञा विद्यार्थ्यांना दिली जाईल.

कोविड-१९ मुळे गेल्या काही वर्षात खंडित झालेली परंपरा पुन्हा २०२४ पासून सुरु केली असून स्वायत्त पदवी अभ्यासक्रमाच्या पंधराव्या बॅचच्या विद्यार्थ्यांना या कार्यक्रमांमध्ये गुणपत्रिका प्रदान करण्यात येतील. २०२५ मध्ये पदवी आणि २०२४ मध्ये पदव्युत्तर उत्तीर्ण बॅचमधील गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण, रोप्य आणि कांस्यपदके तसेच सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थी आणि सर्वोत्कृष्ट खेळाडूस सुवर्णपदक प्रदान केली जातील. या कार्यक्रमात G-TE, GRE, C-T तसेच यूपीएससी एमपीएससी या स्पर्धा परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या तसेच प्रचंड स्पर्धेतून स्वतःला सिध्द करुन प्रथितयश कंपन्यामध्ये नोकरी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कारही या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांना देखील आमंत्रित करण्यात आले असून, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि हितचिंतक यांनी या समारंभास उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी केले आहे.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात Commencement Day चे आयोजन

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली** : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय सांगली येथे गुरुवार, दि. २९ मे रोजी सकाळी १० वाजता औपचारिक शिक्षण संपवून उत्तीर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष व्यावसायिक जीवनात पदार्पण करणाऱ्या बॅचच्या Commencement Day चे आयोजन करण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या ऍडमिनि-स्ट्रेटीव्ह कौन्सिल आणि फायनान्स समितीचे सदस्य अर्थतज्ज्ञ चकोर गांधी यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्रांगणात या कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आलेले आहे. महाविद्यालयाच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य आणि माजी खासदार संजय पाटील हे प्रमुख पाहुणे व डॉ. एन. सी. शिवप्रकाश, निवृत्त प्राध्यापक, आयआयएससी बेंगलोर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विद्यार्थ्यांनी व्यावसायिक जीवनामध्ये कशा प्रकारे मार्गक्रमण केले पाहिजे याबाबतचे मौलिक उद्‌बोधन त्यांच्याकडून केले जाईल.

कोविड-१९ मुळे गेल्या काही वर्षात खंडित झालेली परंपरा पुन्हा २०२४ पासून सुरु केली असून स्वायत्त पदवी अभ्यासक्रमाच्या पंधराव्या बॅचच्या विद्यार्थ्यांना या कार्यक्रमांमध्ये गुणपत्रिका प्रदान करण्यात येतील. २०२५ मध्ये पदवी आणि २०२४ मध्ये पदव्युत्तर उत्तीर्ण बॅचमधील गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण, रोप्य आणि कांस्यपदके तसेच सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थी आणि सर्वोत्कृष्ट खेळाडूस सुवर्णपदक प्रदान केली जातील. या कार्यक्रमात GTE, GRE, CT तसेच यूपीएससी एमपीएससी या स्पर्धा परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या तसेच स्पर्धेतून स्वतःला सिध्द करुन प्रथितयश कंपन्यामध्ये नोकरी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कारही या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांना देखील आमंत्रित करण्यात आले असून, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि हितचिंतक यांनी या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी केले आहे.

# ‘वालचंद’च्या जय शिरगुप्पे याला दीड कोटीचे विक्रमी पॅकेज

## बंगळुरूच्या रोब्रीक इंडिया कंपनीकडून ऑफर

केसरी वृत्तसेवा

**सांगली** : येथील वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंगच्या अंतिम वर्षाचा विद्यार्थी जय शिरगुप्पे याला रोब्रीक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून विक्रमी दीड कोटीचे पॅकेज मिळाले आहे. वालचंद कॉलेजच्या इतिहासात हे सर्वात मोठे पॅकेज आहे. कॉलजने इंस्टाग्राम या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर जय शिरगुप्पे याची माहिती शेअर केली आहे. जयच्या या यशाबद्दल त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



जय शिरगुप्पे

जय शिरगुप्पे हा वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंगमध्ये बी. टेक. कॉम्प्युटर सायन्सच्या अंतिम वर्षाला आहे. यावर्षी जानेवारीपासून जय हा बेंगलोर येथे याच कंपनीत इंटर्नशिप करत असून, इंटर्नशिप दरम्यान त्याला कंपनीने एक लाख ७५ हजार रुपये प्रति महिना इतका स्टायपेंड दिला आहे. रोब्रीक इंडिया ही सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगमधील अग्रगण्य कंपनी आहे.

पुण्याच्या एसएनपीबी ज्युनियर कॉलेजमध्ये यशने उच्च माध्यमिक शिक्षण घेतले आहे. यश हा स्पर्धात्मक प्रोग्रामर असून, गणित हा त्याचा सर्वात जास्त आवडीचा विषय आहे.

इंस्टाग्राम या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वालचंद कॉलेजने शिरगुप्पे याची माहिती शेअर केली असून, त्याला कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिल, प्राध्यापक, आजी आणि माजी विद्यार्थ्यांनी शुभेच्छा दिल्या.

# ‘वालचंद’च्या विद्यार्थ्यांचा उद्या प्रारंभ दिन समारंभ

## चकोर गांधी, डॉ. शिवप्रकाश प्रमुख पाहुणे

**सकाळ वृत्तसेवा**




सांगली, ता. २७ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा १५ वा कमिन्समेंट (प्रारंभ दिन) समारंभ गुरुवारी (ता. २९) आहे. यंदाच्या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या आर्थिक कमिटी अँड व्यवस्थापन कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी यांची प्रमुख उपस्थिती आहे.

यावेळी विविध विद्याशाखांच्या बी. टेक. आणि एम. टेक.च्या साडेपाचशे विद्यार्थ्यांना गुणपत्रिका, प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. ही माहिती प्रभारी संचालक उदय दबडे यांनी दिली. महाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळी साडेदहा वाजता कार्यक्रमास प्रारंभ होईल. स्वातंत्र्यपूर्व काळापासून अभियांत्रिकी शिक्षणाचा पाया घालणाऱ्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाला स्वायत्ततेचा दर्जा मिळाल्यापासून यंदाचा १५ वा समारंभ होत आहे. याआधी ज्येष्ठ नेते शरद पवार, नितीन गडकरी, उद्योजक अजित गुलाबचंद यांच्यासह मान्यवरांनी समारंभाचे पाहुणे म्हणून उपस्थिती लावली आहे. विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी अविस्मरणीय असा हा समारंभ असतो. यंदा माजी खासदार संजय पाटील, बंगळूरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे माजी प्रोफेसर डॉ. एन. सी. शिवप्रकाश उपस्थित राहणार आहेत.

# ‘वालचंद’च्या जयला दीड कोटींचे पॅकेज

## अमेरिकेच्या रुबरिक कंपनीकडून महाविद्यालयाच्या इतिहासातील उच्चांकी वार्षिक वेतन

**सकाळ वृत्तसेवा**



जय शिरगुप्पे, अंकिता डोंगरे, प्रज्वल शहा, आराध्य पित्तलवार, कुणाल गिराडकर, वैष्णवी लोखंडे

सांगली, ता. २८ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील जय शिरगुप्पे या विद्यार्थ्याला डाटा सुरक्षा क्षेत्रात काम करणाऱ्या अमेरिकेतील बहुराष्ट्रीय रुबरिक कंपनीने तब्बल दीड कोटींचे वार्षिक पॅकेज देऊ केले आहे. महाविद्यालयाच्या इतिहासातील हे उच्चांकी पॅकेज आहे. कँपस मुलाखतीतून महाविद्यालयातील ८४ टक्के विद्यार्थ्यांना सरासरी दहा लाखांहून अधिक रुपयांचे पॅकेज मिळाले आहे. आज महाविद्यालयाचा स्वायत्तता प्राप्त झाल्यानंतरचा १५ वा प्रारंभ दिन समारंभ होत आहे.

यंदाच्या २०२४-२५ या शैक्षिणक वर्षात महाविद्यालयाच्या कार्पोरेट रिलेशन, माजी विद्यार्थी व विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने वर्षभरात ११६ कंपन्यांनी कॅम्पस मुलाखती घेतल्या. त्यात गुगल, ॲमेझॉन, मायक्रोसॉफ्ट, क्रेड, केडन्स, ॲप्लाईड मटेरियल, युनायटेड बँक ऑफ स्वित्झरलँड, स्नायडर, इटॉन इंटरनॅशनल, सीमेन्स, फिलिप्स, ओरॅकल, हनिवेल ऑटोमेशन, महानगर गॅस, टीसीएस, टाटा पॉवर, एलअँडटी, अदानी, रिलायन्स, टाटा ग्रुप ऑफ कंपनीज, बॉश, कॅप जेमिनी, ॲटलॉस, हिंदुस्थान युनिलिव्हर, कमिन्स, जेकब्ज, रेक्सल इंडिया आदी कंपन्यांनी सहभाग घेतला.

कंपनीनिहाय विद्यार्थी व कंसात त्यांना मिळालेले वार्षिक वेतन : गुगल : यशस्वी पाटील, अंकिता डोंगरे, साक्षी धामापूरकर (प्रत्येकी ५४ लाख), मायक्रोसॉफ्ट : वैष्णवी लोखंडे (५२.५), क्रेड : आराध्य पित्तलवार, प्रज्वल शहा (५२), ॲडोबी : कृणाल गिराडकर (४८), ॲमेझान : रिद्धी शहा, हरिश्री वैद्य, नंदिनी गिते, सानिका पाटील, सृजन मुजावर, ऋतुजा मदने (प्रत्येकी ४२ लाख), वेफेअर : श्रावणी उमरे, ज्योतिरादित्य पाटील, तुषार राठोड (२५), क्वाईन स्वीच : पंकज भोसले, हर्ष कारवा (२५), डेल : स्वप्नील खोत (२१), डॉईश बँक : मधुसूदन काबरा, सौरभ राजोपाध्ये, दत्ता गांगजी, मनीष बर्गे, सोहम अध्यापक, विराज पाटील (२०.५), ॲप्लाईड मटेरियल : नीरज पात्रडकर, सुदर्शन लबडे (२०), ध्रुवा सॉफ्टवेअर : स्मित बुटाले (१७.५), टॉम टॉम इंटरनॅशनल : विश्वास नलावडे (१५.७), युनायटेड बँक ऑफ स्वित्झरलँड : शुभम पाटील, अभिषेक लहासे, आदित्य पाटील, अंशुल गीड, आशिष सुतार, हिमांशू मुडे, कैलास पाटील, प्रथमेश बसापुरे, राहुल रेवाण्णा, सानिका मांडरे, श्रेयस नरुले, श्रीया पाटील, सिध्दांत शिंदे, विराज टाकुणे (१४.५). याशिवाय अन्य विद्यार्थ्यांनी केंद्र व राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्येही यश मिळवले आहे.

### मराठीतून प्राथमिक शिक्षण

सर्वाधिक उच्चांकी वेतन मिळालेल्या जय शिरगुप्पे याचे प्राथमिक शिक्षण सांगलीतील विश्रामबाग येथील सावरकर प्रशालेत, तसेच पुण्यातील प्रियदर्शिनी विद्यालय आणि पन्हाळा पब्लिक स्कूल येथे मराठी आणि इंग्रजी माध्यमातून झाले आहे. आई सुनीता गृहिणी तर वडील नितीन केएसबी पंपस् येथे अभियंता म्हणून कार्यरत आहेत. तो ‘वालचंद’च्या २०२४-२५ मधील संगणक शाखेचा विद्यार्थी आहे. रुबरिक कंपनीने त्याला महाविद्यालयात शिकत असतानाच दरमहा १.७५ हजार रुपयांचे विद्यावेतन दिले होते. डेटा सुरक्षा विद्याशाखेत त्याचे संशोधन सुरू आहे.

### देशव्यापी योगदान

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या वालचंद महाविद्यालयाने देशउभारणीत अविरत योगदान दिले आहे. महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण, माजी खासदार संजय पाटील, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, दीपक शिंदे-म्हैसाळकर यांचे प्रोत्साहन मिळत आहे. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय हा देशभरात लौकिक कायम ठेवला आहे.

“ माहिती-तंत्रज्ञान, बांधकाम, ऊर्जा, वाहन, अपारंपरिक उर्जा अशा विविध क्षेत्रांतील ११६ कंपन्यांनी यावर्षी कॅम्पस मुलाखतींसाठी उपस्थिती लावली. त्यात सहभागी ४१२ जणांपैकी ३५१ जणांना आजपर्यंत नोकरी मिळाली आहे. सरासरी साडेदहा लाखांचे वार्षिक वेतन मिळाले असून ४0 लाखांहून अधिक व पंधरा लाखांहून अधिक वार्षिक वेतन मिळालेले अनुक्रमे ११ व ३९ विद्यार्थी आहेत. जगभरातील नामवंत कंपन्यांची महाविद्यालयाला दिलेली पसंती उच्च गुणवत्तेची पावती आहे.

**- प्रा. संजय धायगुडे**, अधिष्ठाता, कार्पोरेट रिलेशन, माजी विद्यार्थी व विद्यार्थी कल्याण

# शाश्वत विकासासाठी अभियंत्यांनी योगदान द्यावे

## डॉ. एन. सी. शिवप्रकाश : स्वायत्त 'वालचंद'चा पंधरावा प्रारंभ दिन जल्लोषात

■ सकाळ वृत्तसेवा

**सांगली, ता. २९ : देशाच्या शाश्वत विकासात अभियंत्यांनी योगदान द्यावे. आगामी काळात सर्व क्षेत्रांत समतोल विकासाचे आव्हान आहे. ते पेलण्याचा संकल्प करा, असे आवाहन बंगळूर येथील 'आयआयएससी'चे डॉ. एन. सी. शिवप्रकाश यांनी आज केले. येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. महाविद्यालयाच्या प्रशासकीय मंडळाचे सदस्य व माजी खासदार संजय पाटील अध्यक्षस्थानी होते. मंडळाचे संस्थेच्या सदस्य चकोर गांधी, प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयास स्वायत्तता प्राप्त झाल्यानंतरचा १५ वा प्रारंभ दिन होता.**





सांगली : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमांत दीपप्रज्वलनप्रसंगी बंगळूर येथील 'आयआयएससी' चे प्रा. डॉ. एन. सी. शिवप्रकाश, माजी खासदार संजय पाटील, चकोर गांधी, प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे व मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित विद्यार्थी.

प्रा. शिवप्रकाश म्हणाले, 'देशातील मोजक्या महाविद्यालयात 'वालचंद'ची ख्याती आहे. तुम्ही गुणवत्ता सिद्ध केली आहे आता त्याला कष्ट, चिकाटी, एकसंधत्वाची भावना आणि नेतृत्व गुणांची जोड द्या. कमी साधनसामग्री असतानादेखील अंगभूत क्षमतांचा अधिक वापर करणे गरजेचे आहे. थोर शास्त्रज्ञ भारतरत्न सी. व्ही. रामन यांचे शंभर वर्षांपूर्वीचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आणि प्रेरणादायी ठरतात. तुम्ही व्यावसायिक जीवनात पदार्पण करीत आहात. हा प्रारंभ आहे. रोज नव्या तंत्रज्ञानाला सामोरे जाणार आहात. ते आत्मसात करीत राहा. देशापुढची आव्हाने शाश्वत विकासाची आहेत. त्यात तुमचे योगदान महत्त्वाचे असेल. आपली स्पर्धा जगाशी आहे आणि ती देशपुढील समस्यांशी आहे.''

माजी खासदार संजय पाटील म्हणाले, 'वालचंदचा इतिहास देदीप्यमान आहे. जगाच्या कानाकोपऱ्यांत इथले विद्यार्थी उच्च स्थानी आहेत. महाविद्यालयाचा हा वारसा जपला पाहिजे. महाविद्यालयाचे व्यापारीकरण होऊ दिले नाही. महाविद्यालयाने प्रगतीचा आलेख कायम ठेवला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून महाविद्यालयाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू.'

प्रशासकीय मंडळाचे सदस्य गांधी म्हणाले, ''महाविद्यालयाची वाटचाल विविध आव्हानांना सामोरे जात असून, अजित गुलाबचंद यांच्या कुशल दूरदर्शी नेतृत्वाचे पाठबळ आहे. विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवूनच आम्ही पुढे जात आहोत. त्याबाबत व्यवस्थापन आग्रही आहे.''

प्रभारी संचालक दबडे यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, ''महाविद्यालयाने कन्सलटन्सी आणि टेस्टिंगच्या उत्पन्नात गतवर्षीच्या तुलनेत १६८ टक्क्यांनी भरीव वाढ केली आहे. स्वायत्त महाविद्यालय म्हणून अपेक्षित बदल केले जात आहेत. अभ्यासक्रम, आर्थिक, प्रशिक्षण, उद्योग संवाद अशा सर्व पातळींवर हे बदल होत आहेत.'

परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एन. नाईक यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक सचोटीची प्रतिज्ञा दिली. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष व माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, महाविद्यालयाच्या अर्थ समितीचे सदस्य दीपक शिंदे-म्हैसाळकर, बजरंग पाटील, माजी महापौर नितीन सावगावे उपस्थित होते. यानिमित्ताने विद्यार्थी, पालकांनी परिसर फुलून गेला होता. महाविद्यालयातील आठवणी सेल्फी व रिल्सच्या माध्यमातून टिपून घेत साऱ्यांचे डोळे पाणावले होते. डॉ. नारायण आपटे यांनी सूत्रसंचालन केले. अधिष्ठाता शैक्षणिक डॉ. अनंत कोकणे यांनी आभार मानले.

### जाधव, पाटील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी

२०२५ च्या तुकडीतील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थी, सर्वोत्कृष्ट खेळाडू यांची निवड प्रक्रिया प्रभारी संचालक दबडे यांनी स्पष्ट केली. तेजस जाधव याचा सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थी, तर स्नेहल पाटील हिचा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड जाहीर केली. यावेळी विद्यार्थ्यांनी जल्लोष केला.

### स्पर्धा परीक्षेतील यश

■ सर्व शाखांमधील २६ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य आणि ब्राँझपदके देऊन गौरविण्यात आले. गेट, जीआरईमध्ये यश प्राप्त केलेल्या आणि प्रथितयश कंपन्यांमध्ये नोकरी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. माजी विद्यार्थी आदिती चौगुले, प्रणव कुलकर्णी, प्रदीप भंडारे व अश्विनी परकले यांची २०२४ मध्ये यूपीएससी परीक्षेत 'आयएएस'साठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.



**सांगली : वालचंद महाविद्यालयात कमेन्समेंट डे प्रसंगी उपस्थित माजी खासदार संजय पाटील, प्रा. एन. सी. शिवप्रकाश व इतर.**

# 'वालचंद 'मध्ये कमेन्समेंट डे

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा कमेन्समेंट डे उत्साही वातावरणात झाला. वालचंद कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य व माजी खासदार संजय पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रा. एन. सी. शिवप्रकाश व चकोर गांधी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

महाविद्यालयाचे परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एन. नाईक यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक सचोटी जपण्याची प्रतिज्ञा दिली. २६ गुणवंत विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थिनी आदिती चौगुले, प्रणव कुलकर्णी, प्रदीप भंडारे व अश्विनी परकले यांचा सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी प्रास्ताविक केले. तेजस जाधव याची अष्टपैलू विद्यार्थी, तर स्नेहल पाटील हिची सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड झाली. अधिष्ठाता शैक्षणिक डॉ. अनंत कोकणे यांनी आभार मानले. डॉ. नारायण आपटे यांनी सूत्रसंचालन केले. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, अर्थ समितीचे सदस्य दीपक शिंदे, बजरंग पाटील, नितीन सावगावे उपस्थित होते.

# वालचंद महाविद्यालयात कमिन्समेंट डे उत्साहात

**जनप्रवास । सांगली**

औपचारिक अभियांत्रिकी शिक्षणाची यशस्वीपणे सांगता करून आपल्या व्यावसायिक जीवनात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा Commencement Day वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात उत्साही वातावरणात साजरा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वालचंद कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य व माजी खा. संजयकाका पाटील उपस्थित होते, तर प्रा. एन. सी. शिवप्रकाश व चकोर गांधी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. (डॉ.) उदय दबडे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाच्या गेल्या वर्षभरातील प्रगतीचा धावता आढावा घेताना महाविद्याल्याने कन्सलटन्सी आणि टेस्टिंगच्या उत्पन्नामध्ये गतवर्षीच्या तुलनेत १६८ टक्के भरीव वाढ झाल्याचे नमुद केले. संजयकाका पाटील यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयाच्या गौरवपूर्ण परंपरेचा उल्लेख केला आणि एक लोकप्रतिनिधी म्हणून कोणत्याही बाबतीत या महाविद्यालयाच्या पाठीशी उभे राहण्याचा आपला दृढ निर्धार प्रकट केला. प्रमुख पाहुणे प्रा. एन. सी. शिवप्रकाश यांनी वालचंद कॉलेजच्या सर्वदूर पसरलेल्या कीर्तीबाबत त्यांना आलेले अनुभव कथन करतानाच या कॉलेजच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा उल्लेख केला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या भावी व्यावसायिक आयुष्यात कशा प्रकारे मार्गक्रमण करणे आवश्यक आहे हे सांगताना ससा आणि कासव या विस्तारित गोष्टीच्या रूपकातून hardwork, strategy, team work आणि leadership या संकल्पना विशद केल्या. कमी साधनसामुग्री असताना देखील आपल्या अंगभूत क्षमतांचा वापर करणे हे अधिक महत्त्वाचे आहे हे भारतरत्न सी. व्ही. रामन यांचे सुमारे १०० वर्षांपूर्वीचे विचार आजही महत्वाचे असल्याचे विशेषतेने नमूद केले.

कार्यक्रमाचे सन्माननीय पाहुणे आणि ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे संस्थेचे सदस्य चकोर गांधी यांनी विविध आव्हाने जरी असली तरी त्यावर मात करीत अजित गुलाबचंद यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली महाविद्यालय कशी प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यवस्थापन कसे आग्रही आहे, हे नमूद केले.



सांगली : कमिन्समेंट डे निमित्त आयोजीत कार्यक्रमात बोलताना मान्यवर.

यानंतर महाविद्यालयाचे परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एन. नाईक यांनी उत्तीर्ण होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक सचोटी जपण्याची प्रतिज्ञा दिली. २०२५ च्या पदवी आणि २०२४ च्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी प्रतिनिधीक स्वरूपात मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयामुळे आपले आयुष्य घडल्याचे सांगितले.

यानंतर सर्व शाखांमधील २६ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके देऊन गौरवण्यात आले तसेच GTE, GRE मध्ये यश प्राप्त केलेल्या आणि स्वतःला सिद्ध करून प्रचंड स्पर्धेतून प्रथितयश कंपन्यांमध्ये नोकरी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना देखील गौरविले. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी आदिती चौगुले, प्रणव कुलकर्णी, प्रदीप भंडारे व अश्विनी परकले यांचा२०२४ मध्ये यूपीएससी परीक्षेत IS साठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

यानंतर २०२५ च्या बॅचमधील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थी आणि सर्वोत्कृष्ट खेळाडू यांची निवड प्रक्रिया प्रभारी संचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी विशद केली. तेजस जाधव याचा सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थी म्हणून तर कु. स्नेहल पाटील हिची सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड जाहीर केली व त्यांना सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनंत कोकणे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. डॉ. नारायण आपटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष व माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, महाविद्यालयाच्या अर्थसमितीचे सदस्य दीपकबाबा शिंदे, बजरंग पाटील, नितीन सावगावे हे उपस्थित होते. सुमारे ५०० विद्यार्थी व ३०० हून अधिक पालक उपस्थित असल्याने महाविद्यालयाचा परिसर फुलून गेला होता व सर्वजण आपल्या महाविद्यालयातील आठवणी सेल्फी व रिल्सच्या डिजिटल माध्यमामध्ये टिपून घेण्यामध्ये मग्न होते.

# 'वालचंद अभियांत्रिकी'मध्ये प्रारंभ दिवस साजरा

प्रतिनिधी
सांगली

औपचारिक अभियांत्रिकी शिक्षणाची यशस्वीपणे सांगता करून आपल्या व्यावसायिक जीवनात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा 'प्रारंभ दिवस' वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात उत्साही वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वालचंद कॉलेजच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य व माजी खा.संजय पाटील तर प्रा. एन.सी.शिवप्रकाश, चकोर गांधी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी प्रभारी संचालक प्रा.डॉ.उदय दबडे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाच्या गेल्या वर्षभरातील प्रगतीचा धावता आढावा घेताना महाविद्यालयाने कन्सलटन्सी आणि टेस्टिंगच्या उत्पन्नामध्ये गत वर्षीच्या तुलनेत भरीव वाढ झाल्याचे नमूद केले. तसेच संजय पाटील यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयाच्या गौरवपूर्ण परंपरेचा उल्लेख केला व एक लोकप्रतिनिधी म्हणून कोणत्याही बाबतीत या महाविद्यालयाच्या पाठीशी उभे राहण्याचा आपला दृढ निर्धार व्यक्त केला.



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यक्रम प्रसंगी माजी खा. संजय पाटील, प्रा. एन. सी. शिवप्रकाश, चकोर गांधी व अन्य मान्यवर.

प्रा.एन.सी. शिवप्रकाश यांनी वालचंद कॉलेजच्या सर्वदूर पसरलेल्या कीर्तीबाबत त्यांना आलेले अनुभव कथन करतानाच या कॉलेजच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा उल्लेख केला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या भावी व्यावसायिक आयुष्यात कशा प्रकारे मार्गक्रमण करावे, याबाबत मार्गदर्शन केले. कमी साधनसामुग्री असताना देखील आपल्या अंगभूत क्षमतांचा वापर करणे, हे अधिक महत्त्वाचे आहे. हे भारतरत्न सी.व्ही. रामन यांचे सुमारे १०० वर्षांपूर्वीचे विचार आजही महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. चकोर गांधी यांनी विविध आव्हाने जरी असली तरी त्यावर मात करीत श्री. अजित गुलाबचंद यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली महाविद्यालय कशी प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यवस्थापन कसे आग्रही आहे, हे नमूद केले.

यानंतर महाविद्यालयाचे परीक्षा नियंत्रक डॉ.बी.एन.नाईक यांनी उत्तीर्ण होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवसायिक सचोटी जपण्याची प्रतिज्ञा दिली. त्यानंतर सर्व शाखांमधील २६ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके देऊन गौरवण्यात आले यावेळी विविध क्षेत्रात यश प्राप्त केलेल्या व स्वत:ला सिद्ध करून प्रचंड स्पर्धेतून प्रथितयश कंपन्यांमध्ये नोकरी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. आदिती चौगुले, प्रणव कुलकर्णी, प्रदीप भंडारे व अश्विनी परकले या माजी विद्यार्थ्यांचा यूपीएससी परीक्षेत यश प्राप्त केल्याबद्दल तर तेजस जाधव याचा सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थी म्हणून तर स्नेहल पाटील हिचा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून सत्कार करण्यात आला.

डॉ.नारायण आपटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, अर्थसमितीचे सदस्य दीपक शिंदे, बजरंग पाटील, नितीन सावगावे, डॉ. उदय दबडे यांच्यासह सुमारे विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ.अनंत कोकणे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा सांगता झाली.

# अभियांत्रिकी शिक्षणाची सात दशकांची परंपरा

## भविष्यवेधी अभियंते घडविणारे वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग

Estd. 1947

स्वातंत्र्यानंतर आवश्यक असणाऱ्या औद्योगिक प्रगतीसाठी अभियंत्यांची गरज ओळखून धोंडोमामा साठे यांनी 'वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग' या स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या स्वायत्त महाविद्यालयातून जागतिक स्तरावरील अनेक अभियंते घडले आहेत. उत्कृष्टता आणि नवविचार यांची सांगड घालणाऱ्या या महाविद्यालयातून अभियंत्यांच्या रूपाने जबाबदार नागरिक बाहेर पडत आहेत.

### संस्थेचा नावलौकिक वाढविणारे माजी विद्यार्थी

अमृतमहोत्सवी वर्ष साजरे केलेल्या 'वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालया'ने गेल्या सात दशकांत अभियांत्रिकी क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. या महाविद्यालयात तीस हजारांहून अधिक अभियंते घडले आहेत. अनेक उद्योजक, कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि लीना नायर यांच्यासारख्या जागतिक पातळीवरच्या CEO सारख्या प्रख्यात विद्यार्थ्यांचा त्यात समावेश आहे. महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वोच्च व्यावसायिक संस्थांचे नेतृत्व करीत आहेत. जागतिक स्तरावर यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या कथा आंतरराष्ट्रीय पातळीवर महाविद्यालयाचे नाव समृद्ध करणाऱ्या आहेत. त्यात अभिजित पवार (व्यवस्थापकीय संचालक, सकाळ माध्यम समूह), सुमित शाह (संस्थापक आणि सी.ई.ओ, दुकान), प्रदीप मराठे (संचालक आणि संस्थापक, कॉटन किंग), कै. रामकुमार राठी (मा. चेअरमन, राठी-बेहरे ग्रुप), आल्हाद आपटे (मा. मुख्य अधिकारी, नॅशनल टेक्निकल रीसर्च ऑर्गनायझेशन आणि पंतप्रधानांचे माजी सल्लागार) कै. सुभाष आवळे (मा. संचालक, एन.आय.टी.आय.ई.), सदानंद जोशी (संस्थापक, जोशी टेक्नॉलॉजीज), भास्कर सावंत (प्रधान सचिव, राजस्थान सरकार), विजय बापट (प्रख्यात शिक्षण तज्ज्ञ आणि प्राध्यापक, आय.आय.टी., मुंबई) विद्या कुलकर्णी (संयुक्त संचालक, सी.बी.आय.) आदींचा समावेश आहे.

### उत्कृष्ट शिक्षक, सर्वोत्तम गुणवत्ता

काळाची पावले ओळखून केवळ पुस्तकी ज्ञानाची कास न धरता व्यावहारिक अनुभव, नवोन्मेषासाठी आवश्यक तांत्रिक कौशल्ये, औद्योगिक कौशल्यांचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविले जाते. त्या अनुषंगाने महाविद्यालयात उच्चशिक्षित, अनुभवी प्राध्यापकवर्ग कार्यरत आहे. यातील प्रत्येक जण आपापल्या क्षेत्रातील तज्ज्ञ आहे, त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याची गरज समजून घेत ते मार्गदर्शन




करतात. पदवीपूर्व अभ्यासक्रमांसाठी 'नॅशनल बोर्ड ऑफ अक्रिडेशन'ची मान्यता प्राप्त करणारे हे राज्यातील पहिलेच महाविद्यालय आहे. जागतिक दर्जाचा अभ्यासक्रम राबविल्यामुळे विद्यार्थीही जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी तयार होतात. संशोधन, नवोन्मेष, उद्योजकता डोळ्यांसमोर ठेवत महाविद्यालयात अत्याधुनिक प्रयोगशाळा, संशोधन केंद्रे आणि सुसज्ज कार्यशाळा उभारल्या आहेत. १९५५ पासून सुमारे चार दशकांच्या कालावधीत प्रा. व्ही. के. केळकर, प्रा. जी. सी. कानिटकर आणि डॉ. पी. ए. कुलकर्णी व अन्य प्राचार्यांनी महाविद्यालयाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवून दिला. प्रा. व्ही. व्ही. बर्वे यांनी वसतिगृहाचे रेक्टर म्हणून दीर्घकाळ सेवा देताना आपल्या पितृवत वात्सल्यामुळे विद्यार्थ्यांना कधीही



**अजित गुलाबचंद**
अध्यक्ष, प्रशासकीय परिषद,
वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय

घराची आठवण होऊ दिली नाही. प्रा. बर्वे यांची वसतिगृह व्यवस्थापनातील कामगिरी आजही आदर्श म्हणून स्मरणात आहे.

### पदव्युत्तर अभ्यासक्रमांची विविधता

सध्या जगभरात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झपाट्याने वाढलेला आहे. आपले विद्यार्थी या क्षेत्रात मागे पडू नयेत, यासाठी 'वालचंद महाविद्यालया'ने 'एआय'संबंधित अभ्यासक्रम सुरू केले आहेत. एआय, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, रोबोटिक्स, ऑटोमेशन, सायबर सुरक्षा, ब्लॉकचेन आणि इतर अभ्यासक्रमांचा समावेश आहे. पारंपरिक विभागाचे पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमही येथे उपलब्ध आहेत. महाविद्यालयाने काळाची पावले ओळखून रोबोटिक्स अँड ऑटोमेशन, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग हे दोन पदवी, तसेच कन्स्ट्रक्शन मॅनेजमेन्ट हा नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला, तर कम्प्युटर सायन्स अँड इंजिनीअरिंग व आयटी या दोन्ही पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ केली.

### कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी प्लेसमेंट सेल

महाविद्यालयातील विद्यार्थी विविध पातळ्यांवर चमकताना दिसतात. महाविद्यालयातून प्लेसमेंट मिळण्याचे प्रमाणही उल्लेखनीय आहे. महाविद्यालयात कॅम्पसमध्ये येणाऱ्या कंपन्यांमध्ये अनेक विद्यार्थ्यांना उत्तम पॅकेजसह संधी मिळते. महाविद्यालयात टाटा, इन्फोसिस, मायक्रोसॉफ्ट, ॲमेझॉन आणि इतर अशा अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्या नियमितपणे कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी येतात. या सर्वांसाठी महाविद्यालयात प्लेसमेंट सेल कार्यरत आहे. विद्यार्थ्यांना मुलाखतीत यशस्वी होण्यासाठी आवश्यक ती सर्व कौशल्ये, तंत्राचे प्रशिक्षण या सेलकडून दिले जाते. 'वालचंद महाविद्यालया'तील विद्यार्थी केवळ उच्च वेतनच नव्हे, तर प्रामाणिकपणा, कार्यक्षमता आणि समस्या सोडविण्याची क्षमता आणि नव्या संधींचा वेध घेणारा असतो. 'वालचंद'चे विद्यार्थी ६ लाख ते १.५ कोटींपर्यंत वार्षिक वेतन मिळवीत आहेत. वेतन हा निव्वळ मापदंड नसला, तरी विद्यार्थ्यांच्या करिअरमधील एक महत्त्वाचा भाग आहे.

### संघटित, सांस्कृतिक जीवनाचा अनुभव

विद्यार्थ्यांनी गुणाधिष्ठित न होता, कार्यकुशल व्हावे, यासाठी महाविद्यालय प्रयत्न करते. सांस्कृतिक मंचामार्फत विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला, कलागुणांना वाव दिला जातो. तांत्रिक कौशल्ये विकसित करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक जीवन विकसित करण्यासाठी विविध क्लब आणि उपक्रमांचे आयोजन केले जाते. तांत्रिक क्लब, जसे की, रोबोटिक्स क्लब, कोडिंग क्लब आणि इलेक्ट्रॉनिक्स क्लब विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यांना चालना देतात.

### अत्याधुनिक सुविधा आणि निसर्गरम्य परिसर

सांगलीतील या महाविद्यालयात निसर्गाचे सौंदर्य अनुभवायला मिळते. हा परिसर हिरवीगार झाडे, प्रशस्त मैदाने आणि स्वच्छ वातावरण असलेला आहे. अत्याधुनिक प्रयोगशाळा, सुसज्ज कार्यशाळा, संगणक केंद्र आणि संशोधनाच्या सुविधा उपलब्ध आहेत. येथील ग्रंथालय पारंपरिक आणि आधुनिक काळातील डिजिटल, असे दोन्ही प्रकारे विद्यार्थ्यांना ज्ञान वेचण्याच्या वाटा दाखविते. वसतिगृहे, क्रीडांगण, खेळाच्या सुविधा, जिम, कॅफेटेरिया यामुळे विद्यार्थ्यांसाठी हे महाविद्यालय म्हणजे उत्कृष्ट शिक्षण केंद्र ठरले आहे.




कोल्हापूर : 'सकाळ'तर्फे मंगळवारी सयाजी हॉटेलमध्ये शैक्षणिक संस्थांचा गौरव आणि कॉफीटेबल बुकचे प्रकाशन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या हस्ते झाले. शेजारी शिक्षण संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# नावीन्यपूर्ण शिक्षणातून वेगळी ओळख निर्माण करा

## डॉ. सुनीलकुमार लवटे : 'सकाळ'तर्फे शैक्षणिक संस्थांचा गौरव; कॉफीटेबल बुकचे प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ८ : "भारतीय शिक्षणाची सार्वजनिक ते खासगी अशी वेगाने वाटचाल होत आहे. आगामी काळात शैक्षणिक संस्थांची संख्या वाढणार असून, तीव्र स्पर्धा निर्माण होणार आहे, अशा स्थितीत संख्यात्मकवाढीपेक्षा गुणवत्तापूर्ण वाढीकडे लक्ष द्या. गुणवत्ता जोपासून नावीन्यपूर्ण, इतरांपेक्षा वेगळे शिक्षण देत शिक्षण संस्थांनी स्वतःची वेगळी ओळख, ब्रँड निर्माण करावा," असे आवाहन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी आज येथे केले.**

'सकाळ'तर्फे कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, बेळगाव जिल्ह्यांतील नवी पिढी घडविण्यात योगदान देणाऱ्या आणि जीवन घडविणारी गुरुकुले असलेल्या शैक्षणिक संस्थांच्या गौरव सोहळ्यात ते बोलत होते. सयाजी हॉटेलमधील या कार्यक्रमात डॉ. लवटे आणि शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते या शैक्षणिक संस्था आणि शिक्षकांच्या कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या कॉफीटेबल बुकचे प्रकाशनही झाले.

डॉ. लवटे म्हणाले, "देशातील सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेची स्थिती बिकट झाली आहे. त्याला गुणवत्तेचा चांगला पर्याय द्यायचा असेल, तर खासगी, स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील शैक्षणिक संस्थांनी प्राधान्याने गुणवत्ता जपावी. पॅटर्नचे रूपांतर फॅक्टरीमध्ये केले तर गुणवत्ता घसरते, हे लक्षात ठेवावे. केवळ इमारत, शिक्षक, पायाभूत सुविधांतून नव्हे, तर नावीन्यपूर्ण, वेगळेपणातून शिक्षणाचा पट मांडावा. कौशल्याधिष्ठित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या जोरावर वाटचाल केल्यास या शैक्षणिक संस्थांना उज्जवल भविष्य आहे. विकासाची स्वप्न घेऊन शाळा, महाविद्यालयांत पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांना भरभरून ज्ञान द्या. त्यांचा सर्वांगीण विकास साधा."

कार्यक्रमाचा प्रारंभ दीपप्रज्वलनाने झाला. प्रमुख उपस्थितांच्या हस्ते शैक्षणिक संस्थांच्या पदाधिकारी, प्रतिनिधींनी कॉफीटेबल बुक देऊन गौरविले. 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव यांनी प्रास्ताविक केले. 'सकाळ' बातम्यांच्या पलीकडे जाऊन समाजात चांगले काम करणाऱ्या व्यक्ती, संस्थांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन ती सर्वांसमोर मांडते. त्यांना प्रोत्साहन देते. 'सकाळ' नेहमीच शिक्षण क्षेत्रातील विविध घटकांना पाठबळ देते. मूल्यव्यवस्था टिकविण्याचे काम आणि समाज घडविण्यात महत्त्वपूर्ण योगदान शैक्षणिक संस्था व शिक्षक देतात. त्यांची गौरवगाथा समाजासमोर मांडण्यासाठी कॉफीटेबल बुकचा उपक्रम राबविल्याचे त्यांनी सांगितले. सरव्यवस्थापक (दक्षिण महाराष्ट्र) यतीश शहा यांनी आभार मानले.

### 'विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन शिक्षण द्या'

कृषी, शिक्षण, औद्योगिक, महिला सक्षमीकरण, तरुणाईतील नेतृत्व विकास आदी विविध क्षेत्रांना पाठबळ देणाऱ्या 'सकाळ'चे मनापासून अभिनंदन करतो. माझे शैक्षणिक व्हिजन बदलण्यात 'सकाळ'चे मोठे योगदान आहे. या कॉफीटेबल बुकच्या माध्यमातून 'सकाळ'ने विविध शैक्षणिक संस्थांचे योगदान सर्वांसमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण काम केले असल्याचे डॉ. साळुंखे यांनी सांगितले. या शैक्षणिक संस्थांचे कार्य कौतुकास्पद आहे. मात्र, त्यांनी भविष्यातील आव्हानांचा वेध घेणे आवश्यक आहे. प्रत्येक संस्थेने स्वतःचे विश्लेषण करून पुढील वाटचालीची दिशा ठरवावी. बदलणारे जागतिक राजकीय वातावरण, उद्योगांतील परिवर्तनाचा शिक्षणावर निश्चितपणे परिणाम होतो. त्याचा विचार आवर्जून करावा. शैक्षणिक संस्थांत एकसुरीपणा येत असून ते घातक आहे. या संस्थांनी वेगळा विचार करावा. विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना शिक्षण द्या. आगामी काळात भावी पिढीचा विचार करता शाश्वत विकास महत्त्वाचा असून, त्याला अभ्यासक्रमाचा भाग बनवा, असे आवाहन डॉ. साळुंखे यांनी केले.

### 'शैक्षणिक गौरवगाथा'चे मानकरी

'सकाळ'ने प्रकाशित केलेल्या 'शैक्षणिक गौरवगाथा' या कॉफीटेबल बुकच्या विविध संस्था, व्यक्ती मानकरी ठरले आहेत. त्यात आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च सेंटर विटा, ब्रिलियंट प्रोफेशनल अॅकॅडमी, प्राध्यापक मच्छिंद्र चाटे, प्राध्यापक गोपीचंद चाटे, कौन्सिल ऑफ एज्युकेशन, क्रिएशन मल्टिमीडिया इन्स्टिट्यूट, डेक्कन इन्स्टिट्यूट सांगली, ज्ञानसागर अॅकॅडमी इचलकरंजी, ग्लिट्झ अॅकॅडमी ऑफ डिझाईन, गुरुकुल शिक्षण समूह इचलकरंजी, आयएएम हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, आयडियल इंग्लिश स्कूल, इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, किशोर करिअर पॉईंट इचलकरंजी, कोल्हापूर चर्च कौन्सिल, महावीर एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर, महावीर शिक्षण संस्था हुक्केरी, मालवण एज्युकेशन सोसायटी मालवण, एम. ई. एस. कॉलेज ऑफ नर्सिंग, न्यू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी फणसगाव, पंचक्रोशी शिक्षण संस्था मुंबई, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी इस्लामपूर, संजीवन इंटरनॅशनल स्कूल, संत गजानन महाराज शिक्षण समूह महागाव, शिक्षण प्रसारक मंडळ सावंतवाडी, श्रद्धा करियर डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट इचलकरंजी, बाहुबली विद्यापीठ बाहुबली, श्री समर्थ कृपा विश्व प्रतिष्ठान, श्री. वसंतराव जयवंतराव देशमुख हायस्कूल, श्रीमंत माईसाहेब बावडेकर शाळा, स्वामी विवेकानंद सेवाश्रम शिराळा, स्वरूप एज्युकेशन सोसायटी सांगली, दि न्यू एज्युकेशन सोसायटी, वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय, विद्या प्रबोधिनी, विश्व मेडिकल अॅडमिशन पॉईंट, विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी जत, वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली यांचा समावेश आहे.

# सहायक अभियंतापदी ज्योती पवार यांची निवड



ज्योती पवार

इस्लामपूर : येथील ज्योती प्रल्हाद पवार यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी परीक्षेतून सहायक अभियंता (राजपत्रित वर्ग दोन) या पदावर सार्वजनिक बांधकाम विभागात निवड झाली आहे. ज्योती यांनी वालचंद कॉलेज सांगली येथे बी. टेक. व एम. टेक. (सिव्हिल) पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे.

# कृषी क्षेत्रात 'ब्लॉकचेन'ला आणखी वाव

## 'सकाळ-वालचंद' व्याख्यानमाला : गौरव सोमवंशी, मिथिलेश देसाई यांचे मत

■ सकाळ वृत्तसेवा

**सांगली, ता. २१ : ''गोपनीयता आणि पारदर्शकता ही 'ब्लॉकचेन'ची बलस्थाने आहेत. कृषी क्षेत्रात या प्रणालीला वाव आहे. कृषीला तंत्रज्ञानाची जोड दिल्यास शेतकरी फायद्यात येऊ शकतात,'' असे मत 'ब्लॉकचेन'चे तज्ज्ञ गौरव सोमवंशी, प्रयोगशील शेतकरी मिथिलेश देसाई यांनी आज येथे मांडले.**



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात सोमवारी 'सकाळ-वालचंद' व्याख्यानमाला झाली. यावेळी उपस्थित विद्यार्थी आणि प्राध्यापक.



गौरव सोमवंशी



मिथिलेश देसाई

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आज 'सकाळ-वालचंद' व्याख्यानमालेत 'बिटकॉईनच्या पलीकडे ब्लॉकचेन : सद्यस्थितीत उद्योगातील परिवर्तन' या विषयावर त्यांचे मार्गदर्शन झाले. टिळक सभागृहात हा कार्यक्रम झाला. व्याख्यानमालेचे हे चौथे वर्ष आहे. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. सोमवंशी म्हणाले, ''ब्लॉकचेनमध्ये व्यवहार पारदर्शक होतात. एकदा का यात माहिती आली की, ती नष्ट करता येत नाही. ज्याठिकाणी विश्वासाचा अभाव आहे, तिथे या प्रणालीला महत्त्व आले आहे. 'लिंकड्इन'वर या तिथे जगाशी जोडले जाल. बिटकॉईनपुरतेच ब्लॉकचेनचे महत्त्व आहे, असे नाही तर सर्वच क्षेत्रात आवश्यक आहे. सध्या कृषी क्षेत्रात जम बसवला आहे.''

श्री. देसाई म्हणाले, ''शेतकरी हाच मोठा नवप्रवर्तक आहे. त्यालाच शेतीतील अडचणी माहिती असतात. तंत्रज्ञानाच्या मदतीने त्या अडचणी सोडवल्या पाहिजेत. नारळाच्या झाडाला आपण कल्पवृक्ष म्हणतो, पण फणस हेही कल्पवृक्ष आहे. फणसाचा गर, बिया, साली देखील उपयुक्त आहेत. ब्लॉकचेन, एआय वापरून उत्पादनात वाढ करू शकता. त्यानंतर शेतकऱ्यांनी प्रक्रिया उद्योगात आले पाहिजे.''


''सकाळ माध्यम समूहा'च्या देणगीतून ही व्याख्यानमाला सुरू आहे,'' असे डॉ. दबडे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी महाविद्यालयात चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. मयूर राठी होते. डॉ. मेधा शहा यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. तेजस्विनी उपाध्ये यांनी सूत्रसंचालन केले.

### 'ब्लॉकचेन' म्हणजे काय?

■ 'ब्लॉकचेन' ही माहिती साठवण्याची प्रणाली आहे. एकदा माहिती टाकली की, त्यात फेरबदल होऊ शकत नाही. माहिती साठवण्याची ही पद्धत विकेंद्रित आहे. त्यामुळे विश्वास, पारदर्शकता या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देता येते.

### प्रश्नोत्तरात आणखी उलगडा

■ व्याख्यानानंतर घेतलेल्या प्रश्नोत्तरात 'ब्लॉकचेन'बद्दल आणखी उलगडा झाला. उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. यावेळी 'तुमचा भर संकल्पनेवर असला पाहिजे. कारण इतर कामे करण्यासाठी आता 'एआय' आले आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञान नसून तत्त्वज्ञान आहे. यात पारदर्शकता नाही, असे नाही. त्यासाठी इच्छाशक्ती हवी,' असे गौरव सोमवंशी यांनी सांगितले; तर 'सेंद्रिय पद्धतीने उत्पादन घेतले, तरी मूळ शोधले जात नसल्याने अपेक्षित दर मिळत नाही. ब्लॉकचेनद्वारे यावर मात करता येईल. अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी संशोधन करावे, शेती यंत्रणा उभारणीवर भर द्यावा,'' अशी अपेक्षा मिथिलेश देसाई यांनी व्यक्त केली.



# ‘एआय’चा बाऊ, सृजनशिलतेला वाव

## वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांशी संवाद

### कॉलेज कट्टा

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) याविषयीच्या सुरस कथा तीन-चार वर्षांपासून ऐकायला मिळत आहेत. ‘एआय’ आपल्या नोकऱ्या खाणार! ही प्रमुख भीती सर्वच क्षेत्रांत काम करणाऱ्यांना वाटत आहे. पुस्तक आणि गाईड यातील जो फरक आहे, तोच इथे आहे. एआय हेदेखील गाईडच आहे. ‘एंड टू एंड’ असे उपाय सध्यातरी ‘एआय’कडे नाहीत. त्यामुळे सध्या एआयचा बाऊ होत असला तरी, सृजनशिलता आणि कौशल्यास वाव आहे, तो कायम राहील. असे संगणकशास्त्र अभियांत्रिकीत ‘एआय’चे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वाटते. एआय नेमकं काय.. त्याचे भविष्य.. त्याबद्दलची भीती.. आणि त्यातील संधी.. यावर ‘सकाळ’ने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला.

– अतुल पाटील

**निखील गोड** : एआय काळाची गरज आहे. त्यासोबत चांगल्या आणि वाईट गोष्टीही येतील. त्याचा योग्य वापर करता आला पाहिजे. सद्य:स्थितीत संवेदनशील माहिती एआयवर टाकू नये. एआयचे टुल्स वापरता येत नसतील, तर त्यांच्यासाठी नोकरीच्या संधी कमी होतील.

**अफनान सय्यद** : एआयची बूम आली आहे. मात्र, माणसांचा आळस वाढला आहे. पूर्वी गुगलवर संकेतस्थळे धुंडाळून माहिती मिळवली जायची. त्यानिमित्त वाचन व्हायचे, खोल संशोधनाचा फायदा व्हायचा. आता एआयला जेवढे विचाराल तेवढे उत्तर मिळते.



वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी.

**प्रतीक पानतावणे** : एआयचा वापर करून मुलं अभ्यास करत आहेत. कुठल्याही प्रश्नांची उत्तरे सहज मिळत आहेत. एआयचा वापर करुन मिळवलेली माहिती ‘कॉपी पेस्ट’ होत आहे. मात्र, ती लक्षात राहत नाही. अभ्यासासाठी सध्यातरी शाश्वत मार्गच अवलंबिले पाहिजेत.

**महमंद हमजा शेख** : एआय नोकऱ्या खाणार नाही. समस्यांचे ‘एंड टू एंड’ उपाय अद्याप एआयकडे नाहीत. एआय वेळ वाचवू शकतो. तुमच्याकडे सृजनशिलता आणि कौशल्य असेल तर नोकरीच्या भरपूर संधी आहेत. एआय सर्वच क्षेत्रांसाठी उपयुक्त आहे. एआय वेळही वाचवतो.

**आदित्य पानसरे** : कोडिंग करायचे तरी, विद्यार्थी चॅट जीबीटीमध्ये प्रश्न विचारत आहेत. शिकण्याच्या टप्प्यावर असे प्रयोग विद्यार्थ्यांनी केले, तर त्यांच्या समस्या सुटतील; पण संकल्पना स्पष्ट होणार नाहीत. कालांतराने हा प्रश्न कसा सोडवला, हेच विद्यार्थ्यांना आठवत नाही.

**पीयुष राजूरकर** : २०२० पर्यंत एआय नावापुरते होते. दोन वर्षांपूर्वी चॅटजीबीटी करत नव्हते. आता एआय व्हिडिओ एडिट करत आहे. नवे तंत्रज्ञान शिकले पाहिजे. ते उत्पादकता वाढीसाठी उपयुक्त ठरत आहे. सृजनशीलता असेल तर, संधी अमर्याद आहेत. एआयची बूम चालेलच.

**मनस्वी देवेकर** : संशोधनाचे काम एआय लवकर करते. सगळे वाचत बसायला लागत नाही. रोडमॅप येतो. गाईड म्हणून एआय चांगले आहे. लहान मुलांमध्ये एआयबाबत जागृती आवश्यक आहे. शिक्षकांनी घोटीव कामे एआयवर करावीत, उर्वरित वेळ विद्यार्थ्यांना द्यावा.

**श्रीयश डोंगरकर** : एआयमुळे माहिती मिळवणे सोपे झाले आहे. मात्र, गोपनियतेचा भंग देखील होत आहे. चॅट-जीपीटीचे आधीचे मॉडेल कंपनीनेच नष्ट करण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी त्यानेच माहिती जतन करण्याचा प्रयत्न केला, असे सांगितले जाते. त्यामुळे गोपनियतेबाबत **जागरुकता हवी.**

# 'प्लास्टिक व्यवस्थापना'वर 'वालचंद'मध्ये सेमिनार

सांगली, ता. ९ : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातर्फे 'प्लास्टिक व ई-वेस्ट व्यवस्थापन' विषयावर सेमिनारचे पार पडला. विभागप्रमुख डॉ. अनिल सुर्वे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात आला.

'सीएसई' द्वितीय वर्षाच्या 'कम्युनिटी एन्गेजमेंट प्रोग्राम' या अभ्यासक्रमाअंतर्गत आयोजन केले होते. पृथ्वी झिरो वेस्ट फाउंडेशनचे संस्थापक ॲड. हिमांशू लेले, सायली दौंडे, सायली देशपांडे, पवन ठोंबरे, प्रतीक ठोंबरे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना प्लास्टिक व ई-कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, पर्यावरणावरील परिणाम, फेरवापराचे महत्त्व आणि समाजातील युवकांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले.

हिमांशू लेले म्हणाले, "केवळ सादरीकरण नव्हे तर चळवळ म्हणून मांडणी केली. विद्यार्थ्यांचा उत्साह, प्रश्नांची खोली आणि बदल घडवण्याची जिद्द पाहून खूप आशावाद वाटतो." उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक दृष्टिकोन, जबाबदारीची जाणीव आणि समाजभिमुख विचारसरणी विकसित झाली. संवादात्मक सत्र, पोस्टर सादरीकरणे व प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. उदय दबडे यांचे मार्गदर्शन मिळाले. प्रा. लीना पाटील, प्रा. दीपक दत्तवाडकर यांनी सूत्रसंचालन केले. यासाठी प्रा. हर्षल चांदोबा, प्रा. अशुतोष करंजे, प्रा. योगेश माने यांनी पुढाकार घेतला. प्रा. योगेश माने यांनी आभार मानले.

# 'वालचंद'च्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे वसतिगृह

## स्वातंत्र्यदिनी उपक्रमाचा प्रारंभ; ज्ञानदीप फाउंडेशनचे सहकार्य

सांगली, ता. १९ : ज्ञानदीप फाउंडेशन व वालचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेतर्फे विजयनगर येथे शिल्प चिंतामणी कॉलनीत विद्यार्थ्यांसाठी दोन खोल्यांचे सर्व सोयींनीयुक्त निवासस्थान सुरू करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ज्ञानदीप फाउंडेशनतर्फे हा उपक्रम सुरू करण्यात आला. सांगलीत बाहेरून येणाऱ्या वालचंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम आहे.

ज्ञानदीप फाउंडेशनचे संचालक प्रा. डॉ. यशवंत तोरो यांनी मार्गदर्शन केले. ते १९८० पासून फाउंडेशनशी संबंधित असून संचालक म्हणून जबाबदारी पाहत आहेत. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी अमेरिकेत कार्यरत 'वालचंद'चे माजी विद्यार्थी, प्रा. डॉ. एस. व्ही. रानडे यांनी योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांनी निवासाबाबत अधिक माहितीसाठी डॉ. तोरो यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

वालचंद महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी चिदंबर कोटीभास्कर, शरद बापट, रमेश चराटे, अनिल कुलकर्णी, अनिल सुर्वे, राजीव कुलकर्णी, शरद खराटे, प्रवीण कोकाटे, राम पाटोळे, अवधूत पाटील, भरत करे, सौरभ बक्षी उपस्थित होते.




सांगली : 'वालचंद'च्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाचा प्रारंभ करताना प्रा.यशवंत तोरो, चिदंबर कोटीभास्कर, शरद बापट, रमेश चराटे, अनिल कुलकर्णी आदी.

# वालचंदमध्ये जनरेटिव्ह एआय समर ट्रेनिंगला प्रतिसाद



**जनप्रवास । सांगली**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय येथे इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागांच्या संयुक्त विद्यमाने, नॅशनल सुपरकम्प्युटिंग मिशन अंतर्गत व सी-डॅक, पुणे यांच्या सहकार्याने दहा दिवसांचा निवासी समर ट्रेनिंग प्रोग्राम (एसटीपी) - ॲक्सेलरेटेड कम्प्युटिंग आणि जनरेटिव्ह एआय - आयोजित करण्यात आला होता.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली हे एनएसएमचे नोडल सेंटर म्हणून कार्यरत असून, या भूमिकेत महाविद्यालयाने यापूर्वी एचपीसी आणि एआय विषयक सात महत्वपूर्ण उपक्रमांचे यशस्वी आयोजन केले आहे. १ ते १० ऑगस्ट २०२५ या कालावधीत पार पडलेल्या प्रशिक्षणात हाय-परफॉर्मन्स कम्प्युटिंग व आर्टिफिशियल इंटेलिजन्स विषयांवरील प्रगत संकल्पना, पॅरलल प्रोग्रामिंग डीप लर्निंग आर्किटेक्चर, ट्रान्सफॉर्मर्स, लार्ज लँग्वेज मॉडेल्स, यावर तज्ज्ञांकडून व्याख्याने व प्रात्यक्षिक सत्रे घेण्यात आली. महाराष्ट्र व कर्नाटकातील चंद्रपूर, बारामती, मुंबई, ठाणे, सोलापूर, पुणे, सातारा, सांगली व बेळगाव येथील ४२ अंतिम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले. समारोप सोहळ्यास आशिष कुवेलकर, सी-डॅक पुणे, मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर प्रा. डॉ. उदय दबडे, प्रा. डॉ. दिनेश बी. कुलकर्णी, डॉ. रविंद्र राठोड, डॉ. अनिल सुर्वे, सीएसई विभाग प्रमुख; आणि अप्रूपा पवार उपस्थित होत्या. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रा. उदय दबडे व ॲडमिनिस्ट्रेटीव्ह कौन्सिलच्या सदस्यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'एआय'ची लाट देखील मर्यादितच

## डॉ. दीपक शिकारपूर : 'वालचंद-सकाळ' व्याख्यानमालेत मांडले स्पष्ट मत

■ सकाळ वृत्तसेवा

**सांगली, ता. १५ : ''अभियांत्रिकीत दर तीन वर्षांनी वेगळ्या शाखांची लाट येते. गेल्या तीन - चार वर्षांपासून कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) लाट आहे. ती आणखी काही वर्षे चालेल, मात्र जास्त वेळ राहील, असे नाही,'' असे प्रतिपादन संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांनी आज येथे केले. 'वालचंद-सकाळ' व्याख्यानमालेत ते बोलत होते.**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या टिळक सभागृहात आज सायंकाळी हा कार्यक्रम झाला. डॉ. शिकारपूर यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता : सर्वांसाठी आणि सर्वसामान्यांसाठी' या विषयावर मार्गदर्शन केले. 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव, महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

डॉ. शिकारपूर म्हणाले, ''संशोधनासाठी 'एआय' चांगले आहे, मात्र मानवी सर्वेक्षणाला पर्याय नाही. 'एआय'चा कणा डिजिटल डाटा आहे, त्यावर अंध विश्वास ठेवू नका. आरोग्यासाठी 'एआय' टूल्स वापरू नका, ते अमेरिकन डाटा ॲनॅलिसिस करून मत मांडते. देशात सध्या दहा लाख 'प्रॉम्प्ट इंजिनिअर्स'ची गरज, त्यासाठी जागतिक सर्टिफिकेट हवे. येणारा काळ ईव्ही, फ्यूएल सेल्स, हायड्रोजन क्षेत्रांचा आहे.''

''पदवी केवळ सामाजिक प्रतिष्ठा आहे. कौशल्य आणि छंदाच्या जोरावर आवडीच्या क्षेत्रात ठसा उमटवू शकता. बिझनेस इंग्लिश सर्टिफिकेशन घ्यावे, परदेशी भाषा शिकावी. मेकॅनिकल, ऑटोमेशनच्या विद्यार्थ्यांनी जर्मनी भाषा शिकली पाहिजे. अभियांत्रिकीच्या अन्य शाखांच्या विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकल्यास सुवर्णसंधी आहेत. हा मैलाचा दगड ठरू शकतो,'' असे मत डॉ. शिकारपूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मांडले.





सांगली : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील टिळक सभागृहात सोमवारी आयोजित 'वालचंद - सकाळ' व्याख्यानमालेत बोलताना डॉ. दीपक शिकारपूर. व्यासपीठावर डावीकडून महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. उदय दबडे, 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ. दीपक शिकारपूर म्हणाले...

- उद्योजक होण्यासाठी योग्य वेळेची वाट पाहा, १० टक्के स्टार्टअप्सना यश
- भारत २०४७ मध्ये पहिली किंवा दुसरी अर्थव्यवस्था असेल, यात अमर्याद संधी
- सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत स्वकेंद्री व्यक्ती घडते, 'टीमवर्क'ची शिकवणही हवी
- बिरबलाच्या बोधकथा आणि शेरलॉक होम्सच्या रहस्यकथेतही रमा
- लेखक व्हा! लोकांचा विश्वास बसेल की, तुम्ही ज्ञानी आहात

### संवादातून माणूस घडावा : पंडितराव

■ निखिल पंडितराव म्हणाले, ''सकाळ' ९३ वर्षे माध्यम क्षेत्रात आहे. सध्या 'सकाळ'ने देशात टॉप टेनमध्ये स्थान पटकावले आहे. याचाच भाग असलेले 'ई-सकाळ' हे खास तरुणांसाठी आहे. 'एमपीएससी', 'यूपीएससी'चा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिला आहे. 'सकाळ'चे व्यवस्थापकीय संचालक अभिजित पवार यांच्या मते, 'ज्ञान हे भारतीय परंपरेला जोडणारे हवे.' संवादातून माणूस घडावा, यासाठीच ही व्याख्यानमाला सुरू केली आहे.''

कार्यक्रमात डॉ. दबडे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. महाविद्यालयात सुरू केलेल्या नवीन अभ्यासक्रम आणि 'एनबीए' मानांकनाविषयी माहिती दिली. ए. पी. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. तेजस्विनी उपाध्ये यांनी सूत्रसंचालन केले. श्वेता पाटील यांनी आभार मानले.

# ‘ती’ ओलांडतेय पुरुषी करिअरचा उंबरठा!



जागर ‘ती’च्या
हक्क-अधिकारांचा...



सांगली : नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित ‘सकाळ संवाद’ चर्चेत सहभागी रीना चव्हाण, मेधा शहा, पूनम चव्हाण, स्नेहा पाटील.

**पुरुषी प्राधान्याचे असलेल्या क्षेत्रात महिलांचा टक्का कमी असला तरी आता वाढतीय, तिथेही त्या आपल्या बाईपणाचा स्वतंत्र ठसा उमटवत आहेत. अशा काही क्षेत्रांत काम करणाऱ्या ‘करिअरिस्टिक-बिझनेस वूमन’ पैकी वाहतूक व्यावसायिक पूनम चव्हाण, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक विभागप्रमुख डॉ. मेधा शहा, सौरऊर्जा क्षेत्रातील व्यावसायिक स्नेहल पाटील, वास्तुविशारद रीना चव्हाण यांनी ‘सकाळ संवाद’मध्ये उपस्थिती लावली. यानिमित्ताने त्यांनी आपले व्यावसायिक अनुभव खुलेपणाने सांगताना घोडं अडतं कुठं, हे नेमकेपणाने सांगितले. त्याचवेळी यशस्वी व्यावसायिक होण्यासाठीच्या युक्तीच्या चार गोष्टीही सांगितल्या. त्यांच्याशी झालेल्या चर्चेचा हा अंश...**

## काही बोधप्रद निरीक्षणे...

- व्यवसाय आता लिंगभेद समाप्तीच्या मार्गावर आहेत. त्यामुळे महिलांसाठी विविध संधी येणार आहेत
- महिला म्हणून कोणत्याच प्रकारची सवलत घ्यायचे बंद केले पाहिजे
- पुरुषी प्राधान्याच्या क्षेत्रातही उद्योग-कंपन्या मुलींना अधिक प्राधान्य देत आहेत
- सुरक्षितता गंभीर मुद्दा आहेच, मात्र मोबाईलसह अनेकविध तंत्रज्ञानाच्या सहाय्याने त्यावर मात शक्य आहे
- स्वतंत्र अस्तित्व-स्थानासाठी घर आणि व्यवसायाच्या सर्व जबाबदाऱ्या घ्यायची तयारी असावीच लागते
- महिलांची सर्व क्षेत्रांतील संख्या वाढत असली तरी उच्चपदावर त्यांचा टक्का कमी असण्याचे कारण ‘घर-कुटुंब’ अडचण ठरते.

## ‘मैदानात स्वत: उतरायची तयारी ठेवा’

‘लॉजिस्टिक’ अर्थातच वाहतूक व्यवसाय पुरुषप्रधान असंघटित क्षेत्र आहे. या क्षेत्रात दहा वर्षांपासून कार्यरत असलेल्या आणि देशभरातील सुमारे बारा हजारांवर ट्रक्स सांगलीतून चालवणाऱ्या ‘व्ही स्टार ग्रुप’च्या पूनम चव्हाण यांनी महिलांना आता अमुक हे क्षेत्र वर्ज्य आहे, असं मानता येणार नाही, असं स्पष्टपणे सांगितले. त्या म्हणाल्या, ‘‘माझ्या व्यवसायाचा कणा म्हणजे ट्रक मालक-चालक. हे असंघटित क्षेत्र. ट्रकचालक अशिक्षित किंवा कमी शिकलेले. त्यामुळे या व्यवसायात मी दहा वर्षांपूर्वी आले, तेव्हा ‘तू इथं कशी,’ असा प्रश्न होताच. मात्र विश्वासाने सांगते. रात्री उशिराच ट्रक भरले जातात. माझ्याकडे एक मुलगी नोकरीसाठी आली. ‘ट्रक चालकांशी रात्री उशिरापर्यंत बोलावे लागणार,’ असं तिला सांगितलं. त्याला घरच्यांनी विरोध केला. तिनेही जॉबला नकार दिला. मात्र काही दिवसांनी ती पुन्हा आली. ‘घरच्यांनी कशी परवानगी दिली,’ असं विचारल्यावर म्हणाली, ‘हा व्यवसाय चालवणारीही महिलाच असून त्याही रात्री उशिरापर्यंत कामात असतात,’ असं सांगितल्यावर घरचे तयार झाले. घरच्यांना आत्मविश्वास मिळाला. त्यासाठी आपण आधी मैदानात उतरावे लागते, तरच इतरांना आत्मविश्वास येतो. हा व्यवसाय मी करू शकले, याला कारणही तंत्रज्ञानाची झालेली प्रगती आहे. पूर्वी ट्रकभाड्याचे ‘ऑनलाइन’ बँक पेमेंट स्वीकारण्यास तयारी नसायची. त्यांना ‘फ्रॉड’ वाटायचा. आज अशिक्षित ट्रक चालकही ‘जीपे करा,’ म्हणतो. तंत्रज्ञानाने अनेक मर्यादा-अडथळे आता तोडले आहेत. त्यामुळे बाईपणाचे कोणतेही ‘प्रिव्हिलेज’ घेता कामा नये.’’

## ‘पुढे जायचे तर सर्कस-कसरत अटळ!’

‘‘कधी काळी अभियांत्रिकी क्षेत्रात महिला अगदी उदाहरणादाखल असायच्या. आज अभियांत्रिकी महाविद्यालयांतील अगदी स्थापत्य शाखेतही पुरुषांच्या बरोबरीने मुली दिसत आहेत. संगणक क्रांतीने या क्षेत्राला ‘बूस्टर’ मिळाला आहे,’’ असे वालचंदमधील संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख मेधा शहा यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, ‘‘१९९३ ते ९७ दरम्यान कॉम्प्युटर सायन्सला प्रवेश घेतला होता, ज्या वेळी केवळ दोन मुली वर्गात होत्या. आज मात्र हेच क्षेत्र अभियांत्रिकीतील मुख्य वाटावे, अशी परिस्थिती आहे. यातील एक निरीक्षण सांगायला हवे की, ‘आयआयटी’ किंवा तत्सम अभियांत्रिकी महाविद्यालयांतील प्रवेशासाठी द्याव्या लागणाऱ्या ‘जेईई’ किंवा ‘जेईई ॲडव्हान्स’ परीक्षांसाठी मुलींना तयार करण्यासाठी अपेक्षित प्रमाणात लक्ष दिले जात नाही. आणखी एक गोष्ट असते की, क्षेत्र कोणतेही असो, तिथे महिलांना कुटुंबासाठीची जबाबदारी पार पाडूनच पुढे जावे लागणार आहे, याची पक्की जाणीव ठेवली पाहिजे. प्राध्यापक म्हणून काम करताना पुढे पीएच. डी.ची तयारी करताना मला कुटुंबातून मिळालेला आधार खूप महत्त्वाचा आहेच, मुले-घर सांभाळत पुढे जाण्यासाठी इच्छाशक्ती कायम ठेवली. चारवेळा परदेशदौरे केले, तेव्हा पती समवेत होते. प्रत्येक वेळी त्यांनी मुलींना सांभाळण्याची जबाबदारी घेतली. मी काम करीत होते, तेव्हा मुलीही आईला पाहत होत्या. त्या आपोआप शिकत होत्या. नोकरदार आई असेल तर मुलांकडे दुर्लक्ष होते, हे म्हणणेही खरे नाही. प्रत्येकीने हे लक्षात ठेवले पाहिजे की, आपल्याला ही सर्कस करीत पुढे जायचे आहे.’’

## ‘बाईपणाचे ओझे सांगूही नका!’

वास्तुशास्त्र शिकायला मुली मोठ्या संख्येने असतात. मात्र प्रत्यक्षात स्वतंत्रपणे व्यवसायात त्या नसतात, असं निरीक्षण वास्तुविशारद रीना चव्हाण यांनी नोंदवले. त्या म्हणाल्या, ‘‘ हे कलेचे क्षेत्र आहे. महिलांमधील उपजत गुणांकरिता ते पूरक आहे. मात्र व्यवसायासाठी अनेक वेगळी कौशल्ये लागतात. बांधकाम क्षेत्रात मजूर किंवा बांधकाम व्यावसायिकांमध्ये पुरुषच अधिक असतात. त्यांच्यासमवेत, तसेच प्रशासनासमवेत काम करायचे तर अनेक अडचणी असतात. स्वतंत्रपणे व्यवसाय ‘सेट’ करायचा, तर किमान चार-पाच वर्षे जातात. पुन्हा लग्न, संसार, मुलं अशा जबाबदाऱ्या वेगवेगळ्या या टप्प्यावर अडथळे येतात, आणि मग स्वतंत्र व्यावसायिक म्हणून उभे राहणे अवघड जाते. जोडीदाराची साथ असेल तर ते सहज होते. माझ्याबाबतीत मात्र मी वास्तुशास्त्र उत्तीर्ण व्हायच्या आधी देखील कामे घेत होते. तेव्हा आणि नंतरही मला या व्यवसायात चांगलेच अनुभव आले. डॉक्टर, उद्योजक असे क्लायंट असतात, तेव्हा त्यांना रात्रीच त्यांच्या कामातून उसंत मिळते. त्यामुळे त्यांच्यासमवेत ज्या काही व्यावसायिक चर्चा कराव्या लागतात, तिथे किंवा बांधकाम साहित्यांची निवड करण्यासाठी लागणारा प्रवास, साईट व्हिजिट अशा प्रत्येकवेळी मी कधीही बाईपणाचे ओझे घेतले नाही आणि सांगितले नाही. आपण मन लावून काम केले पाहिजे. बऱ्याचदा आपल्या कामाला पुरुषांपेक्षा अधिक चांगला प्रतिसाद क्लायंटकडून मी घेतला आहे. मीच त्याचं काम करावे, असा आग्रह त्यांनी केला आहे. हीच आपल्या कामाची पोहोच असते.’’

## ‘मूल्ये निश्चित करा आणि ठामही राहा!’

सौरऊर्जा क्षेत्रात काम स्वतंत्रपणे काम करणाऱ्या स्नेहा पाटील यांनी आपल्या व्यवसायातील अनेक अनुभव सांगताना महिला म्हणून काही अडचणी नक्की येतात. मात्र त्यावर मात करताना तडजोडी किंवा महिला म्हणून सवलतीची अपेक्षा करू नका, असा सल्ला दिला. त्या म्हणाल्या, ‘‘प्रत्येक क्षेत्र नवे असते, तेव्हा त्याच्या म्हणून अडचणी असतात. सौरऊर्जा क्षेत्राचा गेल्या दहा-बारा वर्षांत झालेला प्रसार पाहता आता मला सुरुवातीपासूनचे दिवस आठवतात. महावितरण कंपनीने ‘नेटमीटर’ संकल्पना आणली आणि त्याला आता गती मिळाली आहे. आज सौरऊर्जा पॅनेल मध्यमवर्गीयांच्याही आवाक्यात आले आहेत. सुरवातीला आम्ही वर्षांत हजार भेटी करायचे, तेव्हा १० ते १२ जण काम द्यायचे. आता सौरऊर्जा क्षेत्रात शंभरांवर व्यावसायिक आहेत. त्यांच्या संघटनासाठी मी पुढाकार घेतला. त्यासाठी खूप जिकिरीचे प्रयत्न करावे लागले. आमच्या क्षेत्रात माझ कसे चांगले चालले आहे हे सांगण्याऐवजी दुसऱ्याचे कसे वाईट आहे हे पटवून देण्याचे काम अनेकजण करत असतात. महावितरण कंपनीतील अनेक अधिकाऱ्याचाही अनुकूल प्रतिसाद नसतो. मात्र आता तंत्रज्ञानामुळे काम पुढे सरकण्यातील बरेच अडथळे कमी झाले आहेत. कोणत्याही व्यवसायात यशस्वी व्हायचे तर काही स्वतःची मूल्ये घेऊन पुढे जायला हवे. थोडा त्रास होतो. मात्र लांब पल्ल्याच्या वाटचालीसाठी तेच योग्य ठरते. ग्राहकांना आधी प्रशिक्षित करा, विश्वासात घ्या. त्यातून तुमची प्रतिमा तयार होते. स्पर्धा स्वतःशी करा. ’’

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात रोटेटिंग मशिनरी बूटकॅम्पचे आयोजन

## ▪ कौशल्य विकास उपक्रमांतर्गत आयोजन : तज्ज्ञांचे ऑन कॅम्पस, ऑनलाईन व्याख्यान

**जनप्रवास । सांगली**

वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली येथील मेकॅनिकल विभागात रोटेटिंग मशिनरी - कॉम्प्रेसर्स आणि पंप्स या विषयावर २७ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत तीन दिवसीय बूटकॅम्पचे आयोजन करण्यात आले.

हे प्रशिक्षण कार्यक्रम भारतीय जड उद्योग मंत्रालयाच्या समृद्धी (समृद्धी डीएचआय) कौशल्यविकास उपक्रमांतर्गत राबविण्यात आले.

या बूटकॅम्पचे आयोजन मॅडिलीकॉन इन्फोटेक एलएलपी, बेंगळुरू यांच्या सहकार्याने करण्यात आले असून, याचे मार्गदर्शन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळुरू येथील प्रा. प्रफुल कुमार यांनी केले.



वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये बूटकॅम्पसमध्ये व्याख्यानप्रसंगी उपस्थित प्रा. डॉ. एस. यू. सपकाळ, प्र. संचालक प्रा. डॉ. यू. ए. दबाडे.

कार्यक्रमात तज्ज्ञांचे ऑन-कॅम्पस आणि ऑनलाईन व्याख्यान सत्र घेण्यात आले. शंकर बालकृष्णन (४५ वर्षांचा औद्योगिक अनुभव असलेले प्रक्रिया स्वयंचलन तज्ज्ञ) आणि निखिल शर्मा (मॅडिलीकॉन, प्रोसेस सिस्टीम्स इंजिनिअर) यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तर डॉ. बरुन चक्रवर्ती (एमडी, बोनिटास कन्सल्टिंग) यांनी ऑनलाईन सत्र घेतले. तसेच संतोष यांनी व्हर्च्युअल रियॅलिटी (व्ही आर.) तंत्रज्ञानाद्वारे यंत्रणांचे प्रात्यक्षिक सादर केले. या बूटकॅम्पमध्ये कॉम्प्रेसर व पंपांचे कार्यतत्त्व, डिझाईन पॅरामिटर्स, कार्यक्षमता विश्लेषण, केव्हिटेशन समस्या, आणि रोटर डायनॅमिक्स यांसारख्या विषयांवर सखोल प्रशिक्षण दिले. व्ही आर-आधारित प्रणालींच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाद्वारे शिकण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. यू. सपकाळ, प्र. संचालक प्रा. डॉ. यू. ए. दबाडे, समन्वयक प्रा. पी. ए. माने, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिल सदस्य अमोल चव्हाण तसेच सर्व अध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांनी योगदान दिले.

या बूटकॅम्पमुळे विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख ज्ञान आणि आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाची ओळख मिळाली असून, शैक्षणिक व औद्योगिक सहकार्य अधिक दृढ करण्याचा उद्देश साध्य झाला आहे.

### बूटकॅम्पचे विद्यार्थ्यांना सखोल समज देण्याचे उद्दिष्ट

बूटकॅम्पचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना रोटेटिंग मशिनरी, कॉम्प्रेसर व पंप यांची सखोल समज देणे, त्यांचे कार्यतत्त्व, कार्यक्षमतेचे विश्लेषण तसेच डिजिटल ट्विन, इंडस्ट्रियल लॉट, सिम्युलेशन आणि -एआय/ एमएल या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग समजावून देणे हे होते. या बूटकॅम्पचे आयोजन मॅडिलीकॉन इन्फोटेक एलएलपी, बेंगळुरू यांच्या सहकार्याने करण्यात आले होते.



वालचंद महाविद्यालयामध्ये स्पर्धेतील विजेत्यांना कर्नल अक्षय नाशिककर यांच्याहस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

# वालचंद अभियांत्रिकीत 'व्हर्टेक्स २०२५' तांत्रिक महोत्सव उत्साहात

जनप्रवास । सांगली

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली येथील यांत्रिकी अभियंता विद्यार्थी संघ (मेसा-मेस्क) तर्फे आयोजित व्हर्टेक्स २०२५ हा राज्यस्तरीय तांत्रिक महोत्सव ३ ते ५ ऑक्टोबर २०२५ दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या नवकल्पना, तांत्रिक ज्ञान आणि कौशल्याला वाव देणारा हा वार्षिक सोहळा उत्कृष्ट प्रतिसाद मिळवून यशस्वी झाला.

तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात एकूण सात विविध तांत्रिक आणि इतर स्पर्धांचा समावेश होता. या उपक्रमांतून विद्यार्थ्यांनी यांत्रिकी नवोन्मेष, डिझाईन कौशल्ये, समस्या-निवारण क्षमता आणि उत्कृष्ट संघभावना प्रदर्शित केली.

प्रमुख उपक्रम आणि ऑटो शोचे आकर्षण 'व्हर्टेक्स २०२५' मधील मुख्य स्पर्धांमध्ये ऑटो शो, ऑटोमॅक, हॅकथॉन, सीएडी कॉम्बॅट, टेक ट्रेक, कॉनव्होल्युशन आणि क्रिकेट मेनिया यांचा समावेश होता.

या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरला तो 'ऑटो शो', जो या शोमध्ये विद्यार्थ्यांनी आधुनिक आणि संकल्पनात्मक वाहने प्रदर्शित करून यांत्रिकी क्षेत्रातील आपला उत्साह दाखवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन आणि यशस्वी विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ कर्नल अक्षय नाशिककर यांच्या हस्ते पार पडले.

समारंभाला महाविद्यालयाचे प्र. संचालक डॉ. उदय दबडे, प्रा. सागर सपकाळ आणि प्रा. प्रवीण माने यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते विजेत्यांना गौरवण्यात आले. मेसाचे अध्यक्ष सार्थक शिंदे, उपाध्यक्ष मेघराज मुसळे आणि सचिव संयुक्ता कदम यांनी नियोजन व आयोजन केले. या कार्यक्रमासाठी प्र. संचालक डॉ. यु. ए. दबडे व अमोल चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

# वालचंदमध्ये व्हर्टेक्स-२०२५ तांत्रिक महोत्सव

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली** : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली येथील यांत्रिकी अभियंता विद्यार्थी संघ (मेसा-मेस्क) तर्फे आयोजित व्हर्टेक्स २०२५ हा राज्यस्तरीय तांत्रिक महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या नवकल्पना, तांत्रिक ज्ञान आणि कौशल्याला वाव देणारा हा वार्षिक सोहळा उत्कृष्ट प्रतिसाद मिळवून यशस्वी झाला.

तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात एकूण सात विविध तांत्रिक आणि इतर स्पर्धांचा समावेश होता. या उपक्रमांतून विद्यार्थ्यांनी यांत्रिकी नवोन्मेष, डिझाईन कौशल्ये, समस्या-निवारण क्षमता आणि उत्कृष्ट संघभावना प्रदर्शित केली. प्रमुख उपक्रम आणि ऑटो शोचे आकर्षण व्हर्टेक्स २०२५ मधील मुख्य



**सानगली : वालचंद महाविद्यालयात व्हर्टेक्स तांत्रिक महोत्सवात कर्नल अक्षय नाशिककर यांचा सत्कार करताना उदय दबडे.**

स्पर्धांमध्ये ऑटो शो, ऑटोमॅक, हॅकथॉन, सीएडी कॉम्बॅट, टेक ट्रेक, कॉनव्होल्युशन आणि क्रिकेट मेनिया यांचा समावेश होता.

या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरला तो ऑटो शो, जो सांगली जिल्ह्यात केवळ वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित केला जातो. या शोमध्ये विद्यार्थ्यांनी आधुनिक आणि संकल्पनात्मक वाहने प्रदर्शित करून यांत्रिकी क्षेत्रातील आपला उत्साह दाखवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन आणि यशस्वी विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ कर्नल अक्षय नाशिककर यांच्या हस्ते पार पडले. या समारंभाला महाविद्यालयाचे प्र. संचालक डॉ. उदय दबडे, यांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. सागर सपकाळ आणि स्टाफ ॲडव्हायजर प्रा. प्रवीण माने यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्याहस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले.

## मेसा-मेस्क टीमचे यशस्वी आयोजन

हा तीन दिवसीय तांत्रिक महोत्सव यशस्वीपणे पार पाडण्यात मेसा-मेस्कच्या विद्यार्थी कार्यकारिणीने महत्त्वाची भूमिका बजावली. मेसाचे अध्यक्ष सार्थक शिंदे, उपाध्यक्ष मेघराज मुसळे आणि सचिव संयुक्ता कदम यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमासाठी प्र. संचालक डॉ. यु. ए. दबडे व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सदस्य अमोल चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

# वालचंदमध्ये 'व्हर्टेक्स २०२५' तांत्रिक महोत्सव उत्साहात

**प्रतिनिधी**
सांगली

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली येथील यांत्रिकी अभियंता विद्यार्थी संघतर्फे आयोजित "व्हर्टेक्स २०२५" राज्यस्तरीय तांत्रिक महोत्सव ३ ते ५ ऑक्टोबर २०२५ दरम्यान उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या नवकल्पनां, तांत्रिक ज्ञान आणि कौशल्याला वाव देणारा हा वार्षिक सोहळा उत्कृष्ट प्रतिसाद मिळवून यशस्वी झाला.

तीन दिवस चाललेल्या महोत्सवात एकूण सात विविध तांत्रिक आणि इतर स्पर्धांचा समावेश होता. या उपक्रमांतून विद्यार्थ्यांनी यांत्रिकी नवोन्मेष, डिझाईन कौशल्ये, समस्या-निवारण क्षमता आणि उत्कृष्ट संघभावना प्रदर्शित केली. प्रमुख उपक्रम आणि ऑटो शोचे आकर्षण 'व्हर्टेक्स २०२५' मधील मुख्य स्पर्धांमध्ये ऑटो शो,ऑटोमॅक, हॅकथॉन, सीएडी कॉम्बॅट, टेक ट्रेक, कॉनव्होल्युशन आणि क्रिकेट मेनिया यांचा समावेश होता. महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरला तो 'ऑटो शो', जो सांगली जिल्ह्यात केवळ वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित केला जातो.



या शोमध्ये विद्यार्थ्यांनी आधुनिक आणि संकल्पनात्मक वाहने प्रदर्शित करून यांत्रिकी क्षेत्रातील उत्साह दाखवला. उद्घाटन आणि यशस्वी विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ कर्नल अक्षय नाशिककर यांच्या हस्ते पार पडले. या समारंभाला महाविद्यालयाचे प्र. संचालक डॉ. उदय दबडे, यांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. सागर सपकाळ आणि स्टाफ ॲडव्हायजर प्रा. प्रवीण माने यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले.

### मेसा-मेस्क टीमचे यशस्वी आयोजन

हा तीन दिवसीय तांत्रिक महोत्सव यशस्वीपणे पार पाडण्यात विद्यार्थी कार्यकारिणीने महत्त्वाची भूमिका बजावली. मेसाचे अध्यक्ष सार्थक शिंदे, उपाध्यक्ष मेघराज मुसळे आणि सचिव संयुक्ता कदम यांनी कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्र. संचालक डॉ. यु. ए. दबडे व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सदस्य अमोल चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

# फ्यूचर टेक्नॉलॉजीज परिषदेत देश-परदेशातून २२५ शोधनिबंध सादर

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात, इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन फ्यूचर टेक्नॉलॉजीज २०२५ चे आयोजन करण्यात आले. या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन प्रथमच वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने केले, जो संस्थेसाठी एक ऐतिहासिक टप्पा ठरला. या फ्यूचर टेक्नॉलॉजीज परिषदेत देश-परदेशातून २२५ शोधनिबंध सादर करण्यात आले.

संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी (CSE), माहिती तंत्रज्ञान (IT), इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी, आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग या पाच विभागांनी संयुक्तपणे या परिषदेचे आयोजन केले होते. बार्कलेजचे संचालक निरव शहा, श्रीनिवास पाटील (माजी विद्यार्थी, कॉलेज डेव्हलपमेंट कौन्सिलचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, डॉ. सुरेंद्र राठोड डॉ. यु. ए. दबडे आणि डॉ. बी. एफ. मोमीन यांच्या उपस्थितीत ही परीषद झाली.

ICFT २०२५ हे संशोधक, शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांना कॉम्प्युटिंग, इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीमधील उदयोन्मुख नवकल्पनांची माहिती आणि ज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरले. ही परिषद स्मार्ट कॉम्प्युटिंग, इनोव्हेशन्स इन इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग अॅडव्हान्सेस, इंटरडिसिप्लिनरी प्लिकेशन्स आणि इमर्जिंग ट्रेंड्स ण्ड फ्युचर डायरेक्शन्स अशा पाच विशेष ट्रॅक्समध्ये आयोजित करण्यात आली होती.



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयत झालेल्या फ्यूचर टेक्नॉलॉजीज परिषदेत डॉ. सुरेंद्र राठोड डॉ. यु. ए. दबडे, आणि डॉ. बी. एफ. मोमीन अंकाचे प्रकाशन करताना

आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज, स्मार्ट इलेक्ट्रॉनिक्स, रोबोटिक्स, क्वांटम कॉम्प्युटिंग, स्मार्ट हेल्थकेअर आणि इंडस्ट्री ४.० हे मुख्य लक्ष केंद्रे होते, ज्यांचा उद्देश अधिक स्मार्ट आणि शाश्वत जग निर्माण करणे आहे.

या परिषदेत तीन प्रतिष्ठित मुख्य वक्ते उपस्थित होते. ट्रेसी ऑस्टिना (टाटा टेकनॉलॉजिस) यांनी एम्पथेटिक इनोव्हेशन्स फॉर अ सस्टेनेबल फ्युचर, डॉ. नारुमोल चुमुआंग (राचपॉट युनिव्हर्सिटी, थायलंड) यांनी एआय फॉर मिनिंगफुल चेंज आणि विनीत कोटक (आयईईई महाराष्ट्र सेक्शन) यांनी द डव्हेंट ऑफ ऑगमेंटेड रिऍलिटी इन स्मार्ट कॉन्टॅक्ट लेन्स या विषयांवर आपले विवेचन केले.

फ्यूचर टेक्नॉलॉजीज फॉर अ सस्टेनेबल ॲण्ड इंटेलिजंट वर्ल्ड या विषयावरील पॅनेल चर्चा हे परिषदेचे आणखी एक खास आकर्षण ठरले. या पॅनेलमध्ये डॉ. सुरेंद्र राठोड, डॉ. प्रशांत मेंगल (प्राध्यापक, चउएचए, सिकंदराबाद), डॉ. सुनील ताम्हनकर आणि प्रा. नारायण मराठे यांचा समावेश होता. डॉ. विजय मोहाळे (विभागाध्यक्ष, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी) यांनी या चर्चेचे सूत्रसंचालन केले.

या परिषदेत भारतासह परदेशातून २२६ नोंदणी झाली आणि ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने एकूण २४ समांतर सत्रांमध्ये शोधनिबंध सादरीकरणे पार पडली. डॉ. बी. एफ. मोमीन (जनरल चेअर), डॉ. डी. बी. कुलकर्णी (प्रोग्राम चेअर), डॉ. एस. डी. रुईकर (पब्लिकेशन चेअर), डॉ. एस. जी. ताम्हनकर (फायनान्स चेअर) आणि प्रा. नारायण मराठे (पब्लिसिटी चेअर) यांच्यासह अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी प्रतिनिधी आयोजक समितीमध्ये होते. या परिषदेसाठी ऍडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिल सदस्य अमोल चव्हाण, महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेंद्र राठोड आणि डॉ. उदय दबडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी ; देश-परदेशातून २२५ शोधनिबंध सादर

**प्रतिनिधी**
सांगली

येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात ७ आणि ८ नोव्हेंबर २०२५ रोजी 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन फ्यूचर टेक्नॉलॉजीज २०२५ यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली. या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन प्रथमच वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने केले, जो संस्थेसाठी एक ऐतिहासिक टप्पा ठरला.

संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग या पाच विभागांनी संयुक्तपणे या परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेला आयईईई महाराष्ट्र सेक्शनचे तांत्रिक सह-प्रायोजकत्व तसेच एचडीएफसी बँक, बँक ऑफ इंडिया आणि आयसीआयसीआय बँकेचे आर्थिक सह-प्रायोजकत्व लाभले होते.

निरव शहा (संचालक, बार्कलेज), श्रीनिवास पाटील (माजी विद्यार्थी आणि अध्यक्ष, कॉलेज डेव्हलपमेंट कौन्सिल), डॉ. सुरेंद्र राठोड



(संचालक), डॉ. यु. ए. दबडे (उपसंचालक) आणि डॉ. बी. एफ. मोमीन (जनरल चेअर) यांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ पार पडला.

मान्यवरांनी आपल्या भाषणातून नवकल्पना, आंतरविद्याशाखीय सहयोग आणि शाश्वत तंत्रज्ञान भविष्यातील अभियांत्रिकी आणि संशोधनासाठी किती महत्त्वाचे आहेत, यावर भर दिला.

आयसीएफटी २०२५ हे संशोधक, शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांना कॉम्प्युटिंग, इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीमधील उदयोन्मुख नवकल्पनांची माहिती आणि ज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठी एक महत्वपूर्ण व्यासपीठ ठरले.

ही परिषद 'स्मार्ट कॉम्प्युटिंग', 'इनोव्हेशन्स इन इलेक्ट्रॉनिक्स', 'इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग ? डव्हान्सेस', 'इंटरडिसिप्लिनरी ? प्लिकेशन्स' आणि 'इमर्जिंग ट्रेंड्स ? फ्युचर डायरेक्शन्स' अशा पाच विशेष ट्रॅक्समध्ये आयोजित करण्यात आली होती.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज, स्मार्ट इलेक्ट्रॉनिक्स, रोबोटिक्स, क्वांटम कॉम्प्युटिंग, स्मार्ट हेल्थकेअर आणि इंडस्ट्री ४.० हे मुख्य लक्ष केंद्रे होते, ज्यांचा उद्देश अधिक स्मार्ट आणि शाश्वत जग निर्माण करणे आहे.

या परिषदेत तीन प्रतिष्ठित मुख्य वक्ते उपस्थित होते. सुश्री. ट्रेसी ऑस्टिना (टाटा टेक्नॉलॉजिस) यांनी 'एम्पथेटिक इनोव्हेशन्स फॉर अ सस्टेनेबल फ्युचर', डॉ. नारुमोल चुमुआंग (राचपॉट युनिव्हर्सिटी, थायलंड) यांनी 'एआय फॉर मिनिंगफुल चेंज' आणि विनीत कोटक (आयईईई महाराष्ट्र सेक्शन) यांनी 'द ॲडव्हेंट ऑफ ऑगमेंटेड रिॲलिटी इन स्मार्ट कॉन्टॅक्ट लेन्स' या विषयांवर आपले विचार सादर केले.

'फ्यूचर टेक्नॉलॉजीज फॉर अ सस्टेनेबल ॲण्ड इंटेलिजंट वर्ल्ड' या विषयावरील पॅनेल चर्चा हे परिषदेचे आणखी एक खास आकर्षण ठरले.

या पॅनेलमध्ये डॉ. सुरेंद्र राठोड, डॉ. प्रशांत मेंगल (प्राध्यापक, सिकंदराबाद), डॉ. सुनील ताम्हनकर आणि प्रा. नारायण मराठे यांचा समावेश होता.

डॉ. विजय मोहाळे (विभागाध्यक्ष, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी) यांनी या चर्चेचे सूत्रसंचालन केले. तज्ज्ञांनी तंत्रज्ञान, टिकाऊपणा आणि मानवकेंद्रित नवोपक्रम यांवरील महत्त्वाच्या कल्पना मांडल्या.

आयसीएफटी २०२५ मध्ये भारत आणि परदेशातून २२६ नोंदणी झाली आणि ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने एकूण २४ समांतर सत्रांमध्ये शोधनिबंध सादरीकरणे पार पाडण्यात आली.

यावेळी डॉ. बी. एफ. मोमीन (जनरल चेअर), डॉ. डी. बी. कुलकर्णी (प्रोग्राम चेअर), डॉ. एस. डी. रुईकर (पब्लिकेशन चेअर), डॉ. एस. जी. ताम्हनकर (फायनान्स चेअर) आणि प्रा. नारायण मराठे (पब्लिसिटी चेअर) यांच्यासह अनेक शिक्षक व कर्मचार,विद्यार्थी प्रतिनिधी आयोजक समितीमध्ये उपसस्थित होते.

सांगली येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात ७ व ८ नोव्हेंबर २०२५ रोजी 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन फ्यूचर टेक्नॉलॉजीज परिषदेसाठी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिल सदस्य अमोल चव्हाण, संचालक डॉ. सुरेंद्र राठोड, डॉ. उदय दबडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# सांगली येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत २२५ शोधनिबंध सादर



■ आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी; देशातून-परदेशातून २२५ शोधनिबंध सादर करण्यात आले.

**जनप्रवास । सांगली**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात (WCE), सांगली येथे नुकतेच 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन फ्यूचर टेक्नॉलॉजीज २०२५ (ICFT २०२५)' यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली. या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन प्रथमच वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने केले, जो संस्थेसाठी एक ऐतिहासिक टप्पा ठरला.

संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी (CSE), माहिती तंत्रज्ञान (खढ), इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी, आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग (-I-ML) या पाच विभागांनी संयुक्तपणे या परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेला आयईईई (IEEE) महाराष्ट्र सेक्शनचे तांत्रिक सह-प्रायोजकत्व तसेच एचडीएफसी बँक, बँक ऑफ इंडिया आणि आयसीआयसीआय बँकेचे आर्थिक सह-प्रायोजकत्व लाभले होते.

श्री. निरव शहा (संचालक, बार्कलेज), श्रीनिवास पाटील (माजी विद्यार्थी आणि अध्यक्ष, कॉलेज डेव्हलपमेंट कौन्सिल), डॉ. सुरेंद्र राठोड (संचालक, WCE), डॉ. यु. ए. दबडे (उपसंचालक, WCE) आणि डॉ. बी. एफ. मोमीन (जनरल चेअर, ICFT २०२५) यांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ पार पडला. मान्यवरांनी आपल्या भाषणातून नवकल्पना, आंतरविद्याशाखीय सहयोग आणि शाश्वत तंत्रज्ञान भविष्यातील अभियांत्रिकी आणि संशोधनासाठी किती महत्त्वाचे आहेत, यावर भर दिला.

ICFT २०२५ हे संशोधक, शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांना कॉम्प्युटिंग, इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीमधील उदयोन्मुख नवकल्पनांची माहिती आणि ज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरले. ही परिषद 'स्मार्ट कॉम्प्युटिंग', 'इनोव्हेशन्स इन इलेक्ट्रॉनिक्स', 'इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग डव्हान्सेस', 'इंटरडिसिप्लिनरी प्लिकेशन्स' आणि 'इमर्जिंग ट्रेंड्स ण्ड फ्युचर डायरेक्शन्स' अशा पाच विशेष ट्रॅक्समध्ये आयोजित करण्यात आली होती.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (-I), मशीन लर्निंग (चङ), इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), स्मार्ट इलेक्ट्रॉनिक्स, रोबोटिक्स, क्वांटम कॉम्प्युटिंग, स्मार्ट हेल्थकेअर आणि इंडस्ट्री ४.० हे मुख्य लक्ष केंद्रे होते, ज्यांचा उद्देश अधिक स्मार्ट आणि शाश्वत जग निर्माण करणे आहे.



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित कॉन्फरन्समध्ये निरव शहा, श्रीनिवास पाटील, संचालक डॉ. सुरेंद्र राठोड, डॉ. यु. ए. दबडे, डॉ. बी. एफ. मोमीन आदी सहभागी होते.

# वालचंद कॉलेजतर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत २२५ शोधनिबंध सादर

**सांगली :** वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन फ्युचर टेक्नॉलॉजीज : २०२५' यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाच्यावतीने प्रथमच अशा आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत देश-परदेशातील २२५ शोधनिबंध सादर झाले. या परिषदेला आयईईई महाराष्ट्र सेक्शनचे तांत्रिक सह-प्रायोजकत्व तसेच एचडीएफसी बँक, बँक ऑफ इंडिया आणि आयसीआयसीआय बँकेचे आर्थिक सह-प्रायोजकत्व लाभले होते. 'बार्कलेज'चे संचालक निरव शहा, कॉलेज डेव्हलपमेंट कौन्सिलचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील, संचालक डॉ. सुरेंद्र राठोड, उपसंचालक डॉ. यु. ए. दबडे आणि डॉ. बी. एफ. मोमीन यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. टाटा टेक्नॉलॉजिसच्या ट्रेसी ऑस्टिना, थायलंडचे डॉ. नारुमोल चुमुआंग, आयईईई महाराष्ट्र सेक्शनचे विनीत कोटक यांनी विचार मांडले. या परिषदेसाठी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिल सदस्य अमोल चव्हाण, डॉ. सुरेंद्र राठोड आणि डॉ. उदय दबडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# वालचंद, आरआयटी, केडब्ल्यूसी, जीए कॉलेज उपांत्य फेरीत

## शिवाजी विद्यापीठ विभागीय क्रिकेट स्पर्धा : प्रथम चार संघ आंतरविभागीय स्पर्धेत खेळणार

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ सांगली विभागीय क्रिकेट स्पर्धेत वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, आरआयटी ईश्वरपूर, केडब्ल्यूसी व जी. ए. कॉलेज सांगली या संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला आहे. दरम्यान, सांगली विभागीय स्पर्धेत येणाऱ्या पहिल्या चार संघांची निवड कोल्हापूर येथे होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी होणार आहे.



येथील चिंतामणराव व्यापार महाविद्यालयाच्या क्रिकेट मैदानावर शिवाजी विद्यापीठ सांगली विभागीय क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. सुरेश कुंभार, प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शारीरिक शिक्षण संचालक प्रा. नागनाथ बनसोडे, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बोबडे प्रमुख उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे यजमानपद बळवंत कॉलेज, विटा यांच्याकडे आहे. सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठ सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे कामकाज सुरू आहे. बळवंत कॉलेज, विटा यांनी कबड्डी पुरुष व महिला, मैदानी स्पर्धा, क्रिकेट पुरुष स्पर्धेचे संयोजन केले आहे. उद्‌घाटनप्रसंगी मधुरा सिंहासने, आरती हळिंगळे उपस्थित होत्या.

क्रीडांगण प्रमुख डॉ. गणेश सिंहासने, किशोर चंदुरे, पंचप्रमुख रोहित वाले, आकाश शितोळे हे स्पर्धा पूर्ण करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

सांगली विभागीय स्पर्धेत सांगली जिल्ह्यातील १३ संघ सहभागी झाले आहेत. स्पर्धा अतिशय चुरशीने सुरू आहे. प्रथम येणारे चार संघ कोल्हापूर येथे होणाऱ्या आंतर विभागीय स्पर्धेत खेळणार आहेत. विजयी संघांना चषक देण्यात येणार आहेत. मालिकावीर, सामनावीर, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट फलंदाज यांना चषक देण्यात येणार आहे.

सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव लेफ्टनंट संदेश दौंडे हे स्पर्धेचे नियोजन करत आहेत. बळवंत कॉलेजचे आशिष देशमुख, प्रा. दीपक पवार व जिमखाना समिती स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कार्यरत आहे.

# विद्यापीठ विभागीय क्रिकेट स्पर्धा सुरू

**सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. २६ : येथील चिंतामणराव व्यापार महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर शिवाजी विद्यापीठ सांगली विभागीय क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ झाला. प्राचार्य डॉ. सुरेश कुंभार यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. स्पर्धेत सांगली जिल्ह्यातील १३ संघ सहभागी झाले आहेत. शुक्रवारपर्यंत (ता. २८) स्पर्धा होणार आहेत. वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली, केडब्ल्यूसी सांगली, जी. ए. कॉलेज सांगली, आरआयटी इंजिनिअरिंग कॉलेज, ईश्वरपूर या संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. प्रथम येणारे चार संघ कोल्हापूर येथे होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी खेळतील.

विटा येथील बळवंत महाविद्यालयाकडे सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे शैक्षणिक वर्षाचे यजमानपद आहे. सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्या मार्गदर्शनात शिवाजी विद्यापीठ सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे कामकाज सुरू आहे. बळवंत महाविद्यालयाने कबड्डी, मैदानी स्पर्धा, क्रिकेट स्पर्धेचे संयोजन केले आहे. विजयी संघांना चषक देण्यात येणार आहे. मालिकावीर, सामनावीर, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट फलंदाज यांनाही चषक देण्यात येईल. सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव लेफ्टनंट संदेश दौंडे हे स्पर्धेचे नियोजन करीत आहेत.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बळवंत महाविद्यालयाचे आशिष देशमुख, प्रा. दीपक पवार यांच्यासह जिमखाना समिती कार्यरत आहे. ज्येष्ठ शारीरिक शिक्षण संचालक प्रा. नागनाथ बनसोडे, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बोबडे, मधुरा सिंहासने, आरती हळिंगळे उपस्थित होत्या. क्रीडांगण प्रमुख डॉ. गणेश सिंहासने, किशोर चंदुरे, पंचप्रमुख रोहित वाले, आकाश शितोळे हे स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.




सांगली : सांगली विभागीय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करताना प्राचार्य सुरेश कुंभार, नागनाथ बनसोडे, प्रा. डॉ. गणेश सिंहासने, किशोर चंदुरे, मधुरा सिंहासने, प्रा. संदेश दौंडे, आशिष देशमुख, दीपक पवार.

# विभागीय क्रिकेट स्पर्धेमध्ये वालचंद महाविद्यालय विजेता

केसरी वृत्तसेवा

**सांगली** : चिंतामणराव व्यापार महाविद्यालय सांगली येथे झालेल्या बळवंत कॉलेज विटा यांनी संयोजन केलेल्या सांगली विभागीय क्रिकेट स्पर्धा अत्यंत चुरशीने झाल्या. यामध्ये वालचंद इंजिनिअरिंग कॉलेज सांगली विजेते, तर आरआयटी इंजिनिअरिंग कॉलेज, इस्लामपूर उपविजेते ठरले.

अंतिम सामन्यासाठी सेवानिवृत्त शारीरिक शिक्षण संचालक प्रा. प्रकाश कावले, प्रा. सुधीर वाटवे उपस्थित होते. बक्षीस वितरण समारंभासाठी चिंतामणराव व्यापार कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश कुंभार, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे लाईफ मेंबर नारायण आपटे, प्रा. नागनाथ बनसोडे, डॉ. गणेश सिंहासने, लेफ्टनंट संदेश दौंडे, प्रा. आशिष देशमुख, प्रा. दीपक पवार उपस्थित होते.



विभागीय क्रिकेट स्पर्धेत विजेतेपदाचा चषक वालचंद कॉलेजला प्रदान करताना प्राचार्य डॉ. सुरेश कुंभार, प्रा. नारायण आपटे व इतर.

अंतिम सामना अत्यंत चुरशीचा झाला. यामध्ये वालचंद कॉलेजने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांमध्ये ५ बाद १६२ अशी मोठी धावसंख्या उभारली. मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना आरआयटी कॉलेजच्या संघाला २० षटकामध्ये ९ बाद १२९ धावांवरच समाधान मानावे लागले. ३३ धावांनी वालचंद इंजिनिअरिंग कॉलेज विजयी झाले. तृतीय क्रमांकासाठी सामना जी.ए. कॉलेज सांगली विरुद्ध के. डब्ल्यू. सी. कॉलेज सांगली यांच्यामध्ये झाला. या सामन्यामध्ये के. डब्ल्यू. सी कॉलेजने प्रथम फलदाजी करताना सर्व बाद ३९ धावसंख्या उभारली. जी. ए. कॉलेजचा राहुल जगताप ५ विकेट, ऋषी कोळी २ विकेट यांनी घेतल्यामुळे के. डब्ल्यू. सी. कॉलेजचा संघ ३९ धावसंख्येपर्यंत मजल मारू शकला. जी. ए. कॉलेज सांगलीने तृतीय क्रमांक संपादन केला. चतुर्थ क्रमांक के. डब्ल्यू. सी. कॉलेजला मिळाला. सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा झाल्या. विजयी संघांना कायमचे चषक, उत्कृष्ट गोलंदाज, फलंदाज, मॅन ऑफ द मॅच, मॅन ऑफ द सिरीज चषक बळवंत कॉलेज, विटा यांच्यामार्फत देण्यात आले. स्पर्धेमध्ये मॅन ऑफ द मॅच धवल पाटील, मॅन ऑफ द सिरीज साहिल भंडारी, उत्कृष्ट गोलंदाज धवल पाटील, उत्कृष्ट फलंदाज संकेत जाधव यांनी किताब पटकावले.

# विभागीय क्रिकेट स्पर्धेत 'वालचंद'ला विजेतपद

## आरआयटीचा संघ उपविजेता : जी. ए. कॉलेज तृतीय, केडब्ल्यूसी चौथ्या स्थानावर



सांगली : विभागीय क्रिकेट स्पर्धेत वालचंद अभियांत्रिकीच्या संघाने विजेतपद मिळवले.

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या सांगली विभागीय क्रिकेट स्पर्धेत वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजने विजेतपद पटकावले. ईश्वरपूरच्या आरआयटी कॉलेजला उपविजेतेपद मिळाले. सांगलीच्या जी. ए. कॉलेजचा संघ तृतीय आला, तर केडब्ल्यूसीच्या संघाला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले. बळवंत कॉलेज, विटा यांनी स्पर्धेचे संयोजन केले.

अंतिम सामना अत्यंत चुरशीने झाला. वालचंद कॉलेजने प्रथम फलंदाजी करताना वीस षटकांमध्ये १६२ धावा केल्या. मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना आरआयटी कॉलेजला वीस षटकामध्ये १२९ धावा करता आल्या. वालचंदचा संघ विजयी झाला. उपविजेतेपद आरआयटी कॉलेजला मिळाले. तृतीय क्रमांकासाठी जी. ए. कॉलेज सांगली विरुद्ध केडब्ल्यूसी सांगली यांच्यामध्ये सामना झाला. केडब्ल्यूसीचा संघ ३९ धावसंख्येतच गारद झाला. जी. ए. कॉलेजने धावसंख्येचे हे छोटे आव्हान लिलया पेलत, तृतीय क्रमांक पटकावला.

**मॅन ऑफ द मॅच :** धवल पाटील
**मॅन ऑफ द सिरीज :** साहिल भंडारी
**उत्कृष्ट गोलंदाज :** धवल पाटील
**उत्कृष्ट फलंदाज :** संकेत जाधव

केडब्ल्यूसीला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा घेण्यात आल्या. विजयी संघांना चषक, उत्कृष्ट गोलंदाज, फलंदाज, मॅन ऑफ द मॅच, मॅन ऑफ द सिरीज चषक बळवंत कॉलेज, विटा यांच्यामार्फत देण्यात आले. अंतिम सामन्यासाठी निवृत्त शारीरिक शिक्षण संचालक प्रा. प्रकाश कावले, प्रा. सुधीर वाटवे उपस्थित होते. बक्षीस वितरण समारंभासाठी चिंतामणराव व्यापार कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश कुंभार, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य नारायण आपटे, प्रा. नागनाथ बनसोडे, डॉ. गणेश सिंहासने, लेफ्टनंट संदेश दौंडे, प्रा. आशिष देशमुख, प्रा. दीपक पवार उपस्थित होते. रोहित वाले, आशिष शितोळे, ज्योती शिंदे, अक्षय पाटील यांनी पंच म्हणून काम पाहिले.

> बळवंत कॉलेज विटा यांच्याकडे चालू शैक्षणिक वर्षीचे सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे यजमानपद आहे. यावर्षी सात स्पर्धांचे संयोजन ते करणार आहेत. आतापर्यंत क्रिकेट, कबड्डी, मैदानी स्पर्धा, बॉक्सिंग स्पर्धा झाल्या आहेत. यापुढे बेसबॉल, नेटबॉल, सॉफ्टबॉल स्पर्धेचे नियोजन ही चांगल्या प्रकारे होईल. शारीरिक शिक्षण संचालक, संघ व्यवस्थापक, खेळाडू हे नेहमीच सहकार्य करत आहेत.
>
> **- लेफ्टनंट संदेश दौंडे,** सचिव, सांगली विभागीय क्रीडा परिषद.

# ‘वालचंद अभियांत्रिकी’ विभागीय क्रिकेट स्पर्धेचे विजेते

## ईश्वरपूरचे ‘आरआयटी’ इंजिनिअरिंग उपविजेते; जी.ए. महाविद्यालय तिसऱ्या स्थानावर

■ सकाळ वृत्तसेवा

**सांगली, ता. ३० : सांगली विभागीय क्रिकेट स्पर्धेत वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले. ईश्वरपूर येथील ‘आरआयटी’ इंजिनिअरिंग कॉलेजला उपविजेते ठरले. चिंतामणराव व्यापार महाविद्यालयात झालेल्या या स्पर्धेचे संयोजन विटा येथील बळवंत महाविद्यालयाने केले होते.**

### वैयक्तिक कामगिरी

- सामनावीर : धवल पाटील,
- मालिकावीर : साहिल भंडारी
- उत्कृष्ट गोलंदाज : धवल पाटील,
- उत्कृष्ट फलंदाज : संकेत जाधव

अंतिम सामना अत्यंत चुरशीने झाला. वालचंद महाविद्यालयाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ५ बाद १६२ ही धावसंख्या उभारली. संकेत जाधव याने ४९ धावा देत १ विकेट, धवल पाटीलने ४५ धावांच्या मोबदल्यात २ विकेट तर साहिलने ३ विकेट मिळवल्या. मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना आरआयटी कॉलेजला २० षटकात ९ गडी बाद १२९ धावसंख्येवर समाधान मानावे लागले. ३३ धावांनी वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजचा संघ विजयी झाला.

तृतीय क्रमांकासाठी सांगलीच्याच दोन संघात सामना रंगला. जी.ए. कॉलेज सांगली विरुद्ध के.डब्ल्यू. सी. कॉलेज यांच्यामध्ये झाला. केडब्ल्यूसी कॉलेजने प्रथम फलंदाजी करताना सर्व बाद ३९ धावसंख्या उभारली. जी. ए. कॉलेजचा राहुल जगताप याने ५ विकेट, ऋषी कोळी याने २ विकेट घेतल्या. केडब्ल्यूसी कॉलेजने ३९ धावसंख्या जमवली. जी. ए. कॉलेज संघाने प्रत्युत्तरादाखल खेळताना ३९ धावा अवघ्या १ गड्याच्या मोबदल्यात मिळवून तृतीय क्रमांक संपादन केला. केडब्ल्यूसी कॉलेजला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या स्पर्धेत विजयी संघांना कायमचा चषक, उत्कृष्ट




सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघाला करंडक प्रदान करताना प्राचार्य डॉ. सुरेश कुंभार, प्रा. नारायण आपटे, प्रा. संदेश दौंडे, प्रा. नागनाथ बनसोडे, डॉ. गणेश सिंहासने, सुधीर वाटवे, प्रा. अजित पाटील आदी.

गोलंदाज, फलंदाज, मॅन ऑफ द मॅच, मॅन ऑफ द सीरिज चषक देण्यात आले. विट्याच्या बळवंत कॉलेजने स्पर्धेचे संयोजन केले. रोहित वाले, आशिष शितोळे, ज्योती शिंदे, अक्षय पाटील यांनी पंच म्हणून काम पाहिले. चिंतामणराव व्यापार कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश कुंभार, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य नारायण आपटे, प्रा. नागनाथ बनसोडे, डॉ. गणेश सिंहासने, संदेश दौंडे, प्रा. आशिष देशमुख, प्रा. दीपक पवार यांच्याहस्ते पारितोषिक वितरण झाले. सेवानिवृत्त शारीरिक शिक्षण संचालक प्रा. प्रकाश कावले, प्रा.सुधीर वाटवे उपस्थित होते.

# राजीव गांधी आयोगाच्या टीमची 'वालचंद'ला भेट

**जनप्रवास । सांगली**

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबई यांच्या टीमने सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयास भेट दिली. या भेटीत त्यांनी आरजीएसटीसी-एमएसएमई इंटर्नशिप योजनेंतील सायकल ८ च्या टप्पा १ चे मूल्यमापन केले.

या मूल्यमापनासाठी डॉ. ए. व्ही. सपरे (सल्लागार, आरजीएसटीसी) तसेच डॉ. वृशाली कुलकर्णी (कार्यभारित सदस्य-सचिव, आरजीएसटीसी, महाराष्ट्र शासन) यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्योग क्षेत्रातील सहकार्य प्रतिनिधी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेंद्रसिंह राठोड, रजिस्ट्रार डॉ. एस. जी. ताम्हणकर तसेच सर्व प्रकल्प मार्गदर्शकही उपस्थित होते.

या सत्रात विद्यार्थ्यांनी एकूण १४ औद्योगिक समस्या सादर केल्या. त्यापैकी ७ समस्यांची निवड प्रत्यक्ष उपाययोजनांसाठी करण्यात आली.



**सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या भेटीप्रसंगी मुंबई येथील राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे शिष्टमंडळ.**

यापैकी ३ प्रकल्पांची निवड आरजीएसटीसी अनुदानासाठी, तर ४ प्रकल्पांची निवड सकाळ निधी उपक्रमांतर्गत सहकार्यासाठी करण्यात आली. या योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण ७ टप्पे पूर्ण झाले असून २० औद्योगिक समस्या यशस्वीरीत्या सोडविण्यात आल्या आहेत. आणि एकूण २१० विद्यार्थ्यांनी इंटर्नशिप पूर्ण केली आहे. उद्योग-शिक्षण सहकार्यास बळकटी देण्याच्या दिशेने ही अत्यंत उल्लेखनीय कामगिरी ठरली आहे. योजनेचा समन्वय व प्रकल्पांचे नियोजन डॉ. विजय मोहाळे आणि प्रा. राहुल एम. चनमनवार यांनी प्रभावीपणे पार पाडले. योगदान व मदतीबद्दल डॉ. अनिल काकोडकर (अध्यक्ष, आरजीएसटीसी), डॉ. वृशाली कुलकर्णी, डॉ. ए. व्ही. सपरे, सहकारी उद्योग संस्था व सर्व मार्गदर्शक प्राध्यापक यांचे संचालक डॉ. सुरेंद्र राठोड यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी संचालक, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिल सदस्य अमोल चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

# वालचंदमध्ये आरजीएसटीसी - एमएसएमई इंटर्नशिप प्रकल्प योजना



सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आरजीएसटीसी इंटर्रशिप प्रकल्प राबवण्यात आला. यावेळी संचालक, प्राध्यापक उपस्थित होते.

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबई यांच्या टीमने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली येथे भेट देऊन आरजीएसटीसी-एमएसएमई इंटर्नशिप योजनेंतील सायकल ८ च्या टप्पा १ चे मूल्यमापन केले. या मूल्यमापनासाठी सल्लागार डॉ. ए. व्ही. सपरे तसेच आरजीएसटीसी कार्यभारित सदस्य-सचिव डॉ. वृशाली कुलकर्णी, यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेंद्रसिंह राठोड, रजिस्ट्रार डॉ. एस. जी. ताम्हणकर उपस्थित होते. या सत्रात विद्यार्थ्यांनी एकूण १४ औद्योगिक समस्या सादर केल्या. त्यापैकी ७ समस्यांची निवड प्रत्यक्ष उपाययोजनांसाठी करण्यात आली. तसेच ३० विद्यार्थ्यांनी हा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केला. विद्यार्थ्यांची तांत्रिक समज, समस्या सोडवण्याची क्षमता व नावीन्यपूर्ण दृष्टिकोन यांची समितीने विशेष प्रशंसा केली. यापैकी ३ प्रकल्पांची निवड आरजीएसटीसी अनुदाना साठी, तर ४ प्रकल्पांची निवड केली. या योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण ७ टप्पे पूर्ण झाले असून २० औद्योगिक समस्या यशस्वीरीत्या



सांगली : मुंबईतील राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या पथकाने वालचंद महाविद्यालयात इंटर्नशिप योजनेचे मूल्यमापन केले.

# वालचंद महाविद्यालयात इंटर्नशिप योजनेचे मूल्यमापन

सांगली, ता. ११ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आरजीएसटीसी एमएसएमई इंटर्नशिप योजनेतील सायकल आठच्या टप्पा - १ चे मूल्यमापन करण्यात आले. मुंबईतील राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या पथकाने हे मूल्यमापन केले.

या मूल्यमापनासाठी 'आरजीएसटीसी'चे सल्लागार डॉ. ए. व्ही. सपरे, कार्यभारीय सदस्य सचिव डॉ. वृशाली कुलकर्णी प्रमुख उपस्थित होते. उद्योग क्षेत्रातील सहकार्य प्रतिनिधी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेंद्रसिंह राठोड, रजिस्ट्रार डॉ. एस. जी. ताह्मणकर यांच्यासह सर्व प्रकल्प मार्गदर्शक यावेळी उपस्थित होते.

या सत्रात विद्यार्थ्यांनी एकूण १४ औद्योगिक समस्या सादर केल्या. त्यापैकी ७ समस्यांची निवड प्रत्यक्ष उपाययोजनांसाठी करण्यात आली. तसेच ३० विद्यार्थ्यांनी हा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केला. विद्यार्थ्यांची तांत्रिक समज, समस्या सोडवण्याची क्षमता व नावीन्यपूर्ण दृष्टिकोन यांचे समितीने कौतुक केले. ३ प्रकल्पांची निवड आरजीएसटीसी अनुदानासाठी, तर ४ प्रकल्पांची निवड सकाळ निधी उपक्रमांतर्गत सहकार्यासाठी करण्यात आली. या योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण ७ टप्पे पूर्ण झाले आहेत. २० औद्योगिक समस्या यशस्वीरीत्या सोडविण्यात आल्या आहेत. एकूण २१० विद्यार्थ्यांनी इंटर्नशिप पूर्ण केली आहे. उद्योग, शिक्षण सहकार्यास बळकटी देण्याच्या दिशेने ही अत्यंत उल्लेखनीय कामगिरी ठरल्याचे सांगण्यात आले.

योजनेचा समन्वय व प्रकल्पांचे नियोजन डॉ. विजय मोहाळे आणि प्रा. राहुल एम. चनमनवार यांनी केले. वालचंद महाविद्यालयाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांना औद्योगिक अनुभव, नवी संधी आणि संशोधनात्मक दृष्टी प्रदान करणारा ठरत आहे. या कार्यक्रमासाठी मार्गदर्शनाबद्दल 'आरजीएसटीसी'चे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, डॉ. वृशाली कुलकर्णी, डॉ. ए. व्ही. सपरे, सहकारी उद्योग संस्था व सर्व मार्गदर्शक प्राध्यापक यांचे संचालक डॉ. सुरेंद्र राठोड यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी संचालक, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिल सदस्य अमोल चव्हाण यांचे मार्गदर्शन मिळाले.

# वालचंद येथे सायकल ८ टप्पा १ चे मूल्यमापन

## आरजीएसटीसीएमएसएमई इंटर्नशिप व प्रकल्प योजना



**सांगली : वालचंद येथे आरजीएसटीसीएमएसएमई इंटर्नशिप योजनेतील सायकल आठव्या टप्पा एकच्या मूल्यमापनप्रसंगी मान्यवर.**

प्रतिनिधी
सांगली

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबई यांच्या टीमने दि. ६ डिसेंबर रोजी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली येथे भेट देऊन आरजीएसटीसीएमएसएमई इंटर्नशिप योजनेंतील सायकल ८ च्या टप्पा १ चे मूल्यमापन केले.

या मूल्यमापनासाठी आरजीएसटीसी सल्लागार डॉ. ए. व्ही. सपरे, आरजीएसटीसी कार्यभारित सदस्यसचिव डॉ. वृशाली कुलकर्णी यांची उपस्थिती होती. उद्योग क्षेत्रातील सहकार्य प्रतिनिधी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेंद्रसिंह राठोड, रजिस्ट्रार डॉ. एस. जी. ताम्हणकर तसेच सर्व प्रकल्प मार्गदर्शकही उपस्थित होते.

या सत्रात विद्यार्थ्यांनी एकूण चौदा औद्योगिक समस्या सादर केल्या. त्यापैकी सात समस्यांची निवड प्रत्यक्ष उपाययोजनांसाठी करण्यात आली. तसेच तीस विद्यार्थ्यांनी हा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केला. विद्यार्थ्यांची तांत्रिक समज, समस्या सोडवण्याची क्षमता व नावीन्यपूर्ण दृष्टिकोन यांची समितीने विशेष प्रशंसा केली.

यापैकी तीन प्रकल्पांची निवड आरजीएसटीसी अनुदानासाठी तर चार प्रकल्पांची निवड सकाळ निधी उपक्रमांतर्गत सहकार्यासाठी करण्यात आली.

या योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण सात टप्पे पूर्ण झाले असून वीस औद्योगिक समस्या यशस्वीरीत्या सोडविण्यात आल्या आहेत. एकूण २१० विद्यार्थ्यांनी इंटर्नशिप पूर्ण केली आहे. उद्योगशिक्षण सहकार्यास बळकटी देण्याच्या दिशेने ही अत्यंत उल्लेखनीय कामगिरी ठरली आहे.

योजनेचा समन्वय व प्रकल्पांचे नियोजन डॉ. विजय मोहाळे आणि प्रा. राहुल एम. चनमनवार यांनी प्रभावीपणे पार पाडले. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांना औद्योगिक अनुभव, नवी संधी आणि संशोधनात्मक दृष्टी प्रदान करणारा ठरत आहे.

या कार्यक्रमासाठी मिळालेल्या मोलाच्या मार्गदर्शनाबद्दल व उपस्थितीबद्दल आरजीएसटीसी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, डॉ. वृशाली कुलकर्णी, डॉ. ए. व्ही. सपरे, सहकारी उद्योग संस्था व सर्व मार्गदर्शक प्राध्यापक यांचे संचालक डॉ. सुरेंद्र राठोड यांनी आभार मानले.

कार्यक्रमासाठी संचालक, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिल सदस्य अमोल चव्हाण यांचे यावेळी मार्गदर्शन लाभले.

# सांगलीत आज 'वालचंद'च्या ९५ च्या तुकडीचा विद्यार्थी मेळावा

## प्रमोदिनी कुलकर्णी, रवी महामुनी प्रमुख पाहुणे



सांगली, ता. १९ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा १५ वा वार्षिक माजी विद्यार्थी मेळावा उद्या (ता. २०) होत आहे. महाविद्यालयाच्या प्रांगणात, तसेच टिळक सभागृहात यानिमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. जगभरात विखुरलेल्या माजी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांशी संवाद व्हावा, या उद्देशाने २०१२ पासून असा मेळावा भरवण्यास सुरुवात झाली. महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुदर्शन राठोड यांनी ही माहिती दिली.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेले देशातील अग्रगण्य अभियांत्रिकी महाविद्यालय अशी 'वालचंद'ची ओळख आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी देश उभारणीत मोठे योगदान दिले आहे. अनेक माजी विद्यार्थी उच्चपदस्थ केंद्र आणि राज्य सरकारमध्ये आहेत. या सर्वांच्या अनुभवाचा महाविद्यालयास फायदा व्हावा. त्यांचा विद्यमान विद्यार्थ्यांशी संवाद व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम सुरू झाला. गेल्या काही वर्षांतील मेळाव्यात सरासरी तीनशेंवर विद्यार्थी मेळाव्यासाठी हजर राहत आहेत. प्रतिवर्षी वर्षाच्या सुरुवातीला जानेवारीत हा मेळावा होत असे. यंदा डिसेंबरमध्येच होत असून देश व जागतिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा मेळावा पुढील महिन्यात होणार आहे.

उद्या दुपारी दोनपासून नोंदणी सुरू होईल. त्यानंतर सायंकाळी सव्वापाच वाजता मेळाव्यात प्रारंभ होईल. महाविद्यालयातून पंचवीस वर्षांपूर्वी बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना दरवर्षी विशेष निमंत्रित केले जाते. यावर्षी १९९५ च्या बॅचचे सर्व विद्याशाखांतील माजी विद्यार्थी निमंत्रित आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून कॅप जेमिनी कंपनीच्या उपाध्यक्ष, बँकिंग आणि भांडवली क्षेत्रातील तज्ज्ञ प्रमोदिनी कुलकर्णी, टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसच्या डिझाईन रिसर्चचे प्रमुख डॉ. रवी महामुनी आदी प्रमुख पाहुणे आहेत.

माजी विद्यार्थी संघटनेच्या डीन मेधा शहा म्हणाल्या, "महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांशी संवाद स्थापन करण्यासाठी प्रतिवर्षी मेळावे घेतले जातात. सांगलीत वार्षिक आणि पुण्यात जागतिक स्तरावरील कार्यरत विद्यार्थी निमंत्रित करण्यात येणार आहेत. या वर्षीपासून विविध विद्याशाखांचे आणि विविध क्षेत्रांत काम करणाऱ्याचे स्वतंत्र मेळावे घेतले जाणार आहेत. हा मेळावा ३१ जानेवारीला होणार आहे."

# वालचंद महाविद्यालयात 'वार्षिक विद्यार्थी मेळावा २०२५' उत्साहात

**जनप्रवास । सांगली**

वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली येथे 'वार्षिक विद्यार्थी मेळावा-२०२५' अंतर्गत माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शनिवार, २० डिसेंबर २०२५ रोजी उत्साहात संपन्न झाला. २००१ साली पदवी प्राप्त केलेल्या रौप्य महोत्सवी बॅचच्या , तसेच २००६ पासूनच्या माहिती तंत्रज्ञान शाखेतील सर्व बॅचेसच्या सहभागाने हा सोहळा पार पडला.

२०१२ साली सुरू झालेल्या या उपक्रमाने कालांतराने विशेष महत्व प्राप्त केले असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही या मेळाव्याने जुन्या आठवणींना उजाळा दिला, नवी नाती दृढ केली आणि "Being a Walchandite!' या भावनेचा उत्सव साजरा केला. हा कार्यक्रम वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली (शासकीय अनुदानित स्वायत्त संस्था) व असोसिएशन ऑफ पास्ट स्टुडंट्स (-झड) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

माजी विद्यार्थ्यांनी आपल्या-आपल्या विभागांमध्ये संवाद साधत आठवणींना उजाळा दिला. सायंकाळी ५.०० वाजता टिळक हॉल सभागृहात मान्यवरांचे आगमन झाले. त्यानंतर व्हिडिओ सादरीकरण, दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन पार पडले. डॉ. मेधा शहा यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. यानंतर उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. ' वालचंद कॉलेज - आजची वाटचाल' या विषयावर संचालक प्रा. डॉ. सुरेंद्र राठोड यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला.

आजच्या स्थानापर्यंत पोहोचण्याच्या प्रवासात वालचंदने दिलेली दृष्टी, शिस्त व आत्मविश्वासाचा यात निर्णायक वाटा असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले. डिझाईन अँड रिसर्च विभागाचे प्रमुख डॉ. रवी महामुनी हे ही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## यशाची भक्कम पायाभरणी

प्रमुख पाहुण्या म्हणून कॉम्प्युटर सायन्स अभियांत्रिकी शाखेच्या माजी विद्यार्थिनी प्रमोदिनी कुलकर्णी यांनी आपल्या भाषणातून यशाच्या प्रत्येक टप्प्यावर वालचंद कॉलेजच्या संस्कारांची व मूल्यांची भक्कम पायाभरणी लाभल्याचे भावनिक शब्दांत अधोरेखित केले.

# वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**केसरी वृत्तसेवा**

सांगली :वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली येथे वार्षिक विद्यार्थी मेळावा-२०२५ हा माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात झाला. २००१ साली पदवी प्राप्त केलेल्या रौप्य महोत्सवी बॅचच्या, तसेच २००६ पासूनच्या माहिती तंत्रज्ञान शाखेतील सर्व बॅचेसच्या सहभागाने हा सोहळा पार पडला.

२०१२ साली सुरू झालेल्या या उपक्रमाने कालांतराने विशेष महत्त्व प्राप्त केले असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही या मेळाव्याने जुन्या आठवणींना उजाळा दिला, हा कार्यक्रम वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली व असोसिएशन ऑफ पास्ट स्टुडंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

माजी विद्यार्थ्यांनी आपल्या-आपल्या विभागांमध्ये संवाद साधत आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर व्हिडिओ सादरीकरण, दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन पार पडले. डॉ. मेधा शहा यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. यानंतर उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. वालचंद कॉलेज -आजची वाटचाल या विषयावर संचालक प्रा. डॉ. सुरेंद्र राठोड यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. या सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून कॉम्प्युटर सायन्स अभियांत्रिकी शाखेच्या माजी विद्यार्थ्यनी प्रमोदिनी कुलकर्णी म्हणाल्या, यशाच्या प्रत्येक टप्प्यावर वालचंद कॉलेजच्या संस्कारांची व मूल्यांची भक्कम पायाभरणी लाभली. आजच्या स्थानापर्यंत पोहोचण्याच्या प्रवासात वालचंदने दिलेल्या दृष्टी, शिस्त व आत्मविश्वासाचा निर्णायक वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी शाखेतील १९९५ प्रवेशित बॅचचे माजी विद्यार्थी तसेच प्रमुख डॉ. रवी महामुनी हेही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी सध्याच्या विद्यार्थ्यांना Research and Innovation उपक्रमांमध्ये सहभाग घेण्यासाठी मार्गदर्शन केले.

उपसंचालक डॉ. यू. ए. दबडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन एन. जी. आपटे यांनी केले. या कार्यक्रमास संचालक, ॲडमिनिस्ट्रेटीव्ह कौन्सिल सदस्य अमोल चव्हाण यांचे मार्गदर्शन मिळाले.

# वालचंद अभियांत्रिकीत 'वार्षिक विद्यार्थी मेळावा' उत्साहात

प्रतिनिधी
सांगली

वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली येथे 'वार्षिक विद्यार्थी मेळावा– २०२५' हा माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शनिवार, २० डिसेंबर रोजी उत्साहात पार पडला. २००१ साली पदवी प्राप्त केलेल्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या तसेच २००६ पासूनच्या माहिती तंत्रज्ञान (IT) शाखेतील सर्व बॅचेसच्या सहभागाने हा सोहळा पार पडला.

२०१२ साली सुरू झालेल्या या उपक्रमाने कालांतराने विशेष महत्त्व प्राप्त केले असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही या मेळाव्याने जुन्या आठवणींना उजाळा दिला. नवी नाती दृढ केली आणि 'Being a Walchandite!' या भावनेचा उत्सव साजरा केला. हा कार्यक्रम वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली (शासकीय अनुदानित स्वायत्त संस्था) व असोसिएशन ऑफ पास्ट स्टुडंट्स (APS) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

माजी विद्यार्थ्यांनी आपल्या–आपल्या विभागांमध्ये संवाद साधत आठवणींना उजाळा दिला. सायंकाळी ५.०० वाजता टिळक हॉल सभागृहात मान्यवरांचे आगमन झाले. त्यानंतर व्हिडिओ सादरीकरण, दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन पार पडले. डॉ. मेधा शहा यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. यानंतर APS चे उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. 'वालचंद कॉलेज–आजची वाटचाल' या विषयावर संचालक प्रा. डॉ. सुरेंद्र राठोड यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. या सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून Compuer Science अभियांत्रिकी शाखेच्या माजी विद्यार्थिनी प्रमोदिनी कुलकर्णी यांनी आपल्या भाषणातून यशाच्या प्रत्येक टप्प्यावर वालचंद कॉलेजच्या संस्कारांची व मूल्यांची भक्कम पायाभरणी लाभल्याचे भावनिक शब्दांत अधोरेखित केले. आजच्या स्थानापर्यंत पोहोचण्याच्या प्रवासात वालचंदने दिलेल्या दृष्टी, शिस्त व आत्मविश्वासाचा निर्णायक वाटा असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले.

इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी शाखेतील १९९५ प्रवेशित बॅचचे माजी विद्यार्थी तसेच डिझाईन अँड रिसर्च विभागाचे प्रमुख डॉ. रवी महामुनी हेही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी सध्याच्या विद्यार्थ्यांना Research and Innovation उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यासाठी मार्गदर्शन केले. 'ओपन पॉडियम' अंतर्गत माजी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव आणि आठवनीना उजाला दिला.

याप्रसंगी उपस्थित सर्व माजी विद्यार्थी व मान्यवर पाहुण्यांनी सध्याच्या पिढीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, संशोधनात्मक व व्यावसायिक उन्नतीसाठी आपल्या अनुभव, कौशल्य व तज्ज्ञतेच्या आधारे सक्रिय सहकार्य करण्याचा ठाम संकल्प केला. प्रशिक्षण व नियोजन उपक्रमांना बळकटी देत संस्थेच्या सर्वांगीण विकासात योगदान देण्याची सामूहिक ग्वाही यावेळी देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक सादरीकरणानंतर उपसंचालक डॉ. यू. ए. दबडे यांनी आभार मानले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन एन. जी. आपटे यांनी केले. सायंकाळी स्नेहभोजन व अनौपचारिक संवादाचा कार्यक्रम पार पडला.

२५ वर्षांचा प्रदीर्घ प्रवास पूर्ण करणाऱ्या २००१ च्या बॅचसाठी हा स्नेहमेळावा केवळ पुनर्मिलनाचा नव्हे, तर वालचंदशी असलेल्या भावनिक ऋणानुबंधाचा गौरव ठरला. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे संचालक, उपसंचालक, प्रबंधक व ॲडमिनिस्ट्रेटीव्ह कौन्सिल सदस्य अमोल चव्हाण यांचे मौलिक मार्गदर्शन मिळाले.

# 'वालचंद'मध्ये 'वार्षिक विद्यार्थी मेळावा २०२५'

**सांगली :** वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली येथे 'वार्षिक विद्यार्थी मेळावा - २०२५' हा माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा २० डिसेंबर रोजी संपन्न झाला. २००१ साली पदवी प्राप्त केलेल्या रौप्य महोत्सवी बॅचच्या, तसेच २००६ पासूनच्या माहिती तंत्रज्ञान शाखेतील सर्व बॅचेसच्या सहभागाने हा सोहळा पार पडला.

हा कार्यक्रम वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली (शासकीय अनुदानित स्वायत्त संस्था) व असोसिएशन ऑफ पास्ट स्टुडंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता. डॉ. मेधा शहा यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. डॉ. अरविंद देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. वालचंद कॉलेज आजची वाटचाल या विषयावर संचालक प्रा. डॉ. सुरेंद्र राठोड यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. प्रमुख पाहुण्या माजी विद्यार्थिनी प्रमोदिनी कुलकर्णी यांनी वालचंदने दिलेल्या दृष्टी, शिस्त व आत्मविश्वासाचा निर्णायक वाटा असल्याचे नमूद केले. डॉ. रवी महामुनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. यू.ए. दबडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन एन.जी. आपटे यांनी केले. २५ वर्षांचा प्रदीर्घ प्रवास पूर्ण करणाऱ्या २००१ च्या बॅचसाठी हा स्नेहमेळावा केवळ पुनर्मिलनाचा नव्हे, तर वालचंदशी असलेल्या भावनिक ऋणानुबंधाचा गौरव ठरला. या कार्यक्रमास संचालक, उपसंचालक, प्रबंधक व ॲडमिनिस्ट्रेटीव्ह कौन्सिल सदस्य अमोल चव्हाण यांचे मार्गदर्शन मिळाले. (वा.प्र.)

# 'वालचंद अभियांत्रिकी'मध्ये 'विद्यार्थी मेळावा २०२५' उत्साहात

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली येथे 'वार्षिक विद्यार्थी मेळावा २०२५' हा माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ रोजी उत्साहात संपन्न झाला. २००१ मध्ये पदवी प्राप्त केलेल्या रौप्य महोत्सवी बॅचच्या, तसेच २००६ पासूनच्या माहिती तंत्रज्ञान शाखेतील सर्व बॅचेसच्या सहभागाने हा सोहळा पार पडला.

२०१२ मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाने कालांतराने विशेष महत्त्व प्राप्त केले असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही या मेळाव्याने जुन्या आठवणींना उजाळा दिला, नवी नाती दृढ केली !' या भावनेचा उत्सव साजरा केला. हा कार्यक्रम वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली (शासकीय अनुदानित स्वायत्त संस्था) व असोसिएशन ऑफ पास्ट स्टुडंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

माजी विद्यार्थ्यांनी आपल्या-आपल्या विभागांमध्ये संवाद साधत आठवणींना उजाळा दिला. सायंकाळी ५.०० वाजता टिळक हॉल सभागृहात मान्यवरांचे आगमन झाले. त्यानंतर व्हिडिओ सादरीकरण, दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन पार पडले. डीन डॉ. मेधा शहा यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. यानंतर उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. 'वालचंद कॉलेजची आजची वाटचाल' या विषयावर संचालक प्रा. डॉ. सुरेंद्र राठोड यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. या सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून अभियांत्रिकी शाखेच्या माजी विद्यार्थिनी प्रमोदिनी कुलकर्णी यांनी आपल्या भाषणातून यशाच्या प्रत्येक टप्प्यावर वालचंद कॉलेजच्या संस्कारांची व मूल्यांची भक्कम पायाभरणी लाभल्याचे भावनिक शब्दांत अधोरेखित केले. आजच्या स्थानापर्यंत पोहोचण्याच्या प्रवासात वालचंदने दिलेल्या दृष्टी, शिस्त व आत्मविश्वासाचा निर्णायक वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले.